# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.



मा. यशवंतराव चव्हाण यांना ९७ व्या जयंती
निमित्त विनम्र अभिवादन.

१२ मार्च २०१०

**वार्तापत्र**




सन २००९ चा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार मा. श्रीमती किशोरी आमोणकर यांना प्रदान करताना राज्याचे उपमुख्यमंत्री मा. छगन भुजबळ सोबत व्यासपीठावर मा. अरुण गुजराथी, मा. आर. आर पाटील, श्रीमती सुजाता मनोहर इ.



सन २००९ च्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यानिमित्त विचार मांडताना श्रीमती किशोरी आमोणकर व्यासपीठावर मा. अजित निंबाळकर, मा. अरूण गुजराथी, मा. आर. आर. पाटील, श्रीमती सुजाता मनोहर, मा. छगन भुजबळ, मा. हुसेन दलवाई व मा. शरद काळे इ.



सन २००९ च्या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यानिमित्त विचार मांडताना श्रीमती सुजाता मनोहर, श्रीमती किशोरी आमोणकर प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मा. हुसेन दलवाई आणि मा. सरचिटणीस शरद काळे इ.




शिक्षण विकास मंचाच्यावतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात राज्याचे शालेय शिक्षणमंत्री मा. बाळासाहेब थोरात यांचे स्वागत करताना शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे सोबत प्रमुख संयोजिका डॉ. कुमुद बन्सल इ.



शिक्षण विकास मंचाच्यावतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त आयोजित केलेल्या 'मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा, स्वरूप व अमंलबजावणी' या विषयावरील परिषदेत विचार मांडताना निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, उपस्थित मा. डॉ. वसंत काळपांडे, डॉ. कुमुद बन्सल, मा. बाळासाहेब थोरात, मा. नरेंद्र कवडे.



सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, कराडला त्रिपुराचे राज्यपाल श्री. डी. वाय. पाटील यांची सदिच्छा भेट



मा. यशवंतरावजी चव्हाण साहेब २५ वा स्मृतीदिन दि. २५ नोव्हेंबर २००९ रोजी आदरांजली वाहताना मा. मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण, मा. कल्लाप्पाआण्णा बा. आवाडे, श्री मोहनराव डकरे इ.



शिक्षण विकास मंच्याच्यावतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर उपस्थित प्रमुख मान्यवर डॉ. कुमुद बन्सल, मा. सुप्रिया सुळे, शालेय शिक्षण मंत्री मा. बाळासाहेब थोरात तसेच शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. फौजिया खान



गृहव्यवस्थान प्रशिक्षण कार्यशाळा प्रमाण पत्र वितरण समारंभात मा. शरद काळे प्रशिक्षणार्थिंना मार्गदर्शन करतांना



अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विशेष सामर्थ्य व्यक्ती सक्षमीकरण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना मंचाच्या संयोजिका मा. सुप्रिया सुळे

# विचारधन



''शेतीमध्ये अलीकडे नवे तंत्रविज्ञानही अनुसरण्यात येऊ लागले. त्यामुळे आपल्याला ग्रामीण भागात काही सुधारणा दिसून येत आहे. वीस वर्षापूर्वीचे भारतीय खेडे आणि आजचे खेडे यांत बराच फरक आहे. त्यावेळी खेडेगाव उदास अन् उजाड दिसायचे. आता तेथे प्रगतीची चक्रे फिरत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे साहजिकच मनाला बरे वाटते. पण एवढ्यावरच समाधान मानून चालणार नाही. श्रीमंत शेतकऱ्याचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे, हे खरे आहे. परंतु अजूनही बहुसंख्य शेतकरी गरीबच राहिले आहेत. पडीक जमिनीचे पट्टेच्या पट्टे अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांचे भीषण दारिद्रय अंतःकरण पिळवटून टाकणारे आहे. शेतीचा क्रमशः विकास होऊनही बहुसंख्य ग्रामीण जनता गरीबच राहावी, हे आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेपुढील सर्वात मोठे आणि महत्त्वाचे आव्हान आहे.''

**स्व. यशवंतराव चव्हाण**

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रं. |
|---|---|
| संपादकीय | ३ |
| स्व. यशवंतराव चव्हाण - लेख | ५ |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान - कार्यवृत्त | १० |
| अपंग हक्क विकास मंच - कार्यवृत्त | १४ |
| शिक्षण विकास मंच - कार्यवृत्त | १५ |
| यशस्विनी अभियान - कार्यवृत्त | १९ |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम - कार्यवृत्त | २१ |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ - कार्यवृत्त | २३ |
| सृजन - कार्यवृत्त | २४ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय - कार्यवृत्त | २५ |
| विभागीय केंद्र रत्नागिरी - कार्यवृत्त | २६ |
| विभागीय केंद्र नागपूर - कार्यवृत्त | २८ |
| विभागीय केंद्र औरंगाबाद - कार्यवृत्त | ३५ |
| कृषी सहकार व्यासपीठ व विभागीय केंद्र पुणे - कार्यवृत्त | ३७ |
| विभागीय केंद्र कराड - कार्यवृत्त | ४२ |
| विभागीय केंद्र नाशिक - कार्यवृत्त | ४५ |
| विभागीय केंद्र लातूर - कार्यवृत्त | ५३ |
| माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी - कार्यवृत्त | ५७ |
| प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने | ६० |



**वर्ष** : चौदावे

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे वार्तापत्र**

खाजगी विनामूल्य वितरणासाठी

- **प्रकाशन**
  १२ मार्च २०१०
  मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती
- **सल्लागार**
  **मा. शरद काळे**
  **मा. रवींद्र बापट**
  **मा. ज्ञानेश्वर खैरे**
- **मानद् संपादक**
  **दत्ता बाळसराफ**
- **उप संपादक**
  **सुरेश पाटील**
- **सहाय्यक**
  **मिनल सावंत**
  **अर्जुन बचुटे**

- **आभार**

संजय बनसोडे, अरूण शिंदे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, राऊत, स्मिता रायकर, महेश चौधरी, राजेंद्र रूपवते, शोभा लोंढे, प्रियंका देसाई, अनिल चिंदरकर, शमीम खान यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

**अंक** : २५वा

- **अक्षरजुळणी आणि छपाई**

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक श्री दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता,
**प्रिन्टो ग्राफी सिस्टम (इं.) प्रा.लि.**
२८ मुंबई समाचार मार्ग,
राजाबहादूर बिल्डींग, फोर्ट,
मुंबई-४०० ०२३.
फोन नं.: ४०७८ ५६५६
येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - २१ येथे प्रकाशित केले.
नोंदणी क्र. ७१५८७/९९

# संपादकीय

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांना ९७ व्या जयंती दिनानिमित्त अंत:करणपूर्वक अभिवादन. महाराष्ट्रात कृषी आणि औद्योगिक विकासाचा पाया घालणारे, महाराष्ट्रात सहकाराचे जाळे विणणारे आणि पंचायत राज्याच्या माध्यमातून तळागाळातल्या समाजाला त्यांच्या लोकशाही ताकदीचे भान देणारे ते द्रष्टे नेते होते. त्यांनी दिलेली दिशा आणि दृष्टी कैक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारी आहे. त्यांचे हे विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची स्थापना झाली आहे. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून वेगवेगळ्या विभागामार्फत घडणाऱ्या कार्यक्रमांचा लेखाजोखा या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. राज्यात प्रतिष्ठानची विविध ठिकाणी विभागीय कार्यालये असून त्यांच्यामार्फत घेण्यात आलेले विविध कार्यक्रम, परिषदा, मेळावे, चर्चासत्रे यांचा संक्षिप्त आढावा या अंकात घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षास सुरुवात झाली असून, पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याला अद्यापपर्यंत स्वतंत्र असे युवांसाठी कुठलेही धोरण नाही. प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने गेल्या दोन वर्षापासून युवा धोरणासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन वर्षापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने, महाराष्ट्र राज्यास स्वतंत्र युवा धोरण असावे अशी मागणी केली होती. महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाचा अंतिम मसुदा दि. १२ जानेवारी २०१० रोजी राज्य शासनास सादर करण्यात आला. याची योग्य ती दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने नुकतीच राज्याचे युवा धोरण कसे असावे यासाठी शासकीय समिती नियुक्त केली असून या समितीच्या निमंत्रित सदस्य म्हणून मा. सुप्रिया सुळे यांची नियुक्ती केली आहे. तर नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे विश्वास ठाकूर, निलेश राऊत, निलेश पुराडकर, मॅथ्यू मट्टम यांची या समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबद्दल या सर्वांचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन.

याबरोबरच प्रतिष्ठानचे शिक्षण विकास मंच, यशस्विनी अभियान, अपंग हक्क विकास मंच, लिगल एड फोरम, महाराष्ट्र महिला व्यासपीठ, प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे यांच्या मार्फत अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून त्यास समाजाचे व शासनाचे चांगले सहकार्य लाभले आहे. तसेच प्रतिष्ठानच्या सर्व विभागीय कार्यालयाच्यावतीने ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्त सर्व विभागीय पातळ्यावर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याची सविस्तर माहिती वार्तापत्रात समाविष्ट आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचा दि. ११ नोव्हेंबर हा जन्मदिवस. सन २००८ पासून केंद्र शासनाने हा दिवस **राष्ट्रीय शिक्षण दिन** म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवसाचे औचित्य साधून शिक्षण विकास मंचाच्यातीने मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या विषयावर एका राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या दिवशी राज्यातील प्राथमिक शिक्षणात नाविन्यपूर्व काम करणाऱ्या निवडक ग्रामशिक्षण समित्यांचा गौरव करण्यात आला तसेच 'शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी' या उत्कृष्ट शिक्षण विषयक ग्रंथास पुरस्कार देण्यात आला. अपंग हक्क विकास मंचाच्यावतीने दि. ४ आणि ५ जानेवारी २०१० रोजी विशेष सामर्थ्य व्यक्ती सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेचा सविस्तर अहवाल या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्राची जडण घडण ही खऱ्या अर्थाने सामाजिक व सहकारी संस्थांच्या माध्यमातून झाली आहे. संस्था कोणतीही असो तिचे प्रशासन / व्यवस्थापन योग्य असेल तरच ती नावारुपाला येते. ही गोष्ट विचारात घेऊन नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि महाराष्ट्र महिला व्यासपीठ यांच्या विद्यमाने सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येणार आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार यंदा **ज्येष्ठ शिक्षण तज्ञ प्रा. यशपाल** यांना प्रदान करण्यात येत आहे. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी शुक्रवार दि. १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे मा. यशपाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या जीवन व कार्यविषयी नोंद असणारे सन्मानपत्र वार्तापत्रात समाविष्ट करण्यात आले आहे. त्यांच्या पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा !

आपला

(मानद संपादक)



अपंग हक्क विकास मंचाने आयोजित केलेल्या विशेष सामर्थ्य व्यक्ती सक्षमीकरण कार्यशाळेत विचार मांडताना मा. शरद काळे व्यासपीठावर मा. आ. हेमंत टकले, मा. श्री. सावंत (आयुक्त अपंग कल्याण) मा. सचिन अहिर, मा. हुसेन हलवाई, मा. नसिमा हुरजुक इ.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र पूणे यांच्या वतीने दिला जाणारा 'दिवाळी पहाट पुरस्कार' जेष्ठ व्यंगचित्रकार मा. मंगेश तेंडूलकर यांना प्रदान करण्यात आला. डावीकडे मा. अंकुश काकडे, मा. मंगेश तेंडूलकर, मा. बाबासाहेब पुरंदरे, मा. ज्ञानेश्वर खैरे, मा. शांतीलाल सुरतवाला इ.




विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने आयोजित लेखक वा. रा. गाणार यांच्या 'बुध्द बनाम गांधी', 'बहिष्कृत समाजोद्धारक : नानासाहेब गवई' व 'विविध शब्द लघुकोश' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डावीकडून : - डॉ. शशिकांत शर्मा, मा. संजय कोंडावर, मा. विजय जिचकार, मा. गिरिश गांधी, मा. उमेश चौबे, मा. सुधीर पाठक, मा. प्रकाश दुबे, लेखक वा. रा. गाणार इ.



विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित. ''महाराष्ट्राची पन्नास वर्षाची वाटचाल'' या व्याख्यान प्रसंगी मा. श्री. गिरीश गांधी डावीकडून श्री विजय जिचकार, श्री. मामासाहेब घुमरे, श्री निखील वागळे, डॉ. चंद्रभान भोयर



कोकण विभागीय केंद्र - रत्नागिरीच्या कार्यालयात महिलांना प्रशिक्षण देताना भोपाळ येथील डॉ. सुमेधा देशपांडे व श्री मेस्त्री व महिला प्रशिक्षणार्थी इ.

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

## ※ विश्वस्त मंडळ सदस्य ※

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. हुसेन दलवाई | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरूण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. डॉ. रवींद्र बापट | कोषाध्यक्ष |

६. मा. श्री. मोहन धारिया
७. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर
८. मा. प्रा. पी. बी. पाटील
९. मा. श्री. राम प्रधान
१०. मा. श्री. लक्ष्मण माने
११. मा. श्री. वसंतराव कार्लेकर
१२. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
१३. मा. सौ. सुप्रिया सुळे
१४. मा. श्री. दिलीप वळसे-पाटील
१५. मा. श्री. अजित निंबाळकर

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
१७. मा. श्री. एस. बी. धात्रक
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

## ※ कार्यकारिणी मंडळ सदस्य ※

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन. के. पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१४. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१५. मा. सौ. सुप्रिया सुळे
१६. मा. डॉ. वसंतराव पवार
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., शिरोळ
१९. मा. श्री. शामराव पा. पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्री सहकारी
साखर कारखाना लि., कराड (पदसिद्ध)
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख
२१. मा. श्री. माणिकराव पाटील
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. नितीन करीर
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

## ※ कार्यकारी समिती ※

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरूण गुजराथी
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. श्रीनिवास पाटील
७. मा. सौ. सुप्रिया सुळे

# विचारधन



''शेतीमध्ये अलीकडे नवे तंत्रविज्ञानही अनुसरण्यात येऊ लागले. त्यामुळे आपल्याला ग्रामीण भागात काही सुधारणा दिसून येत आहे. वीस वर्षांपूर्वीचे भारतीय खेडे आणि आजचे खेडे यांत बराच फरक आहे. त्यावेळी खेडेगाव उदास अन् उजाड दिसायचे. आता तेथे प्रगतीची चक्रे फिरत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे साहजिकच मनाला बरे वाटते. पण एवढ्यावरच समाधान मानून चालणार नाही. श्रीमंत शेतकऱ्याचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे, हे खरे आहे. परंतु अजूनही बहुसंख्य शेतकरी गरीबच राहिले आहेत. पडीक जमिनीचे पट्टेच्या पट्टे अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांचे भीषण दारिद्र्य अंतःकरण पिळवटून टाकणारे आहे. शेतीचा क्रमशः विकास होऊनही बहुसंख्य ग्रामीण जनता गरीबच राहावी, हे आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेपुढील सर्वात मोठे आणि महत्त्वाचे आव्हान आहे.''

**स्व. यशवंतराव चव्हाण**

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रं. |
|---|---|
| संपादकीय | ३ |
| स्व. यशवंतराव चव्हाण - लेख | ५ |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान - कार्यवृत्त | १० |
| अपंग हक्क विकास मंच - कार्यवृत्त | १४ |
| शिक्षण विकास मंच - कार्यवृत्त | १५ |
| यशस्विनी अभियान - कार्यवृत्त | १९ |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम - कार्यवृत्त | २१ |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ - कार्यवृत्त | २३ |
| सृजन - कार्यवृत्त | २४ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय - कार्यवृत्त | २५ |
| विभागीय केंद्र रत्नागिरी - कार्यवृत्त | २६ |
| विभागीय केंद्र नागपूर - कार्यवृत्त | २८ |
| विभागीय केंद्र औरंगाबाद - कार्यवृत्त | ३५ |
| कृषी सहकार व्यासपीठ व विभागीय केंद्र पूणे - कार्यवृत्त | ३७ |
| विभागीय केंद्र कराड - कार्यवृत्त | ४२ |
| विभागीय केंद्र नाशिक - कार्यवृत्त | ४५ |
| विभागीय केंद्र लातूर - कार्यवृत्त | ५३ |
| माहिती व तंत्रज्ञान प्रबोधनी - कार्यवृत्त | ५७ |
| प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने | ६० |



**वर्ष** : चौदावे

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे वार्तापत्र**

खाजगी विनामूल्य वितरणासाठी

- **प्रकाशन**
  १२ मार्च २०१०
  मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती
- **सल्लागार**
  **मा. शरद काळे**
  **मा. रवींद्र बापट**
  **मा. ज्ञानेश्वर खैरे**
- **मानद् संपादक**
  **दत्ता बाळसराफ**
- **उप संपादक**
  **सुरेश पाटील**
- **सहाय्यक**
  **मिनल सावंत**
  **अर्जुन बचुटे**

- **आभार**

संजय बनसोडे, अरूण शिंदे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, राऊत, स्मिता रायकर, महेश चौधरी, राजेंद्र रूपवते, शोभा लोंढे, प्रियंका देसाई, अनिल चिंदरकर, शमीम खान यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

**अंक** : २५वा

- **अक्षरजुळणी आणि छपाई**

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक श्री दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता,
**प्रिन्टो ग्राफी सिस्टम (इं.) प्रा.लि.**
२८ मुंबई समाचार मार्ग,
राजाबहादूर बिल्डींग, फोर्ट,
मुंबई-४०० ०२३.
फोन नं.: ४०७८ ५६५६
येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र,
जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - २१ येथे प्रकाशित केले.
नोंदणी क्र. ७१५८७/९९

# संपादकीय

स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री तसेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांना ९७ व्या जयंती दिनानिमित्त अंतःकरणपूर्वक अभिवादन. महाराष्ट्रात कृषी आणि औद्योगिक विकासाचा पाया घालणारे, महाराष्ट्रात सहकाराचे जाळे विणणारे आणि पंचायत राज्याच्या माध्यमातून तळागाळातल्या समाजाला त्यांच्या लोकशाही ताकदीचे भान देणारे ते द्रष्टे नेते होते. त्यांनी दिलेली दिशा आणि दृष्टी कैक पिढ्यांना मार्गदर्शक ठरणारी आहे. त्यांचे हे विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची स्थापना झाली आहे. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून वेगवेगळ्या विभागामार्फत घडणाऱ्या कार्यक्रमांचा लेखाजोखा या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. राज्यात प्रतिष्ठानची विविध ठिकाणी विभागीय कार्यालये असून त्यांच्यामार्फत घेण्यात आलेले विविध कार्यक्रम, परिषदा, मेळावे, चर्चासत्रे यांचा संक्षिप्त आढावा या अंकात घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षास सुरुवात झाली असून, पुरोगामी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याला अद्यापपर्यंत स्वतंत्र असे युवांसाठी कुठलेही धोरण नाही. प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने गेल्या दोन वर्षापासून युवा धोरणासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. मा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दोन वर्षापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने, महाराष्ट्र राज्यास स्वतंत्र युवा धोरण असावे अशी मागणी केली होती. महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाचा अंतिम मसुदा दि. १२ जानेवारी २०१० रोजी राज्य शासनास सादर करण्यात आला. याची योग्य ती दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने नुकतीच राज्याचे युवा धोरण कसे असावे यासाठी शासकीय समिती नियुक्त केली असून या समितीच्या निमंत्रित सदस्य म्हणून मा. सुप्रिया सुळे यांची नियुक्ती केली आहे. तर नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे विश्वास ठाकूर, निलेश राऊत, निलेश पुराडकर, मॅथ्यू मट्टम यांची या समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबद्दल या सर्वांचे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन.

याबरोबरच प्रतिष्ठानचे शिक्षण विकास मंच, यशस्विनी अभियान, अपंग हक्क विकास मंच, लिगल एड फोरम, महाराष्ट्र महिला व्यासपीठ, प्रतिष्ठानची विभागीय केंद्रे यांच्या मार्फत अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून त्यास समाजाचे व शासनाचे चांगले सहकार्य लाभले आहे. तसेच प्रतिष्ठानच्या सर्व विभागीय कार्यालयाच्यावतीने ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्त सर्व विभागीय पातळ्यावर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याची सविस्तर माहिती वार्तापत्रात समाविष्ट आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचा दि. ११ नोव्हेंबर हा जन्मदिवस. सन २००८ पासून केंद्र शासनाने हा दिवस **राष्ट्रीय शिक्षण दिन** म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवसाचे औचित्य साधून शिक्षण विकास मंचाच्यातीने मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या विषयावर एका राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या दिवशी राज्यातील प्राथमिक शिक्षणात नाविन्यपूर्व काम करणाऱ्या निवडक ग्रामशिक्षण समित्यांचा गौरव करण्यात आला तसेच 'शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी' या उत्कृष्ट शिक्षण विषयक ग्रंथास पुरस्कार देण्यात आला. अपंग हक्क विकास मंचाच्यावतीने दि. ४ आणि ५ जानेवारी २०१० रोजी विशेष सामर्थ्य व्यक्ती सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेचा सविस्तर अहवाल या अंकात समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्राची जडण घडण ही खऱ्या अर्थाने सामाजिक व सहकारी संस्थांच्या माध्यमातून झाली आहे. संस्था कोणतीही असो तिचे प्रशासन / व्यवस्थापन योग्य असेल तरच ती नावारुपाला येते. ही गोष्ट विचारात घेऊन नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि महाराष्ट्र महिला व्यासपीठ यांच्या विद्यमाने सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येणार आहे.

प्रतिवर्षी प्रमाणे दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार यंदा **ज्येष्ठ शिक्षण तज्ञ प्रा. यशपाल** यांना प्रदान करण्यात येत आहे. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी शुक्रवार दि. १२ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे मा. यशपाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या जीवन व कार्यविषयी नोंद असणारे सन्मानपत्र वार्तापत्रात समाविष्ट करण्यात आले आहे. त्यांच्या पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा !

आपला

(मानद संपादक)

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. राम प्रधान |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | डॉ. राम ताकवले |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | डॉ. जर्नादन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | डॉ. रा. सु. गवई |
| मुख्य कार्यालय | आर्थिक सल्लागार | श्री. ल. रा. खुपराव |
| सृजन | संकल्पना व संयोजिका | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. कुमुद बन्सल |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| अपंग हक्क विकास मंच | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. बी. डी. पवार |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशस्विनी अभियान | संयोजिका | सौ. सुप्रिया सुळे |
| वार्तापत्र | मानद् संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर - श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे.सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउन्टंट |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | प्रमुख लेखापाल | श्री. महेश चव्हाण |

Website : www.ybchavanpratishthan.org E-mail: ybchavan@bom3.vsnl.net.in

# स्वातंत्र्याचा पहिला दिवस

**स्व. यशवंतराव चव्हाण**

स्वातंत्र्य ! जी कालपर्यंत एक अमूर्त कल्पना होती, ती आज मूर्त स्वरूपात येत होती. जे, काल एक स्वप्न होते, ते आज सत्य ठरणार होते. जो, कालपर्यंत एक संकल्प होता, तो आज सिद्ध होणार होता. कालपर्यंत गुलाम असलेला एक देश आज स्वतंत्र होणार होता. पारतंत्र्याचा काळोख संपून स्वातंत्र्याची मंगलप्रभात आज उगवणार होती.

अननुभूत आनंदाचा तो एक दिवस, कृतार्थभावनेचा तो एक दिवस, आज अनेक वर्षानंतरही माझ्या डोळ्यांसमोर ताजा आहे. अनेक वर्षे झाली. कालगणनेचे चक्र चालू आहे. अव्याहत चालू आहे, त्याची नोंदच आहे ती. ती चुकेल कशी ? पण त्या दिवसाची आठवण झाली, की मनाचे हरिण केव्हाच त्या पवित्र दिवसापाशी जाऊन पोचते.

तो स्वातंत्र्यदिन लौकिकार्थाने दि. १५ ऑगस्ट खरा; पण दि. १४ ऑगस्टलाच आम्ही त्याच्या स्वागतासाठी सिद्ध झालो होतो. त्या दिवशी मध्यरात्री जुन्या सचिवालयाच्या इमारतीवर तिरंगा फडकणार होता. अधिकृत अशा त्या स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य कार्यक्रमाचे वेध, तसे म्हटले, तर सकाळपासूनच लागले होते. मी तेव्हा पार्लमेंटरी सेक्रेटरी होतो आणि त्या समारंभाला मला हजर राहावयाचे होते. आमचे बिऱ्हाड तेव्हा मरीन लाइन्सजवळ होते. येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ घरी तेव्हा खूप असायची. त्याही दिवशी सकाळपासून मित्रमंडळी येत जात होती. गप्पा-गोष्टी चालल्या होत्या. विषय स्वातंत्र्याचाच होता. माझे काही मित्र, स्वातंत्र्य-लढ्यातले माझे सहकारी मुंबईतला स्वातंत्र्यदिन-सोहळा पाहण्यासाठी मुद्दाम आले होते; तेही घरी होतेच. एका धन्यतेच्या भावनेने आम्ही स्वातंत्र्याबद्दल गोष्टी बोलत होतो. हा दिवस इतक्या लवकर पाहायला मिळेलसे आम्हाला बेचाळीस साली काही वाटले नव्हते. पण आज स्वातंत्र्याची पहाट झाली होती. ती कोवळी उन्हे अंगावर खेळवत असतानाच आम्हाला आमच्या स्वातंत्र्याच्या लढाईतील काही प्रसंग आठवत होते, काही सहकाऱ्यांची याद येत होती. स्वातंत्र्य मिळाले, आता पुढच्या जबाबदाऱ्या कोणत्या, त्याची चर्चा आम्ही करीत होतो.

गप्पागोष्टी चालल्या होत्या आणि माझ्या एका सहाकाऱ्याने आम्हाला जवळजवळ सोळा वर्षे मागे खेचून नेले. आम्ही साजऱ्या केलेल्या पहिल्या स्वातंत्र्यदिनाची आठवण निघाली होती. स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग, म्हणून लाहोर काँग्रेसमध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रस्ताव संमत झाला, त्या दिवशी, २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे आदेश काँग्रेसने दिले होते. १९३० सालची २६ जानेवारी जवळ येत चालली होती. कराडमध्ये हा स्वातंत्र्यदिन कसा साजरा करावयाचा, याचा आम्ही काही तरूण मंडळी विचार करीत होतो. मी तर तेव्हा वरच्या वर्गातला शाळकरी विद्यार्थीच होतो; पण काँग्रेसच्या चळवळीत स्वतःला लोटून दिलेले होते. समविचारांच्या युवकांत रंगून गेलो होतो. असेच आम्ही काहीजण कराडमधल्या एका छोट्या छापखान्यात जमलो होतो; २६ जानेवारीचाच विचार चालू होता. 'स्वातंत्र्याची हाक' देणारे एक बुलेटिन तयार करून, शाळेतून व चौकाचौकांतून वाटावे, अशी कल्पना पुढे आली आणि लगेच समंतही झाली. मी तेव्हा थोडासा लेखक होतो. शाळेतील निबंध वगैरे बऱ्यापैकी लिहीत असे. तेव्हा काही लिहिण्याचा प्रसंग आला, म्हणजे माझे सहकारी ते काम माझ्यावर टाकीत. त्या दिवशी लिहिलेली 'स्वातंत्र्याची हाक' लिहिण्याचे कामही माझ्यावर आले होते. त्या रात्री लिहिलेली 'स्वातंत्र्याची हाक' स्वातंत्र्याच्या त्या पहिल्या दिवशी व त्यानंतर आज कित्येक वर्षांनंतरही माझ्या कानांत खणखणते आहे.

त्या 'स्वातंत्र्याच्या हाके' तील शब्द तसेच्या तसे आज मला आठवणार नाहीत, हे खरे. पण त्यांचा आशय निश्चितच आठवतो आहे. म. गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या लढाईतील आम्ही सैनिक आहो. देशाच्या स्वातंत्र्यासाठी पडेल तो त्याग करावयास आम्ही सिध्द आहो. प्रसंगी आमचे प्राणही आम्ही अर्पण करणार आहो. असा तो प्रतिज्ञालेखच होता. तेव्हाच्या तारूण्यसुलभ उत्कट भावनेला शोभणारा. ती 'स्वातंत्र्याची हाक' आम्ही कराडच्या चौकाचौकांतून कशी वाटली, शाळेतील विद्यार्थ्यांना कशी दिली, याच्या आठवणी निघाल्या.

या आठवणींची उजळणी चालू असतानाची एक गोष्ट मला चांगलीच स्मरते. म.गांधीच्याबद्दल कृतज्ञतेच्या भावनेने आमची मने अगदी ओतप्रोत भरून आली होती. आम्ही स्वातंत्र्यदिन साजरा करीत होतो, पण आमचा स्वातंत्र्याचा सेनानी मात्र दूर नोआखलीमध्ये दंगलीत बरबाद झालेल्यांचे अश्रू पुसत होता. त्यांची

आठवण झाली आणि माझे मन गंभीर झाले. मी गांधीवादी केव्हाच नव्हतो; पण गांधीजींबद्दल एक अपरंपार श्रद्धा मनात वागवत होतो. इतरांप्रमाणेच मीही त्यांना केवळ लांबूनच पाहिलेले होते. प्रत्यक्ष परिचय नव्हताच, पण त्यांच्याबद्दल अत्यंत जवळीक वाटत होती. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही स्वातंत्र्याची लढाई लढली होती. बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी जनतेने निर्भय होऊन झुंज दिली होती, ती म.गांधींच्याच प्रेरणेने ! भारत स्वतंत्र होत असताना त्यांचे स्मरण पदोपदी येत होते. माझे लक्ष सहज माझ्या घरातील भिंतीवर गेले आणि मनातल्यां मनात मला शरमल्यासारखे झाले. माझ्या मुंबईच्या घरी म.गांधीचा फोटो सुद्धा नव्हता ! मन बेचैन झाले. चाललेल्या गप्पांतून लक्ष उडाले आणि सारखे वाटू लागले, हे काही खरे नाही. आज स्वातंत्र्यदिन आहे. आज आपल्या घरी म. गांधींची तसबीर आपण लावू या.

मनात आले आणि मी हळूच घरातून बाहेर पडलो. कोणाशीही न बोलता, कोणालाही न सांगता, मरीन लाईन्स स्टेशनजवळचा रेल्वेवरचा ओव्हरब्रिज ओलांडला आणि चालत चालतच ठाकुरद्वार नाक्यावर पोचलो. रस्ता गर्दीने दुथडी वाहत होता. पण माझे गर्दीकडे लक्षच नव्हते. मी फ्रेममेकरचे दुकान शोधत होतो. एक दुकान सापडले. तिथे मिळाला, तो म.गांधींचा एक फोटो मी घेतला आणि घराकडे निघालो. हातात म.गांधींची ती तसबीर होती; आणि मनात त्यांच्याबद्दलची अपरंपार कृतज्ञता होती. त्यांचाच विचार करीत मी चाललो होतो. घरी आलो आणि माझ्या अभ्यासिकेत तो फोटो मी लावला, तेव्हा माझे मन थोडे शांत झाले.

आज बरीच वर्षे लोटली. मरीन लाईन्समधून आम्ही मलबार हिलवर गेलो, आणि गेली काही वर्षे आमचे बिऱ्हाड दिल्लीला आहे. घराच्या जागा बदलल्या. कालमानानुसार घरातले फर्निचर बदलले. अनेक कलावस्तूंचीही भर पडली. पण बदलली नाही, अशी एकच वस्तू म्हणजे म.गांधींचा तो फोटो.

या फोटोचा विषयच निघाला, म्हणून सांगायला हरकत नाही. सौ. वेणूबाईंची त्या फोटोवर अपरंपार श्रद्धा जडलेली आहे. का, कोणास ठाऊक, त्या फोटोला ती कधीही नजरेआड होऊ देत नाही, फुटू नये, म्हणून तिने त्याची काच काढून ठेवली आहे, प्रवासाला निघाली, तर म.गांधींची ती तसबीर तिच्या सामानात हलक्या हाताने, कपड्याच्या घडीत जपून ठेवलेली असते.

म. गांधींची तसबीर लावली आणि थोड्याच वेळात एक सभेसाठी मी भायखळ्याला गेलो. जागा आता नक्की आठवत नाही. पण बहुधा डिलाईल रोडवरील चाळ असावी. सातारा जिल्ह्यातील कामगारांनी स्वातंत्र्यदिनाची सभा ठेवली होती. एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून स्वातंत्र्यदिनाच्या त्या सभेत भाग घेताना मला अतिशय आनंद झाला होता. माझे भाषण लोकांना कसे वाटले, कोणाला ठाऊक, पण मला ते अजून आठवते आहे. एका भारावलेल्या मनःस्थितीत मी भाषण संपवून बसलो होतो. म.गांधींच्या तसबिरीचा विषय ताजा होता. म.गांधींच्या नेतृत्वाबद्दल, त्यांच्या शिकवणुकीबद्दल त्या सभेत मी बरेच काही सांगितले. त्या दिवशी मी अगदी गांधीमय होऊन गेलो होतो.

सभा संपवून मी घरी निघालो. रात्रीच्या मुख्य समारंभाला हजर राहण्याची घाई होती. सभेला मी आलो, तेव्हा ध्यानात न आलेली एक गोष्ट आता दिसत होती. लोकांचे जथेच्या जथे आनंदोत्सवात भाग घेण्यासाठी निघाले होते. रोशणाई झाली होती. स्वातंत्र्याचे वारे संचारले होते. एक गुलाम देश स्वतंत्र झाला होता. आजच्या पिढीला या आनंदाची कल्पना सांगूनही येणार नाही. एक प्रकारच्या बेहोशीतच मी घरी पोचलो होतो. स्वातंत्र्य घोषित व्हायला आता अवघे दोन तास उरले होते. उत्कंठा, औत्सुक्य, उत्साह, समाधान इत्यादी भावनांचे अमृतमय रसायन या दोन तासांत इतके उदंड भरले होते, की विचारू नका. थोड्याच वेळाने जुन्या सचिवालयात मी पोचलो. ओव्हल मैदानाच्या बाजूला जी चिंचोळी बाग, त्या बागेत आम्ही उभे होतो. बाळासाहेब खेर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. जुन्या सचिवालयाच्या पोर्चवर त्यांनी राष्ट्रध्वज फडकावला, विश्वविजयी प्यारा तिरंगा वायुलहरींवर डोलू लागला. भारत स्वतंत्र झाल्याची ती निशाणी होती. ध्वजवंदन झाल्यावर, मला वाटते, बाळासाहेब खेरांचे थोडा वेळ भाषण झाले. आज त्या भाषणातले मला काहीच आठवत नाही. झेंडावंदनाच्या वेळची धुंदी, हर्ष मात्र, आज अनेक वर्षे झाली, तरी डोक्यात घर करून बसला आहे. पुढे अनेक महत्त्वपूर्ण प्रसंगी झेंडावंदने झाली. मी राज्याचा मुख्यमंत्री झालो, तेव्हा झेंडावंदन झाले. संरक्षणमंत्री म्हणून लाल किल्ल्यावर होणाऱ्या झेंडावंदनाच्या समारंभाचे यजमानपदही मी भूषविले. पण जुन्या सचिवालयाच्या छोट्याशा हिरवळीवर झालेले स्वतंत्र भारतातील पहिले झेंडावंदन अजूनही आठवते.

आठवण झाली, की अजून मन मोहरून येते हृदय भरून येते. देह पुलकित होतो. या झेंड्याला स्वतंत्र भारताच्या नभांगणात फडकलेला पाहावा, म्हणून जी लढाई झाली, तीमधील मी एक साधा सैनिक. हा झेंडा खांद्यावर घेऊन शाळकरी जीवनात मिरवणुका काढल्या. पोलिसांची कडी तोडून या झेंड्याचा सन्मान राखण्यासाठी मार खाल्लेला मी एक शिपाई आज कृतार्थपणे त्या झेंड्याचे वैभव पाहत होतो. भारत स्वतंत्र झाला होता. एक संकल्प सिद्ध झाला होता, स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवशी हे स्वातंत्र्य सार्थ करण्याचे नवे संकल्प मनात डोकावत होते.

खरे म्हणजे, हे संकल्प तसे नवे नव्हते. स्वातंत्र्याच्या चळवळीत आम्ही ओढले गेलो होतो, ते काही नुसत्या स्वातंत्र्याच्या भावनात्मक कल्पनेने नाही; आणि केवळ भौगोलिक कल्पनेनेही नाही. स्वातंत्र्याचा राजकीय, सामाजिक व आर्थिक अर्थ हा ध्येयरूपाने मनात वागविला होता. म्हणूनच झेंडावंदन संपवून घरी परतताना मी विचारमग्न झालो होतो. हे संकल्प सिद्ध होतील का? स्वातंत्र्याचा सामाजिक व आर्थिक समतेचा अर्थ प्रत्यक्षात उतरेल का ? डोक्यात काहूर उठले होते. मन असे सांशक का होते ? त्यालाही काही कारणे घडली होती. पंधरा ऑगस्टला देश स्वतंत्र झाला; पण तो लौकिकार्थाने. कारण सत्ता त्यापूर्वीच हाती आली होती. १९४६च्या निवडणुकीत आमचा पक्ष विजयी झाला होता व प्रांतिक सरकारे स्थापन झाली होती. गेले काही महिने आम्ही सत्ता राबवतच होतो. लोकांशी आमचे संबंध येत होते. आमच्या कारभाराबद्दल बरी-वाईट मते ऐकायला मिळत होती; आणि सत्तेचा हा अनुभव काही फारसा उत्साहवर्धक नव्हता. चालला आहे, असा कारभार जर चालू राहिला, तर स्वातंत्र्याचे जे अर्थ अभिप्रेत आहेत, ते साकार होतील का, असे वाटू लागले होते. पक्षाच्या बैठकीत झालेल्या चर्चा आठवत होत्या; आणि त्या वेळच्या प्रांतिक नेतृत्वाने घेतलेल्या भूमिकांबद्दल नाराजी वाढू लागली होती. कार्यकर्ते उघड बोलू लागले होते.

मला एकदम महारवतन रद्द करण्यासंबंधी झालेला वादविवाद आठवला. १९४६च्या अखेरीस महाराष्ट्रभर महारवतन रद्द करण्यासंबंधी मोठी चळवळ झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या त्या चळवळीला माझा मनापासून पाठिंबा होता. पक्षाच्या बैठकीत, प्रांतिकच्या नेत्यांजवळ मी चर्चा केली होती. महारवतन रद्द करा, असे मागणे घेऊन जेव्हा प्रचंड मोर्चा आला, तेव्हा, आपण वतने नष्ट करण्याची घोषणा करू या, असे मी सुचविले होते. पण मला मिळालेला प्रतिसाद निराशाजनक होता. पुढे मी मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्या काही दिवसांतच आम्ही महारवतने नष्ट केली; त्याची पार्श्वभूमी इतकी जुनी होती.

साशंकतेचे आणखी एक कारण होते. ते म्हणजे कारभारावरील अधिकारीवर्गाच्या पकडीचे. तेव्हाचे मुरब्बी अधिकारी होते कार्यक्षम, हुशार, पण सत्तांतरापलीकडे स्वातंत्र्याचा जो अर्थ आम्हाला अभिप्रेत होता, त्याच्याशी ते समरस झालेले नव्हते. होण्याची शक्यता दिसत नव्हती व तसा विश्वास वाटत नव्हता. त्या वेळी घडलेले काही प्रसंग, काही पेचप्रसंग, अधिकाऱ्यांशी झालेले वाद आठवत होते.

आणखी काही लोकांची सत्तेवर पकड वाढणार, की काय, अशी भीती वाटू लागली होती. आम्ही जेव्हा लढत होतो, तेव्हा ज्यांचे चेहरे कधी दिसले नव्हते, त्यांच्या अंगांवर खादीचे कपडे चढले होते. सत्तेच्या नेहमीच जवळ वावरणारे हे लोक आमच्या पक्षात दिसू लागले होते. थोड्याच वेळापूर्वी असे काही चेहरे सचिवालयाच्या हिरवळीवर पाहिलेले नजरेसमोर येत होते आणि स्वातंत्र्याचा अर्थ हे लोक सार्थ करू देतील का, असे वाटत होते.

या सगळ्याचा परिणाम पक्षावर होताना मला स्पष्ट दिसत होता. पक्षात जोरात वादविवाद चालू झाले होते. नुकतीच आमच्या गप्पांत झालेली चर्चा ताजी होती. काही कार्यकर्त्यांच्या बैठका झाल्याच्या बातम्या येत होत्या. त्यांचे वृत्तान्त कळत होते. निमंत्रणे मिळत होती. एकीकडे आता जो शेतकरी कामगार पक्ष म्हणून प्रसिद्ध आहे, त्याच्या स्थापनेची तयारी चाललेली दिसत होती. काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचे पायही रिंगणाबाहेर पडणार, असे वाटू लागले होते. पक्षांतर्गत संघर्षाची चाहूल लागली होती.

या सगळ्या गोष्टी, विचाराच्या आवर्तात घोंगावत होत्या; पण त्याच वेळी म.गांधी, पं.नेहरू यांच्या नेतृत्वाचा आधार वाटत होता. स्वातंत्र्ययुद्धाचे हे सेनानी, ज्यांनी राजकीय बदल घडविला, ते आर्थिक व सामाजिक बदल घडविल्याशिवाय राहणार नाहीत, असे मनोमन वाटत होते. तोच दिलासा होता. तेच सामर्थ्य होते. आतापर्यंतच्या निराशेच्या ढगातून प्रकाशाची रूपेरी कडा या दोघां नेत्यांच्या स्मरणातून मनात चमकून गेली आणि मनाला थोडी स्वस्थता मिळाली. विश्वासाने मी स्वतःशीच म्हणालो:

चला, पहिली मजल संपली, एक चढ चढून आलो, आता पुढल्या चढाईची वाटचाल सुरू.

**(ऋणानुबंध या ग्रंथातून साभार)**

# YASHWANTRAO CHAVAN NATIONAL AWARD FOR NATIONAL INTEGRATION, DEMOCRATIC VALUES OR SOCIAL AND ECONOMIC DEVELOPMENT IN INDIA, 2009

## CITATION

### Shri Yash Pal

Prof. Yash Pal is an eminent Scientist, who has delved deep into the field of basic science and possesses an enviable felicity in communicating the results of scientific endeavour to the common man, for whom science is otherwise an enigma wrapped in mystery. Life in the world of today requires a holistic view which will take account of not only the scientific theories and technological inventions but also of several human issues. In such times, a fundamental scientist who can build bridges between science and the common man is like a breath of fresh air.

Prof. Yash Pal was born on 26th November, 1926 at Jhang which is now in Pakistan. Distinguished Physicist, Abdus Salam, who won the Nobel Prize for Physics, was also born in Jhang and both of them did their Matriculation from Punjab University, Lahore. On the eve of Partition, Prof. Yash Pal's father was transferred to Delhi where he completed, with distinction, Master's degree under the aegis of Punjab University. In 1949, Prof. Yash Pal moved to Mumbai to join the Tata Institute of Fundamental Research (TIFR).

Prof. Yash Pal worked closely with a colleague, Shri Devendra Lal and Prof. Bernard Peters, a famous cosmic ray physicist. The Lal-Pal-Peters papers relating to nuclear emulsion stacks carried up on rubber balloons and the discoveries relating to strange particle physics had created a stir in scientific circles. His work in this field was of a pioneering nature and he has been called the father of 'high energy physics and astro physics' in India. He went to USA to pursue higher studies in Massachusetts Institute of Technology where he was a student of Prof. Bruno Rossi. He returned to TIFR after the award of a Ph.D in physics from MIT in 1958.

After the untimely death of Vikram Sarabhai in 1973, Prof. Yash Pal was persuaded to take over as Director, Space Application Center at Ahmedabad (S.A.C.). The important task before S.A.C. was to realize the concept of Satellite Instructional Television Experiment (SITE) – the largest social experiment – using NASA's (National Aeronautics and Space Administration) ATS-6 satellite positioned over India. It was necessary to learn to develop and build two major Earth stations, to design, develop and fabricate thousands of direct reception sets alongwith their low noise amplifiers and antennas and to deploy them in distant clusters of villages across a distance of a few thousand kilometers. One could not buy any of these systems anywhere in the country or abroad.

Prof. Yash Pal's brilliant conceptualization and execution of the SITE project rightfully earned for him the Marconi International Fellowship in 1980 which is the highest international award in the field of communication. In a tribute to his work at SAC, Shri Narayan Murthy has said that "if we have today a vibrant, effective television media by any global standards, it is because of SITE". He guided and nurtured S.A.C for eight years and during this tenure he also placed the remote sensing activity on a sound foundation.

It was under his leadership that the Satellite Telecommunication Experimental Project (STEP) was undertaken using a Franco-German satellite during 1977-79. SITE and STEP paved the way for implementing Indian National Satellite System (INSAT) which is providing a variety of services in telecommunication, television, meteorology and disaster warning.

In 1981-82, he was the Secretary General at the United Nations for an international programme for the peaceful uses of outer space. On his return to India, he worked with the Planning Commission as Chief Consultant (1983-84), Secretary

of the Department of Science and Technology (1984-86) and then as Chairman of the University Grants Commission (1986-91).

As the Chairman of UGC, he realized that the universities had lagged behind in the development of overall research programmes in the country which were largely confined to the autonomous research institutions of the various departments of the Government of India. This imbalance had to be redressed by creating resource centers of excellence in the university sector. It is this concept of inter-university research centers that led to the setting up of IUCAA (Inter University Center for Astronomy and Astrophysics) at Pune University.

He was keen on harnessing information technology for facilitating access of universities to libraries. This resulted into what is known today as the INFLIB NET. He was responsible for initiating the 'Countrywide Classroom' project, under which Educational Media Research Centers and Audio-visual Research Centers were established in numerous Indian universities. Many years later, he canvassed support of the Ministry of Higher Education for a five year education programme after 10+2 schooling of selected students, similar to IITs but in the field of basic science and related disciplines by intergrating teaching and research. This has now resulted in the establishment of the Indian Institutes of Science and Research at Pune and Kolkata.

Currently, the Report given by him in 1993 on education is being seriously considered for action and implementation. There is much talk about the burden on children of the school bag. However, Prof. Yash Pal has rightly pointed out that the more pernicious burden is that of non-comprehension. He has observed that we are still the world's most illiterate country. Not more than one percent of our people get to study rudiments of science at college level. Unless the social base of scientific knowledge is broadened, the dreams of India becoming a great science power would remain elusive.

Prof. Yash Pal has been a recipient of several coveted honours and awards. To mention just a few of them, in 1976 he was awarded the Padma Bhushan by the Government of India for contribution to science and space technology, the Marconi International Fellowship Award in 1980, Aurther C. Clarke award for communication and space technology in 1984, the Asiatic Society's Sir William Jones Memorial Gold Medal in 1996 and the NCSTC award for best effort in science popularization in 2000. He has been a National Research Professor and National Mahatma Gandhi fellow. He has been awarded honorary degrees of Doctor of Science by a number of Universities. He has a large number of scientific publications to his credit but, perhaps, he is better known for the science magazine TV series "Turning Point" and "Bharat ki Chaap". As some one has aptly remarked, he is the Carl Sagan of India.

The Yashwantrao Chavan Pratishthan is proud to have the privilege of conferring the Yashwantrao Chavan National Award 2009 on Prof. Yash Pal for his outstanding contribution to national integration, democratic values and socio-economic development of India.

| | | |
|---|---|---|
| Mumbai | Mrs.(Justice) Sujata Manohar (Retd.) | Sharad Pawar |
| 12th March 2010 | Chairperson | President |
| | Panel of Jury | Yashwantrao Chavan Pratishthan |

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
## कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर, संघटक श्री. निलेश राऊत हे पाहतात. तर कार्यालयीन संघटक म्हणून श्री. सुरेश पाटील व मिनल सावंत सहाय्यक म्हणून काम पाहतात.

**उत्तर प्रदेश-युवा धोरणासंदर्भात बैठक (दि. २६ सप्टेंबर ०९)**

उत्तर प्रदेशातदेखील आतापर्यंत राज्य युवा धोरण जाहीर करण्यात आलेले नसून या संदर्भात उत्तर प्रदेशमधील सहयोग या संस्थेमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. सहयोग या संस्थेचे उत्तर प्रदेशातील बारा जिल्ह्यांमध्ये युवा व महिलांमध्ये कार्य असून या अंतर्गत यांनी ५,००० युवांचे नेटवर्क उभे केलेले आहे. उत्तर प्रदेश युवा धोरणाच्या जाहीरनाम्यासंदर्भात सहयोग संस्थेने त्यांच्या दिल्ली येथील कार्यालयात बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस चेतना (गुजरात, राजस्थान), पीएफआय (छत्तीसगढ, झारखंड, बिहार), तसेच दिल्ली येथील काही संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी विविध राज्यांतील प्रतिनिधींनी आपापल्या धोरणाच्या जाहीरनामा व मसुद्याच्या रचनेसंदर्भातील सादरीकरण केले. नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमाचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. तसेच उत्तर प्रदेश युवा धोरण जाहीरनाम्यासंदर्भात सहयोग संस्थेतर्फे सल्लागार समिती स्थापन करण्यात आलेली असून या समितीमध्ये नवमहाराष्ट्र युवा अभियानाचा समावेश करण्यात आलेला आहे. पुढील काळात त्यांना लागणारी मसुद्यासंदर्भातील तसेच आपल्याकडील आकडेवारीसंदर्भातील मदत यावेळी करण्याचे ठरले.

**दि. ८-९ नोव्हेंबर ०९ कार्यशाळा (मुंबई)**

महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमांतर्गत जिल्हा कार्यशाळांच्या आयोजनासंदर्भात दि. ८-९ नोव्हेंबर ०९ रोजी मुंबई येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये राज्यभरात घ्यावयाच्या जिल्हा कार्यशाळांच्या आयोजनासंदर्भात आराखडा तयार करण्यात आला. जिल्हा कार्यशाळांचा उद्देश, पूर्वतयारी, कार्यशाळेचे वेळापत्रक, अहवाल या संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले.

**विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात मंत्रिमहोदय व आमदारांच्या भेटी (सोमवार ते बुधवार, दि. १४ ते १६ डिसेंबर ०९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या शिष्टमंडळाने सोमवार ते बुधवार, दि. १४ ते १६ डिसेंबर ०९ दरम्यान विधानभवन, नागपूर येथे हिवाळी अधिवेशनात राज्याच्या विविध मंत्री व सर्वपक्षीय आमदारांच्या भेटी घेतल्या. राज्याला युवा धोरण जाहीर करण्यासंदर्भात सर्वपक्षीय आमदारांचे एकमत व्हावे याकरिता नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या शिष्टमंडळाने मंत्रीमहोदय व सुमारे शंभर आमदारांशी चर्चा करण्यात आली. निवेदन व राज्य युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा सादर करुन राज्य युवा धोरण जाहीर करण्यासाठी सांसदीय पातळीवर पुढाकार घ्यावा, असे साकडे मंत्रीमहोदय व आमदारांना घातले.

मंत्रिमहोदय व सर्वपक्षीय आमदारांच्या भेटी घेण्यासाठी शिष्टमंडळाची दोन गटात विभागणी करण्यात आली. त्यानुसार प्रत्येक गटात एक टीम लीडर आणि एक संपर्क व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली. तीन दिवसात प्रत्येक गटाने ज्या-ज्या आमदारांच्या भेटी घेतल्या, त्यांची माहिती एसएमएसद्वारे दुसऱ्या गटाला कळवायची जबाबदारी संपर्क व्यक्तीची होती. त्यानुसार मंत्री व सर्वपक्षीय आमदारांची वेळ मागून घेऊन त्यांच्याशी महाराष्ट्र राज्याला युवा धोरण जाहीर करण्यासाठी पुढाकार घेण्यासंदर्भात साकडे घालण्यात आले. नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे युवा धोरण उपक्रमांतर्गत आतापर्यंतच्या कामाची माहिती देऊन प्रत्येक मंत्रीमहोदय व आमदाराला युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा व युवा धोरण जाहीर करण्यासंदर्भातील निवेदन शिष्टमंडळाकडून सादर करण्यात आले. पुढील काळात राज्य मंत्रिमंडळ व विधानभवनात सदरील धोरणाचा मसुदा संबंधित खात्यामार्फत मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने राज्य युवा धोरण जाहीर करावे आणि क्रीडा व युवक कल्याण खात्यामार्फत त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, यासाठी मा. मंत्रीमहोदय व मा. आमदारांनी सांसदीय आयुधे वापरावीत, अशी विनंती अभियानातर्फे

करण्यात आली. शिष्टमंडळात नीलेश राऊत, अभिजित राऊत, अभिजित खानविलकर, डॉ. अमित नागरे, विवेक घोगरे, महेश पवार, अविनाश नागरे, निशांत वाघमारे, मंगेश महामुने यांचा समावेश होता.

**विविध जिल्हा कार्यशाळा (नोव्हेंबर-डिसेंबर ०९)**

महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमासंदर्भात राज्यातील युवा व या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींकडून प्राथमिक मसुद्यावर सूचना याव्यात, यासाठी जिल्हा कार्यशाळांचे विविध जिल्ह्यांमध्ये नोव्हेंबर व डिसेंबर ०९ या महिन्यांमध्ये आयोजन करण्यात आले होते. पुणे, मुंबई, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलडाणा, ठाणे, नांदेड, सातारा, सिंधुदुर्ग, यवतमाळ, हिंगोली, लातूर या ठिकाणी नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा तयार करताना या कार्यशाळांमधून प्राप्त झालेल्या विविध सूचनांचा विचार करण्यात आला.

**राज्यस्तरीय युवा परिषद (मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१०)**

मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य युवा धोरण अंतिम मसुदा जाहीरनामासंदर्भात राज्यस्तरीय युवा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेसाठी क्रीडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री मा. ना. सुरेश शेट्टी, राज्यमंत्री मा. ना. भास्कर जाधव, मा. सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श. गं. काळे, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संचालक वसंतराव वैद्य यांची उपस्थिती होती.

यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने तयार करण्यात आलेला महाराष्ट्र राज्याच्या युवा धोरणाचा अंतिम मसुदा शासनास सादर करण्यात आला. कार्यक्रमामध्ये बोलताना महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होत असतानाही राज्याला स्वतंत्र युवा धोरण नसल्याची खंत मा. ना. सुरेश शेट्टी व मा. ना. भास्कर जाधव यांनी व्यक्त केली. या संदर्भात सकारात्मक पाऊल उचलून लवकरच शासकीय पातळीवर समिती गठित करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

राज्याला युवा धोरणाची असलेली निकड प्रतिपादन करताना खा. सुप्रिया सुळे म्हणाल्या, की शासनाकडून या संदर्भात सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे. महिला आयोग, बाल आयोग यांच्या धर्तीवर राज्य युवा आयोगाची निर्मिती करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी विविध विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनीही पक्षीय मतभेद बाजूला सारुन राज्य युवा धोरणाला पाठिंबा दर्शविला. खा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली निरंजन डावखरे, महेश तपासे, अभिजित पानसे यांनी शासनास युवा धोरणाचा अंतिम मसुदा सादर केला.

अभिजित पानसे, निरंजन डावखरे, महेश तपासे यांनी पक्षीय अभिनिवेश बाजूला सारून राज्य युवा धोरणासाठी पाठिंबा दर्शविला. अभिजित पानसे यांनी युवा धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. निरंजन डावखरे यांनी युवा धोरणाचे महत्व प्रतिपादित केले. महेश तपासे यांनी युवा धोरणाची उद्दिष्टे काय असावीत, याविषयी अपेक्षा व्यक्त केल्या.

महाराष्ट्र राज्य युवा धोरण जाहीरनामा उपक्रमांतर्गत यापूर्वी युवा धोरणाचा प्राथमिक मसुदा तयार करुन तो राज्य शासनाने दि. ८ ऑगस्ट ०९ रोजी सादर करण्यात आलेला आहे. प्राथमिक मसुदा तयार करण्याकरिता सुमारे २५ जिल्ह्यांमध्ये जिल्हा कार्यशाळा, युवा परिषदांचे आयोजन करुन युवांना व जाणकारांना या प्रक्रियेमध्ये सामील करुन घेण्यात आले आहे. या संदर्भात सांसदीय पातळीवर सर्वपक्षीय मतैक्य घडवून आणण्याकरिता नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या शिष्टमंडळाने नागपूर येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान विधानभवन परिसरात दि. १६ ते १८ डिसेंबर ०९ रोजी मंत्रीमहोदय व सर्वपक्षीय आमदाराच्यां भेटी घेतल्या. प्राथमिक मसुदा तयार झाल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया व सूचना मिळण्याकरिता पुनःश्च एकदा राज्य पातळीवर २० जिल्ह्यांमध्ये कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या मसुद्यावर राज्यभरात चर्चा घडवून आणून सर्व सूचनांचा समावेश करुन राज्य युवा धोरणाचा अंतिम मसुदा तयार करण्यात आलेला आहे.

यावेळी अभियानाकडून आगामी उपक्रमाची घोषणा करण्यात आली. नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे तीन कलमी कार्यक्रम पुढील काळात हाती घेण्यात येणार असून या अंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजना, युवा अभिसरण मोहीम, युवा साहित्य संमेलन या संदर्भातील उपक्रम व प्रयोगांचा यामध्ये समावेश असणार आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य युवा धोरणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे हँड प्रिंट कॅम्पेन प्रतिष्ठानच्या आवारात घेण्यात आले. यामध्ये मंत्रिमहोदय, अभियानाचे कोअर टीम सदस्य, पदाधिकारी व सर्वच मान्यवरांनी सहभाग नोंदवून राज्य युवा धोरणाला पाठिंबा दर्शविला.

श. ग. काळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. नीलेश राऊत यांनी सूत्रसंचालन केले. विश्वास ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या परिषदेमध्ये राज्यभरातून मोठ्या प्रमाणात युवक-युवती सहभागी झाले होते.

**राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्रदान कार्यक्रम (मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१०)**

मंगळवार, दि. १२ जानेवारी २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले होते. कार्यक्रमासाटी क्रीडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री मां. ना. सुरेश शेट्टी, राज्यमंत्री मा. ना. भास्कर जाधव, मा. सुप्रिया सुळे, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श. ग. काळे, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संचालक वसंतराव वैद्य यांची उपस्थिती होती.

यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार - कृष्णा पाटील (५१ हजार रु. सन्मानपत्र व सन्मानचिन्ह), यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार - परेश ज. म. (११ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह), यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार - हंसराज पाटील (युवक) (११ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह), यशवंतराव चव्हाण युवा क्रीडा पुरस्कार - लतिका माने (युवती) (११ हजार रु., सन्मानपत्र व सन्मानचिन्ह) यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुरस्कारार्थींचे मान्यवरांकडून कौतुक करण्यात आले. पुरस्कारार्थींनी मनोगते व्यक्त केली.

**राज्य शरीरसौष्ठव निवड चाचणी स्पर्धा (शुक्रवार, दि. २७ डिसेंबर ०९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व प्रेरणा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. २७ डिसेंबर ०९ रोजी इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रातील पटांगणात यशवंतराव चव्हाण क्रीडा नगरीत राज्य शरीरसौष्ठव निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत चिपळूणच्या राजेंद्र मोडक यांनी रत्नागिरी प्रेरणाउदय व रत्नागिरीच्या वैभव कांबळे याने रत्नागिरी प्रेरणाश्री तर चिपळूणच्या अशोक चव्हाण याने रत्नागिरी प्रेरणा श्रीमानचा बहुमान पटकावला. यात बेस्ट पोज ओंकार घोसाळे, उगवता तारा अनिकेत दहीवलकर यांची निवड करण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्टानचे कोकण विभागीय अध्यक्ष राजाभाऊ लिमये यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राजू देवळेकर, हर्षदा भोसले, युगंधरा राजेशिर्के, शशिकांत मोदी, बापू काणे, राजेश खेडेकर, प्राची शिंदे, अभिजित खानविलकर उपस्थित होते. स्पर्धेत जिल्ह्यातील १०५ स्पर्धक सहभागी. यामध्ये प्रेरणा उदय, प्रेरणाश्री, प्रेरणा श्रीमान या तीन गटात झालेल्या स्पर्धेत ४३ जणांची राज्य निवड चाचणीसाठी निवड करण्यात आली. उपाध्यक्ष- महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन' माजी आमदार श्री. रमेश कदम यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन सुशांत चाळके यांनी केले. आभार सिध्देश लाड यांनी मानले. यावेळी ठाणे महापौर दुहेरी मुकुट विजेता महेश पाटील, भारत उदय विजेता लक्ष्मीकांत म्हात्रे यांनी विविध प्रात्यक्षिके दाखवली.

**महिला आरोग्य स्वराज्य योजनेचा शुभारंभ (शुक्रवार, दि. २९ जानेवारी २०१०)**

शुक्रवार, दि. २९ जानेवारी २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान-मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान व ध्येय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कुडाळ ग्रामीण रुग्णालय येथे आयोजित महिला आरोग्य स्वराज्य योजनेचा शुभारंभ अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सावंतवाडी-कुडाळचे आमदार दीपक केसरकर, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा श्रीमती उषाताई दराडे, दत्ता बाळसराफ, विजय कान्हेकर, नीलेश राऊत, उमाकांत जगदाळे, अभिजित खानविलकर यांची उपस्थिती होती.

महिला आरोग्य योजनेअंतर्गत यावेळी २५०० महिलांची नोंदणी करण्यात आली. नोंदणी झालेल्या महिलांच्या आरोग्याची तपासणी करुन कुडाळ ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने पहिल्या दिवशी ७ नेत्रशस्त्रक्रिया पार पाडण्यात आल्या. या योजनेमध्ये सहभागी महिलांवर आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. ज्या महिलांवर गंभीर शस्त्रकियांची

आवश्यकता आहे, त्यांना मिरज येथे पाठविण्यात येणार आहे. यासाठी त्यांना सर्व खर्च शासनाकडून पुरविण्यात येणार आहे.

यावेळी मिरज, कोल्हापूर, पुणे, सांगली, सिंधुदूर्ग, रत्नागिरी येथील नामांकित डॉक्टरांनी महिला रुग्णांची तपासणी करुन त्यांना आरोग्यविषयक सल्ला दिला. ग्रामीण भागातील महिलांनी या योजनेला प्रतिसाद दिला.

**कोकणातील युवकांची सद्यःस्थिती - परिसंवाद (शुक्रवार, दि. २९ जानेवारी २०१०)**

शुक्रवार, दि. २९ जानेवारी २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान व ध्येय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने नात पै डी.एड. महाविद्यालयात कोकणातील युवकांची सद्यःस्थिती या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अभियानाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे, एमकेसीएलचे चेअरमन विवेक सावंत, वरिष्ठ पत्रकार कुमार कदम, निवासी उपजिल्हाधिकारी दिलिप पांढरपट्टे, कालनिर्णयचे शेवाळकर यांची उपस्थिती होती.

यावेळी कोकणातील युवकांच्या सद्यःस्थितीवर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. परिसंवादात कोकणातील युवांचा रोजगार, शैक्षणिक स्थिती, आयटी क्षेत्रातील संधी, युवांपुढील समस्या, पर्यटन आणि कृषी क्षेत्रातील करिअरच्या संधी या संदर्भात विवेचन करण्यात आले. शेवाळकर यांनी सूत्रसंचालन केले. परिसंवादात रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील सुमारे १००० युवांनी सहभाग नोंदविला होता.

**देशाची सुरक्षितता आणि तरुणांची भूमिका (विशेष पोलीस महानिरीक्षक सुरेख खोपडे यांचे व्याख्यान)**

देशाची सुरक्षितता आणि तरुणांची भूमिका या विषयावर विशेष पोलीस महानिरीक्षक मा. सुरेश खोपडे यांचे व्याख्यान विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-नवमहाराष्ट्र युवा अभियान व निसर्ग ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ७ फेब्रुवारी २०१० रोजी पाटील मंगल कार्यालय, बदलापूर येथे सुरेश खोपडे यांचे व्याख्यान व प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीधर पाटील, ऋतुराज जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिरानंद नेमिचंद वाचनालय, सोलापूर येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - नवमहाराष्ट्र युवा अभियान व जिल्हा श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस आयुक्त भूषणकुमार उपाध्याय, उपायुक्त श्याम देगावकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे सोलापूर विभागीय केंद्राचे संघटक दिनेश शिंदे, मोहल्ला कमिटीचे सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

नवमहाराष्ट्र युवा अभियान व श्रमिक पत्रकार संघ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यान श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी सलील देशमुख, संजय लोखंडे, श्रेयस बोडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सुमारे दोनशे महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

आपण ज्ञानीही व्हा व शहाणेही व्हा. ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे असे सुचविलेले आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वाच्या दृष्टीने करून घेणे अत्यंत आवश्यक असते. परंतु त्या ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याच जे शास्त्र आहे त्याचे नाव शहाणपण असे मी समजतो. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर ज्ञानाबरोबरच हे शहाणपण मिळवावे लागणार आहे. कारण या शहाणपणाची देशाला आज फार गरज आहे.

# अपंग हक्क विकास मंच
## कार्यवृत्त

अपंगांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाचे समन्वयक विजय कान्हेकर हे मंचाचे काम पाहतात. कार्यालयीन संघटक म्हणून शमीम खान हे काम पाहतात.

**दि. ९/१२/०९ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई,** अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने मागील कित्येक वर्षापासून अपंग क्षेत्रातील विविध प्रश्नांबद्दल जे अडथळे निर्माण झाले होते. त्यांचे निराकरण करण्यात आले व त्याचबरोबर नविन शैक्षणिक,सामाजिक व मानसिक व क्रिडा क्षेत्रात प्रतिष्ठान मार्फत विविध उपक्रमां बरोबर महाराष्ट्र राज्य पातळीवर २५ विशेष शिक्षक प्रशिक्षण केंद्रांतर्गत शिक्षण घेत असलेल्या ६२५ विद्यार्थ्यांना अपंग क्षेत्रात असलेल्या विविध योजनाबद्दल माहिती व त्यांच्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत असलेले विशेष फिरस्ती शिक्षकांच्या ७०० रिक्त पदांची माहिती देणे व त्यांना सहकार्य करणे त्याकरीता अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने फरवरी २०१० ला राज्यस्तरीय दोन दिवसीय विशेष शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा घेण्याचा मानस आहे. सदर राज्यस्तरीय कार्यशाळेच्या पूर्व तयारीसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर बैठकीस अपंग हक्क विकास मंचाचे समन्वयक मा. श्री. विजय कान्हेकर यांचा अध्यक्षतेखाली दिनांक ०९/१२/२००९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वनराई, राष्ट्रभाषा संकूल, मुक-बधिर विद्यालय जवळ, शंकर नगर, नागपूर येथे सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस 17 Training Centre चे Director, HOD, Sub Co-ordinator, Special Teacher, Resource Person, इत्यादी उपस्थित होते.

### विशेष सामर्थ्य व्यक्ती सक्षमीकरण कार्यशाळा
### (दि. ४ व ५ जानेवारी २०१०)

अपंग व्यक्तीसाठी कायदा, समान संधी, हक्कांचे संरक्षण, संपुर्ण सहभाग, अधिनियम १९९५ दृष्टिक्षेपात ठेऊन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे विशेष सामर्थ्य व्यक्ती सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मा. हुसेन दलवाई यांनी भुषविले. सदर कार्यशाळेत प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. शरद काळे, आ. हेमंत टकले, मा. एम. एच. सावंत (अपंग कल्याण आयुक्त, पुणे) यांची उपस्थिती होती. या वेळी सचिन अहिर यांनी अपंगांच्या विविध योजना राबविण्यास मी आग्रही भुमिका घेऊन आणि अपंगांसाठी शासनाच्या वतीने विशेष संकुल प्रत्येक विभागात उभे करीन असे आश्वासन दिले. कार्यशाळेत कायदयातील तरतुदीनुसार अनुक्रमे, १) प्रतिबंधात्मक उपाय व वैदयकीय पुनर्वसन २) शिघ्र तपासणी मार्गदर्शन व शालेय शिक्षण ३) अपंगांना उच्च व तंत्र शिक्षणात संधी ४) अपंगांना रोजगार व स्वयं रोजगारात संधी ५) अपंगांचे सामाजिक, आर्थिक पुनर्वसन ६) अपंगांना सार्वजनिक ठिकाणी मुक्त संचार या प्रमुख विषयावर सादरीकरण व चर्चासत्रे झाली. या चर्चासत्रामध्ये संपुर्ण महाराष्ट्रातुन संबंधित विषयांचे तज्ज्ञ, शासकीय प्रतिनिधी, अपंग व्यक्ती, स्वयंसेवी संस्था यांचा प्रमुख सहभाग होता.

दि. ५ जानेवारी २०१० रोजी समारोप सत्राच्या वेळी विजय कान्हेकर यांनी मागील तीन वर्षाच्या कालावधीचा अपंग हक्क विकास मंचाचा आढावा सादर करून राज्य शासनाने निर्गमित केलेले महत्वाचे शासननिर्णय परिपत्रके व उपक्रमाचे माहिती दिली. या वेळी मा. ना. फौजिया खान, (शालेय शिक्षण व महिला बालकल्याण राज्यमंत्री) यांची प्रमुख उपस्थिती होती, प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे, आ. हेमंत टकले, आयुक्त सावंत तसेच कार्यक्रमाच्या संयोजक खा. सुप्रिया सुळे या उपस्थित होत्या.

अपंगांना बी.पी.एल. योजनेचा लाभ मिळावा यासाटी केंद्र सरकारकडे सुप्रियाताई यांनी प्रयत्न करावे असे मा. फौजिया खान यांनी सुचवले तसेच राज्य शासनाच्या वतीने कृत्रिम अवयव वाटप, वैदयकीय सुविधा, शिक्षणातील अडी-अडचणी या बाबत अपंग विकास मंचासोबत लवकरच शासकीय प्रतिनिधी सोबत संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात येईल असे आश्वासन दिले.

संयोजक सुप्रिया सुळे यांनी सर्वांचे आभार मानून प्रतिष्ठानच्या माध्यमातून शासननिर्णय काढण्यात यश आले असले तरी त्याची अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि या कार्यशाळेत झालेल्या निर्णय व ठरावाचा शासन दरबारी पाठपुरावा करून प्रत्येक दोन वर्षात आढावा कार्यशाळा घेण्याचे आपल्या आभार प्रदर्शनात आश्वासन दिले.

# शिक्षण विकास मंच
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने शिक्षणविषयक कार्यासाठी शिक्षण विकास मंचाची स्थापना केली असून गेल्या तीन वर्षापासून हा मंच कार्यरत आहे. मा. सुप्रिया सुळे या शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक म्हणून, तर राज्यात व केंद्रात शिक्षण विभागाच्या सचिव पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळलेल्या व शिक्षण क्षेत्रात मानाचे स्थान असलेल्या डॉ. कुमुद बन्सल या प्रमुख संयोजक म्हणून या कार्याची जबाबदारी पाहतात. डॉ. वसंत काळपांडे हे विशेष सल्लागार, दत्ता बाळसराफ हे संयोजक, तर सुरेश पाटील सहसमन्वयक म्हणून मदत करतात. शिक्षण विकास मंचाच्या कार्यात वेळोवेळी राज्यातील शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेण्यात येते.

**बुधवार, दिनांक ११ नोव्हेंबर २००९**

**राष्ट्रीय शिक्षण दिननिमित्त**
**'मुलांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' विषयावर परीषद**

दिनांक ११ नोव्हेंबर, २००९ रोजी राष्ट्रीय दिनानिमित्त मुलांचा मोफत आणि सक्तीचा अधिनियम, २००९ या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या परिषदेची पार्श्वभूमी विशद करणारी टिपणी सोबत जोडली आहे.

विविध घटकांचे प्रतिनिधित्व करणारे सुमारे ३५० प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते.

परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री मा. बाळासाहेब थोरात यांनी केले. महाराष्ट्राच्या राज्य मंत्री (शालेय शिक्षण) मा. प्रा. फौजिया खान या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या वेळी राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने मुलांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या विषयावरील परिषद आयोजित करण्यामागची पार्श्वभूमी त्यांनी स्पष्ट केली. हा कायदा म्हणजे केंद्र सरकारच्या दृष्टीने टाकलेले एक प्रगतिशील पाऊल आहे. त्याची व्याप्ती ० ते १८ वर्षे वयोगटापर्यंत वाढवणे गरजेचे असले तरी आता या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल यावर विचार करुन त्या दृष्टीने पावले उचलण्याची गरज आहे या मागण्या स्वतंत्रपणे मांडता येतील. या परिषदेत आलेल्या सूचना या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने खूपच महत्वाच्या आणि उपयोगी ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचच्या प्रमुख संयोजक डॉ. कुमुद बन्सल यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या शिक्षण विकास मंचने केलेल्या कामाचा धावता आढावा घेतला. त्यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांचे कार्य आणि महाराष्ट्रात मा. यशवंतराव चव्हाण यांनी केलेले कार्य यांच्या संदर्भात ही परिषद प्रतिष्ठानने घेणे कसे औचित्यपूर्ण आहे हेही त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक श्री. नरेंद्र कवडे यांनी मुलांचा मोफत आणि सक्तीचा अधिनियम, २००९ची ठळक वैशिष्ट्ये समजावून सांगितली.

या नंतर महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री यांनी परिषदेचे उद्घाटन केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात शिक्षण दिनाचे आयोजन करुन आणि नुकत्याच मंजूर झालेल्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत परिषद आयोजित केल्याबद्दल प्रतिष्ठानचे अभिनंदन केले. फक्त शिक्षणावर चर्चा करण्यासाठी, विचार करण्यासाठी गेल्या वर्षीपासून राष्ट्रीय शिक्षण दिन आयोजित केला जात आहे हे चांगले चिन्ह असल्याचे सांगून जिल्हा परिषदांच्या आणि नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या प्राथमिक शिक्षणाचा दर्जा वाढवण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे नमूद केले. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अतिरिक्त खर्च येईल त्यातील किमान ७५% वाटा केंद्र शासनाने उचलावा असेही मत त्यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या या परिषदेतील शिफारशींचा उपयोग या कायद्याची राज्यात प्रभावी

अंमलबजावणी करण्यासाठी पूर्वतयारी करण्याकरता आणि याबाबत आवश्यक असलेले नियम तयार करण्यासाठी होईल असे ते म्हणाले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या अशा चांगल्या कार्यक्रमांना आपल्याला उपस्थित रहायला नेहमीच आवडेल असेही त्यांनी सांगितले.

शालेय शिक्षण राज्यमंत्री मा. फौजिया खान यांनी मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या कार्याचे महत्त्व आजही कसे आहे ते सांगितले. मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, राष्ट्रीय शिक्षण पध्दती यांचा पाया त्यांनीच घातला. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत जी विविध सर्वेक्षणे होतात ती शिक्षकांच्या ऐवजी बाह्य यंत्रणेकडून करुन घ्यावीत असे त्यांनी सांगितले.

या नंतर उपस्थित प्रतिनिधी चर्चेसाठी आपापल्या निवडीप्रमाणे पुढीलप्रमाणे तीन गटांमध्ये सहभागी झाले.

१) केंद्र आणि राज्य शासन यांच्या कायद्यांतर्गत जबाबदाऱ्या
   अ) गटप्रमुख
      i) श्री. नरेंद्र कवडे
      ii) डॉ. वसंत काळपांडे

२) शाळा आणि शिक्षक यांच्या कायद्यांतर्गत जबाबदाऱ्या
   अ) गटप्रमुख
      i) श्रीमती बसंती रॉय
      ii) श्री. प. म. राऊत

३) समाजाचा सहभाग
   अ) गटप्रमुख
      i) श्रीमती फरिदा लांबे
      ii) श्री. परेश ज. म.

गटांच्या अहवालांवर दुपारच्या सत्रात चर्चा होऊन चर्चेत आलेल्या सूचनांचा विचार करुन गटांनी आपापले अंतिम अहवाल सादर केले.

दुपारच्या सत्रात शालेय शिक्षण राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांच्या हस्ते राज्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्राम शिक्षण समित्यांचे अध्यक्ष आणि सचिव (संबंधित शाळांचे मुख्याध्यापक) यांचा सत्कार करुन त्यांना गौरवपत्रे प्रदान करण्यात आली.

याच कार्यक्रमात या वर्षी प्रकाशित झालेल्या ''शिक्षण प्रवाहाच्या उगमापाशी'' या उत्कृष्ट शिक्षणविषयक ग्रंथाचा गौरव करण्यात आला. पुस्तकाच्या लेखिका श्रीमती सुचिता पडळकर, कोल्हापूर आणि पुस्तकाचे प्रकाशक श्री. अरविंद पाटकर, मनोविकास प्रकाशन, पुणे यांना गौरवपत्रे प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता बाळसराफ यांनी केले.

डॉ. वसंत काळपांडे यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

**सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम पुणे जिल्हा परिषद आणि शिक्षण विकास मंच आयोजित कार्यक्रम अहवाल**

**१. रिक्त पदे भरणे**

सर्व शिक्षा अभियानाखाली वर्गखोल्या, शाळांची निगा व दुरुस्ती, संगणक, शैक्षणिक साहित्य, फर्निचर आणि इतर भौतिक सुविधा शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या. पण त्यांच्या वापरासाठी कार्यप्रेरणेने भारलेले मनुष्यबळ नसेल तर या सुविधांचा अपेक्षित परिणाम होऊ शकत नाही. पुणे जिल्ह्यातील वेल्हा, मुळशी, भोर, मावळ आणि खेड या तालुक्यांमध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख आणि शिक्षण विस्तार अधिकारी ही पदे मोठ्या प्रमाणावर रिकामी आहेत. ती भरण्याच्या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

**२. शिक्षक आणि अधिकारी यांची कार्यप्रेरणा**

''मी हे करु शकतो आणि ते करणारच'' अशा भावनेने कार्य करणारे शिक्षक आणि अधिकारी त्यांच्या पुढे असलेले उद्दिष्ट परिस्थिती प्रतिकूल असली किंवा साधन-सुविधांचा अभाव असला तरी साध्य करतातच. शिक्षक आणि अधिकारी यांच्यामध्ये कार्यप्रेरणा निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक झाले पाहिजे; प्रोत्साहन मिळाले पाहिजे. यासाठी पुढील कार्यक्रमांचा विचार करता येईल.

चांगले काम करणारे शिक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी पारितोषिक योजना जाहीर करावी.

शाळा, केंद्र आणि गटपातळीवर स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा या आणि इतर क्षेत्रातील चांगल्या कामाला प्रसिध्दी

देण्यात यावी. ही प्रसिध्दी जिल्हा परिषदेने खास शिक्षणासाठी काढलेल्या एखाद्या षण्मासिकाच्या माध्यमातून देता येईल.

## ३. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा आहेच; परंतु प्राथमिक स्तरावर भाषा आणि यांचे विशेष महत्त्व आहे. मराठी, इंग्रजी आणि गणित या तीन विषयांवर आणि त्यांतही पुढील बाबींवर प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

- संख्यावाचन, लहान व मोठी संख्या ओळखता येणे, संख्या चढत्या व उतरत्या क्रमाने ओळखता येणे या बाबींवर विद्यार्थ्यांचे प्रभुत्व असायला हवे.
- घोकंपट्टी चांगली नसते, परंतु पाठांतर नेहमीच वाईट असते असे नाही. काही प्रकारचे पाठांतर आवश्यकच असते बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकर या मूलभूत गणिती क्रियांवर विद्यार्थ्यांचे प्रभुत्व असले पाहिजे. त्यासाठी ३० पर्यंतच्या पाढ्यांबरोबरच बेरीज आणि वजाबाकी यांचेही पाढे विद्यार्थ्यांकडून पाठ करुन घ्यावेत.
- विद्यार्थ्यांकडून पाठ्यपुस्तकातील सर्व कविता आणि काहि चांगले गद्य उतारे यांचेही पाठांतर करून घेतल्यास विद्यार्थ्यांची भाषा सुधारण्यास मदत होईल.
- विद्यार्थी तीन प्रकारांनी शिकतात; शिक्षकांकडून (Expert-directed learning), आपल्या सहकारी विद्यार्थ्यांकडून (Peer-directed learning) आणि स्वतःचे स्वतः (Self-directed learning) . शाळांमध्ये सध्याच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत केवळ शिक्षक शिकवतात आणि विद्यार्थी तेवढेच ज्ञान ग्रहण करतात. विद्यार्थ्यांना याबरोबरीने स्वशिक्षण आणि वर्गातील इतर विद्यार्थ्यांकडून शिकणे या दोन्ही तंत्रांचा वापर केल्यास अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची परिणामकारकता कितीतरी प्रमाणात वाढेल. क्लास मॉनिटर पध्दतीचाही विचार करता येईल.

## ४. शिक्षक प्रशिक्षण

शिक्षक प्रशिक्षण प्रभावी होण्याच्या दृष्टीने पुढील बाबींचा विचार होणे गरजेचे आहे.

- विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकही तज्ज्ञांकडून शिक्षण (Expert-directed learning), आपल्या सहकाऱ्यांकडून शिक्षण (Peer-directed learning) आणि स्वशिक्षण (Self-directed learning) अशा तिन्ही पध्दतींनी शिकत असतात. या तिन्ही पध्दतींचा शिक्षक प्रशिक्षणात अंतर्भाव असावा.

## ५) विषयनिहाय अध्यापन

सध्याच्या पध्दतीत इयत्ता पहिली ते चौथीसाठी एका तुकडीला एकच शिक्षक सर्व विषय शिकवतो. त्या ऐवजी विषयनिहाय अध्यापनाची पध्दत अवलंबण्यात यावी. इंग्रजी आणि गणित याविषयासाठी एकच प्रत्येकी एक शिक्षक इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या सर्व तुकड्यांना शिकवील. कार्यभार कमी पडल्यास अभ्यासक्रमातील त्याच्या आवडीचे इतर काही विषय त्याला शिकवण्यसाठी देण्यात येतील.

## ६) केंद्र प्रमुखांची कर्तव्ये

केंद्र प्रमुखांकडे प्रशासकीय कामांची जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर सोपवण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मूळ शैक्षणिक मार्गदर्शन करण्याचे काम दुर्लक्षित झाले आहे. त्यांचे रेकॉर्ड ठेवण्याचे काम बऱ्याच प्रमाणात कमी होण्याची गरज आहे. त्यांच्याकडून माहिती मागवण्याचे प्रमाण खूपच कमी झाले पाहिजे. शाळा भेटीची प्रपत्रे सोपी करणे आवश्यक आहे. काही भाग वर्षातून एकदा भरला तरी चालण्यासारखे आहे. केंद्र प्रमुखांनी शैक्षणिक कार्याकडेच प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे हे पाहण्याची गरज आहे.

## ७) शाळांची तपासणी

गेली काही वर्षे शाळा तपासणीचे काम जवळ जवळ थांबले आहे. शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची सर्व पदे भरुन शाळा तपासणीच्या कामाला गती देणे गरजेचे आहे. तपासणी झाल्यावर शाळेत असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी पाठपुरावा होणेही आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने विकसित केलेल्या प्रतवारीच्या साधनाचा तपासणीच्या वेळी आणि शालेय नियोजनासाठी उपयोग करण्यात यावा.

## ८) चावडी वाचन -

पुणे जिल्ह्यात सुरु असलेल्या चावडी वाचनाचा कार्यक्रम पुढील दृष्टींनी आदर्श आहे.

- हा कार्यक्रम समाजाने मनापासून स्वीकारलेला आहे.
- कार्यक्रमात समाजातील सर्व घटकांचा समावेश असतो.
- कार्यक्रम खूपच कमी खर्चाचा आहे.
- परिसरातील माध्यमिक शिक्षकच विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करत असल्यामुळे मुलांना त्यांची समजायला कोणतीच अडचण येत नाही.
- कार्यक्रम पूर्णपणे विकेंद्रित स्वरूपाचा असून यात खूपच कमी रेकॉर्ड ठेवावे लागते.
- स्थानिक समाज आणि पालक यांच्या समोरच मूल्यमापन होऊन निकाल त्याच वेळी समजू शकतात. त्यामुळे निकालांचा अर्थ पालकांना वेगळा समजावून द्यावा लागत नाही.
- सर्वांसमोर मूल्यमापन होत असल्यामुळे वरच्या अधिकाऱ्यांच्या फेरतपासणीची या कार्यक्रमात गरज नसते.

## ९) सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम

चावडी वाचन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शासनाने एप्रिल, २००७ पासून सुरु केलेल्या या कार्यक्रमाच्या स्वरुपात फार मोठ्या प्रमाणावर बदल करावे लागतील. हा कार्यक्रम पूर्णपणे विकेंद्रित पध्दतीने राबवला जाईल, त्यातील किचकटपणा जाऊन तो सुटसुटीत होईल, शिक्षकांच्या नीतिधैर्यावर विपरीत परिणाम होणार नाही, कागदी काम कमी होईल अशा रीतीने या कार्यक्रमात बदल करुन त्या दृष्टीने शासन निर्णयात बदल करण्यासाठी शासनाला सविस्तर प्रस्ताव पाठवण्यात यावा.

## १०) ग्रंथालय आणि प्रयोगशाळा समृध्दी

पुणे जिल्हा परिषद आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा विस्तार सेवा कार्यक्रम बारामती तालुक्यातील मुरटी या केंद्र शाळेच्या अखत्यारीतील १५ आणि भोर तालुक्यातील भुतोंडे या केंद्र शाळेच्या अखत्यारीतील ७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये राबवण्यात येईल. कार्यक्रमात भारतीय ज्ञान विज्ञान समुदाय आणि मराठी विज्ञान परिषद या स्वयंसेवी संस्थांचेही सहकार्य घेण्यात येईल. कार्यक्रमाचे स्वरुप पुणे जिल्हा परिषद आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान या दोन संस्थांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा होऊन निश्चित करण्यात येईल.

माझ्या मते भाषांतरी भाषा फारशी चांगली नसते. जमिनीतले पाणी, जमिनीतली सत्वे आणि जमिनीत इतर जी काही शक्ती असेल ती घेऊन पिऊन जमिनीतून ऊस जसा वाढत जातो तशी भाषा ही जिवंत असली पाहिजे. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल, अधिकाधिक उत्कर्ष पावेल.

# यशस्विनी अभियान
# कार्यवृत्त

**आभासी केंद्र (व्हर्च्युअल सेंटर) प्रशिक्षण कार्यशाळा (शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २००९ ते रविवार, दि. २५ ऑक्टोबर २००९)**

महिला विकासासाठी सुरू करण्यात आलेल्या बचत गट चळवळीने समाजात आर्थिक विकासाबरोबरच नवी जाणीव जागृती निर्माण करण्यात मोलाचा हातभार लावला असून या चळवळीला स्वयंपूर्ण दिशा देण्याबरोबरच तिला आधुनिक बदलांचा सामना करण्यासाठी बळ देण्याचे काम यशस्विनी अभियान प्रभावीपणे करत आहे,असे प्रतिपादन आदिवासी विकास विभागाचे आयुक्त ज्ञानेश्वर राजूरकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाने सुरू असलेल्या 'यशस्विनी सामाजिक अभियान', सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्यावतीने स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेअंतर्गत स्थापित दारिद्रय रेषेखालील स्वयंसहाय्यता गटातील महिलांना आभासी केंद्र (व्हर्चुअल सेंटर) प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याविषयी दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन करतांना ज्ञानेश्वर राजूरकर बोलत होते.

याप्रसंगी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, प्रकुलगुरू डॉ. पंडीत पलांडे, कुलसचिव प्रकाश वाणी, यशस्विनी सामाजिक अभियानाचे संचालक विश्वास ठाकूर आदी उपस्थित होते.

मुक्त विद्यापीठाच्या यश इंटरनॅशनल सेंटरमध्ये ही कार्यशाळा संपन्न झाली, यात महाराष्ट्रातील सुमारे ५० हून अधिक महिला समन्वयकांनी सहभाग नोंदवला.

याप्रसंगी राजूरकर म्हणाले की, आदिवासी भागात बचत गटांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यामुळे कुपोषणासारख्या प्रश्नाला आळा बसेल. बरोबरच आरोग्य, साक्षरता या प्रश्नांविषयी जागृती होण्यास मदत होईल. यात यशस्विनी अभियानाबरोबरच स्वयंसेवी संस्थांनी सहभागी होणे गरजेचे आहे.

कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे म्हणाले की, बचत गटांची वाटचाल आज समाजात सुसंस्कृत व दिशादर्शक ठरली आहे. गुणवत्तापूर्ण लोकशाहीच्या दिशेने वाटचालीची ही सुरूवात आहे. बचत गटांनी पदार्थ, वस्तू विक्रीतून, दर्जा, गुणवत्तेचा आदर्श वस्तूपाठ बाजार पेठेत निर्माण केला आहे व नवी ग्राहक संस्कृती उदयास आणली आहे. बचत गटांनी आता मॉल संस्कृतीच्या स्पर्धेत बचत गटांचे स्वतंत्र मॉल्स जिल्हा स्तरावर उबारावेत, त्यासाठी विचार, नियोजन, संकल्पन, 'यशस्विनीने' करावे. शाश्वत विकासासाठी पुरूषांचेही सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. सर्जनशीलतेचे स्वागत करण्यासाठी 'थिंक ग्लोबली - ॲक्ट ग्लोबली' असा मंत्र जपणेही महत्त्वाचे आहे. तीच शाश्वत विकासाची व शक्तीशाली समाज व्यवस्थेची नेमकी गरज आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पंडीत पलांडे म्हणाले की, 'यशस्विनी सामाजिक अभियान' ची चळवळ ही पूर्णतः महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रभूत आहे. नव्या साक्षर व आर्थिक समाजाच्या निर्मितीसाठी खारीचा वाटा म्हणून बचत गट चळवळीला पुरक म्हणून स्वतंत्र अभ्यासक्रमही तयार केला आहे. त्यामुळे समाजातील शेवटच्या माणसांपर्यंत मुक्त विद्यापीठाला पोहचता आले आहे.

कुलसचिव प्रकाश वाणी यांनी 'शहरी व ग्रामीण भागातील बचत गटांच्या समन्वयाबरोबरच आदिवासी भागातील महिलांपर्यंत प्रशिक्षणाची सुविधा पोहचणे गरजेचे आहे. निरनिराळ्या आश्रमशाळांना लागणाऱ्या रोजच्या वस्तूंचे कॉन्ट्रॅक्ट मिळविण्यासाठी बचत गटांनी प्रयत्न करावेत. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करतांना विश्वास ठाकूर यांनी यशस्विनी अभियानाच्या वाटचालीचा आढावा घेतवाव आभासी केंद्र (व्हर्च्युअल सेंटर)च्या प्रशिक्षणाची गरज व भूमिका विशद केली. तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणी होणाऱ्या व्हर्च्युअल प्रशिक्षणाविषयी नियोजनाविषयी माहिती दिली. शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या महिलांसाठीच्या काही योजनांची माहिती दिली.

कार्यशाळेच्या निमित्ताने प्रसिद्ध व्यवस्थापन तज्ज्ञ अरविंद चितेवाले यांनी 'सेल्फ कॉन्फिडन्स ॲण्ड पॉझिटीव्ह' ॲटीट्युड' या विषयांवर मार्गदर्शन केले. यात त्यांनी नेतृत्व व समन्वय, संवाद कौशल्य, कृतीशीलता, निश्चित ध्येय, उद्दिष्ट, टिम बिल्डिंग, अशा विविध व्यक्तिमत्त्वातील प्रभावी घटकांच्या विषयी महिलांच्या सहभागातून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी यशस्विनी अभियानाच्या मुख्य समन्वयिका सुरेखा ठाकरे यांनीही मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या काही, अशा प्रशिक्षणातून महिलांनी व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच आर्थिक सबलीकरणासाठी पुरक अशा नव्या उद्योग व्यवसायाचा शोध घ्यावा.

**मायक्रोफायनान्स इंडिया समिट कार्यशाळेत यशस्विनींचा सहभाग**

ACCESS Development Services, New Delhi या संस्थेतर्फे सोमवार, दि. २६ ऑक्टोबर ते बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २००९ या कालावधीत 'Microfinance India Summit' या विषयावरील कार्यशाळा हॉटेल ताज पॅलेस, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेली होती. यशस्विनी सामाजिक अभियानाच्या राज्यस्तरीय समन्वयक डॉ. अस्मिता पाटील (जळगांव) व डॉ. सुवर्णा शिंदे (धुळे) या दोघींनी सहभाग नोंदविला व शोध निबंधाचे सादरीकरण केले.

**व्हर्च्युअल सेंटर (आभासी केंद्र) प्रशिक्षण**

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाने पारित शासन परिपत्रक क्र. स्वग्रायो २००९/प्र.क्र. २१४/योजन-३, दि. ३१ ऑगस्ट २००९ अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सिम्बॉयसिस इन्स्टिट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट पुणे व यशस्विनी सामाजिक अभियान यांच्यात झालेल्या सामंजस्य करार झालेला असून दि. ०५ नोव्हेंबर २००९ पासून प्रशिक्षणास सुरूवात झालेली असून १२ मार्च २०१३ पर्यंत सुमारे ५ लाख दारिद्रयरेषेखालील स्वयंसहाय्यता/बचत गटातील महिलांना मुक्त विद्यापीठाच्या व्हर्च्युअल सेंटर (आभासी केंद्र) च्या माध्यमातून प्रशिक्षीत केले जाणार आहे. फेब्रुवारी २०१० अखेरपर्यंत सुमारे १५ हजार महिलांनी सादर प्रशिक्षण घेतले.

महावितरण कंपनीतर्फे मीटर रिडींग / पंचींग व वीज बिल वाटप

दि. ०७ नोव्हेंबर २००९ रोजी मुंबई येथे मा. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. अजय मेहता (आय.ए.एस.) व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत मीटर रिडींग व पंचींग व बिल वाटप ही योजना संपूर्ण महाराष्ट्रत राबविणेबाबत चर्चा संपन्न झाली. अशाप्रकारची योजना प्रभावीपणे राबविली जाण्यासाठी त्यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

याची दखल घेऊन महावितरण कंपनीने 'फोटो मीटर रिडींग आणि वीज देयक वितरणाचे काम महिला बचत गट/महिला मंडळ/महिला कल्याणकारी संस्था ह्यांना देण्याबाबत मार्गदर्शक सूचना' या मथळ्याखाली महावितरण कंपनीची पी-कॉम/फोटो मीटर/३६२०३, दि. ९/११/२००९ रोजीचे वाणिज्य परिपत्रक क्र.१०३ पारित केलेले असून यशस्विनी सामाजिक अभियानाच्या समन्वकांमार्फत महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात किमान एका स्वयंसहाय्यता / बचत गटास सदर मीटर रिडींग/पंचींग व वीज बिल वाटपाचे काम मिळणेस सुरूवात झालेली आहे.

**हैद्राबाद अभ्यास दौरा**

१२ व १३ नोव्हेंबर २००९ रोजी यशस्विनी सामाजिक अभियानाच्या संचालिका सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडक १० समन्वयकांनी आंध्रप्रदेश येथील स्वयंसहाय्यता/बचत गटांना भेटी दिल्या व त्यांची कार्यप्रणाली समजून घेतली. त्याचबरोबर आंध्रप्रदेशाची मुख्यमंत्री मा.के. एस. ससुरय्या व काही खासदारांसमवेत बैठक संपन्न झाली. त्यात शासनामार्फत बचत स्वयंसहाय्यता गटांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसंदर्भात माहिती जाणून घेण्यात आली. 'अभयहस्तम्' योजना ही एम.आय.सी.च्या धर्तीवरील योजनेची माहिती मिळाली.

**भारतीय जीवन विमा निगम यांच्या 'जीवन मंगल सूक्ष्म' व 'जीवन मधुर' या मायक्रो विमा पॉलिसीबाबत**

यशस्विनी सामाजिक अभियान महाराष्ट्रातील स्वयंसहाय्यता/बचत गटातील महिलांचा आर्थिकस्तर उंचाविण्यासाठी तसेच त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध माध्यमातून प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील महिलांना कमीतकमी विमा हप्ता आकारून त्यांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी यशस्विनी सामाजिक अभियान विशेष प्रयत्न करीत आहे.

ग्रामीण भागातील गरजुंना उज्वल भविष्याची खात्री देण्यासाठी तसेच शहरी व ग्रामीण भागातील गरीब लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'जीवन मधुरी' व 'जीवन मंगल' सुक्ष्म विमा पॉलिसी एलआयसीमार्फत काढण्यात आलेली आहे.

एलआयसी सारख्या संस्थेचा यशस्विनी सामाजिक अभियानाबरोबर सामंजस्य करार झाल्यास महाराष्ट्रातील बचत/स्वयंसहाय्यता गटांतील महिलांचा आर्थिकस्तर उंचाविण्यास निश्चितच मदत होईल या उद्देशाने तसेच एलआयसीने कंपनी ॲक्टच्या सेक्शन २५ या प्रचलित नियमानुसार जी कंपनी/सामाजिक संस्था कार्यरत आहे, अशा संस्थेशी सामंजस्य करार करून 'जीवन मंगल' व 'जीवन मधुर' या मायक्रो पॉलिसी

तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविता येणे शक्य होईल, अशी समर्थतता दर्शविलेली आहे. त्यानुसार त्यांनी आपणाकडे प्रस्ताव सादर केला व त्यान्वये महाराष्ट्रातील यशस्विनी सामाजिक अभियानाच्या निवडक समन्वयकांना बैठकीची तारीख निश्चित करून कळविण्यात आले. या बैठकीस २७ समन्वयक उपस्थित होत्या.

एलआयसीच्या कार्यकारी संचालक (मायक्रो इन्श्युरन्स) मा.सरोज ढिकले यांनी उपस्थित सर्व समन्वयकांचा परिचय करून ते त्यांच्या कार्यक्षेत्रात यशस्विनी सामाजिक अभियानामार्फत काय काय उपक्रम राबवितात ? तसेच त्यांच्या खासगी जीवनात त्या काय करतात ? याची माहिती जाणून घेतली.

उपस्थित सर्व एलआयसीच्या अधिकाऱ्यांना यशस्विनी सामाजिक अभियानाची संपूर्ण माहिती देऊन आर्थिकदृष्टया मागासलेल्या महिलांनी विम्याची रक्कम मिळणेसंदर्भात विनंती केली. तसेच एलआयसीचे सामाजिक क्षेत्रातील योगदान बघता यशस्विनी सामाजिक अभियान व एलआयसीने विविध सामाजिक उपक्रम राबवावेत, अशी मागर्ण केली.

यानंतर श्री.एन.पी. गिरकर यांनी 'जीवन मधुर' व 'जीवन मंगल' या मायक्रो पॉलिसाची माहिती उपस्थित समन्वयकांना प्रेझेंटेशनद्वारे दिली.

जव्हार, जि. ठाणे अभ्यास दौरा बुधवार/गुरूवार, दि. ३० व ३१ डिसेंबर २००९

बायफ-मित्र या सामाजिक संस्थेमार्फत आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांच्या उन्नतीसाठी, त्यांचा आर्थिकस्तर उंचाविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. बुधवार/गुरूवार, दि. ३० व दि. ३१ डिसेंबर २००९ या दोन दिवसीय कालावधीत जव्हार, जि. ठाणे येथील बायफ-मित्र कार्यालयामार्फत आदिवासी व दुर्गम भागातील महिलांसाठी बचत/स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून जे विविध उपक्रम राबविले जातात. त्याची माहिती घेण्यासाठी यशस्विनी सामाजिक अभियानाच्या संचालिका मा. सुप्रिया सुळे यांचेसमवेत २१ समन्वयकांची निवड करण्यात आली होती.

# *कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम, मुंबई*
## *कार्यवृत्त*

समाजातील गोर गरीब, दीन-दुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतूदीला अनुसरून भारतीय संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केले आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम नावाच्या विभागांची निर्मिती केली आहे. या फोरमचे प्रशासकीय काम श्री. म.बा. पवार सदस्य सचिव हे पाहत आहेत. विधी साक्षरता कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये श्री. अनिल चिंदरकर हे ही मदत करतात.

**ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा दिनांक ४ ऑक्टोबर २००९- कार्यवृत्त**

दरवर्षी प्रमाणे रविवार दिनांक ४ ऑक्टोबर, २००९ रोजी चव्हाण केंद्राच्या तळ मजल्यावरील मुख्य सभागृहामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा भरविण्यात आला. यावर्षी कुर्ला ते कर्जत-कसारा व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले ९० ज्येष्ठ नागरिक संघानी मेळाव्यामध्ये भाग घेतला. या क्षेत्रा बाहेरील काही उत्साही संघानी सुद्धा भाग घेतला. एकूण अंदाजे ३५० ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते. सभागृहाचा तळ मजला संपूर्ण भरला होता. मेळाव्याच्या आयोजनामध्ये फेस्कॉमची भरीव मदत झाली.

२) कार्यक्रम पत्रिका

१) कार्यक्रमाची सुरूवात सकाळी ९.०० वा. झाली सकाळी ९.०० ते ९.३० या वेळेमध्ये नाव नोंदणी, नाश्ता व चहाचा कार्यक्रम झाला. नाव नोंदणीच्या वेळी खालील साहित्य सर्व प्रतिनिधींना देण्यात आले.

२) सूचना पत्रिका

३) कार्यक्रमासाठी तयार केलेला खास कागदी किल्ला

४) कापडी पिशवीमध्ये भरून खालीला पुस्तके सुद्धा देण्यात आली.

अ) सह्याद्रीचे वारे

ब) विधी मंडळातील भाषणे (मराठी)

क) यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार

ड) महात्मा फुले यांचे मौलिक विचार

याच वेळी चारही सत्कार मूर्तिंच्या हस्ते श्री. चव्हाण साहेबांच्या पुतळ्याला हार घालण्यात आले.

३) सकाळी ९.३० ते ११.१५ पर्यंत श्री. विजय गटलेवार आणि त्यांचे सहकारी यांचे सुश्राव्य गायन झाले. त्यांची गाणी सर्वांना फारच आवडली. श्री. शरद काळे साहेबांच्या हस्ते सर्व कलाकारांचे पुष्प गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सकाळी ११.१५ ते ११.३० पर्यंत पंधरा मिनिटांसाठी चहासाठी विश्रांती देण्यात आली.

४) मुख्य कार्यक्रम सकाळी १२.३० वा. सुरू झाला. श्री. काळेसाहेबांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर. डी. लेले, मुंबई हे उपस्थित होते. फेस्कॉमचे महा-सचिव श्री. अनिल कासखेडीकर आणि सचिव श्री. विजय औंधे हे ही समारंभामध्ये उपस्थित होते. कर्तबगार ज्येष्ठ नागरिक म्हणून खालील ज्येष्ठ नागरिकांची निवड करण्यात आली होती.

पुरूष : १. श्री. कृष्णा गोपाळ बेडेकर, वय ८१, राहणार : कुळगाव, बदलापूर

२. श्री. मधुकर प्रभाकर मंडलेकर वय ७९, राहणार : ठाणे

महिलाः १. श्रीमती स्मिता के. मोहन्ती, वय ६३ राहणार : मुलूंड

२. श्रीमती सुमती मोरा राजे, वय ७६ राहणार : कुळगाव - बदलापूर

श्री. म.बा. पवार यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी अध्यक्ष व सर्व पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर सर्व माजी सत्कार मूर्तिना पुष्प गुच्छ देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांना पुच्छ गुच्छ व प्रतिष्ठाननें प्रकाशित केलेली सहा पुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

५. श्री. भूपेश सामंत यांनी मेळाव्या संबंधी तयार करण्यात आलेल्या अहवालाचे वाचन केले. त्यानंतर श्री. अनिल कासखेडीकर यांनी विचार मांडले. तद्नंतर सत्काराच्या मुख्य समारंभाची सुरूवात झाली. प्रथम श्री. सुरेश पाटील यांनी सर्व सत्कार मूर्तिचा अल्प परिचय वाचून दाखविला त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. आर.डी. लेले यांच्या हस्ते श्रीमती स्मिता के. मोहन्ती व श्री. कृष्ण गोपाळ बेडेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच समारंभाचे अध्यक्ष श्री. शरद काळे यांच्या हस्ते श्रीमती सुमती मोरो-राजे व श्री. मधुकर पभाकर मंडलेकर यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराचे स्वरूप पुष्प गुच्छ, शाल, श्रीफळ, गौरव पत्र व खालील ६ पुस्तकांचा संच असे होते.

१) नव भारत - परिवर्तनाची दिशा - प्रतिष्ठान प्रकाशित

२) यशवंतराव चव्हाण - लेखक - अनंतराव पाटील

३) गोपाळ गणेश आगरकर (इंग्रजी) लेखक - अरविंद गणाचार्य

४) जोशी काका - लेखक - बापू देशपांडे

५) वेताळाच्या आरोग्य कथा - लेखक - रवींद्र पंढरीनाथ

६) सेवा निवृत्त झालात - पुढे काय ? लेखक राधा कृष्ण नार्वेकर

५. सत्कारानंतर चारही सत्कार मूर्तिनी आपले मनोगत व्यक्त केले. तद्नंतर प्रमुख पाहुणे डॉ. आर.डी. लेले यांचे मुख्य भाषण झाले. त्यानंतर श्री. काळे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. नंतर फेस्कॉमचे सचिव श्री. विजय औंधे यांनी ऋण निर्देशन केले. त्यामध्ये त्यांनी सर्व संघाच्या वतीने प्रतिष्ठानचे मनःपूर्वक आभार मानले शेवटी श्रीमती ममता कानडे यांनी सर्वांचे आभार मानवे. राष्ट्रगीतानंतर समारंभ बरोबर २.०० वा. संपला.

सर्वांसाठी उत्कृष्ट भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सर्वांनी भोजनाचा स्वाद घेतला भोजनानंतर ज्येष्ठ नागरिकांनी खालील ठिकाणांना भेटी देऊन त्याचा लाभ घेतला :-

१. संगणक माहिती केंद्र

२. ग्रंथालय

ग्रंथालय मार्फत हॅन्डबुक फॉर सिनियर सिटीझन्स या पुस्तकाच्या ७० प्रती विकल्या गेल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. सुरेश पाटील यांनी केले. कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. समारंभाच्या आयोजनमध्ये प्रतिष्ठानच्या सर्व विभागांनी व सर्व अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी व सदस्यांनी उत्कृष्ट सहकार्य केले. सर्वांच्या सांघिक प्रयत्नामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

# महाराष्ट्र महीला व्यासपीठ
# कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारिरीक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, कार्यक्रम योजनांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजक रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजक ममता कानडे व्यासपीठाचा कार्यभार दक्षतेने सांभाळत असतात. त्यांना महिला व्यासपीठाची कार्यकर्ती शोभा लोंढे यांचे सहकार्य असते.

दिनांक १५ सप्टें. २००९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-बेसमेंट सभागृहात ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' कार्यशाळेत ''फळांची व पालेभाज्यांची सजावट'' या विषयावर प्रशिक्षक मा. नीना डायस यांनी प्रात्यक्षिकातून प्रशिक्षणार्थींना विविध भाज्या व फळांची रंगसंगती साधून, फळभाज्यांचे महत्व सांगून विषय समजावून दिला. ७० महिलांनी उपस्थित राहून प्रात्यक्षिकाचा लाभ घेतला.

दिनांक २२ व २५ सप्टेंबर रोजी बचत गटातील महिला व 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी यांच्यासाठी ''स्वयंरोजगार प्रशिक्षण'' देण्यात आले. यावेळी भारत गॅस कुलाबा - संस्थेच्या अधिकारी मा. रशिदा यांनी घरोघरी जाऊन विक्री करता येईल अशा त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सामानाची माहिती दिली. त्यातून मिळणाऱ्या कमिशनमधून आर्थिक बाबतीत स्त्रीया स्वावलंबी होऊ शकतील याची त्यांनी खात्री दिली. यावेळी मा. आशिष परुळेकर, मा. दिपा अरोरा, मा. रमा मेनन यांनीही प्रशिक्षणार्थिना ग्राहकांशी संवाद कसा साधावा, आपल्याकडील मालाचे महत्व कसे पटवून द्यावे याविषयी अमूल्य मार्गदर्शन केले.

पुणे येथील माय केअर संस्थेच्या संस्थापिका मंजिरी गोखले यांनी त्यांच्या संस्थेची माहिती सांगितली व महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध कसा होतो याबाबत मार्गदर्शन दिले. दिनांक ४ ऑक्टोंबर २००९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईतर्फे ''जेष्ठ नागरिक मेळावा'' झाला. या मेळाव्यामध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे ममता कानडे व शोभा लोंढे या सहभागी झाल्या होत्या.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने ३५ महिलांसाठी ''गृहव्यवस्थापन'' या विषयावरील अतिशय आगळेवेगळे प्रशिक्षण १० नोव्हेंबर २००९ ते २२ जानेवारी २०१० पर्यंत घेण्यात आले.

महिलांच्या या दुसऱ्या बॅचमध्ये सतत ९ आठवडे मंगळवार, गुरूवार, शनिवार असे २७ दिवस दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये महिलांच्या रोजच्या जीवनातील उपयोगी असे २७ विषय शिकविण्यात आले. स्वतःचे आरोग्य, घराची स्वच्छता, घरातील सर्व वस्तूंची निगा, प्रथमोपचार या विषयांबरोबरच वेगवेगळ्या प्रकारचे जेवण बनविण्याच्या पध्दतीमध्ये जवळ जवळ १५० पदार्थ शिकविण्यात आले. वरील सर्व विषय त्या त्या विषयांतील अनुभवी मार्गदर्शक व निर्मला निकेतन कॉलेजच्या प्राध्यापिकांकडून शिकविण्यात आले. या प्रशिक्षणांमुळे महिलांनी स्वतःचे घर चांगल्याप्रकारे सांभाळणे तसेच छोट्या प्रमाणात डबा सर्व्हिस सुरू करणे, छोट्या प्रमाणात कॅटरिंग बिजनेस सुरू करणे तसेच दुसऱ्यांच्या घरी जाऊन त्यांचे घर सांभाळणे याची माहिती महिलांना मिळाली व आर्थिक बाबतीत सक्षम होण्याचे मार्गदर्शन मिळाले.

गुरूवार १७ डिसेंबर २००९ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-बेसमेंट सभागृह येथे ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी व इतर महिलांकरिता डॉ. स्मिता धारप ह्यांचे ''महिलांचे आरोग्य'' ह्या विषयावर मार्गदर्शनवर भाषण ठेवले होते. या कार्यक्रमांत अंदाजे १०० महिलांनी सहभाग केला. गुरूवार २९ जानेवारी २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई-बेसमेंट सभागृह येथे ''गृहव्यवस्थापन प्रशिक्षण'' कार्यशाळेचा प्रमाणपत्र वितरण समारंभ झाला. यावेळी मुख्य पाहुण्या मा. सुधा भावे (निवृत्त सनदी अधिकारी) यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे देण्यात आली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे पदाधिकारी मा. शरद काळे यांनी यशस्वी मुलींना पारितोषिके दिली.

महिला व्यासपीठाच्या संयोजिका रेखा नार्वेकर यांनी व्यासपीठाच्या कार्याविषयी व कार्यकारी संयोजिका ममता कानडे यांनी गृहव्यवस्थापन प्रशिक्षणाविषयी माहिती दिली. कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतनच्या मा. वीणा यार्दी यांनी गृहव्यवस्थापन प्रशिक्षणांविषयी आपले विचार व्यक्त केले. शोभा लोंढे यांनी निवेदन केले. हे प्रशिक्षण सर्व महिलांनी मनापासून आवडल्याचे सांगितले.

# सृजन
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या, रंगस्वर विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाकरता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातून समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्मानीय सल्लागार म्हणून सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डगल्स जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महिन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा ९.०० वाजता चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात येते. श्री विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात.

सृजन द्वारा मुलांसाठी घेण्यात आलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे :

**कार्यक्रमांचा संक्षिप्त आढावा**

| दिनांक | विषय | प्रशिक्षक |
|---|---|---|
| दि. ६ सप्टेंबर ०९ | मातीकाम | अमरजित सिंग<br>कु. स. अहिरे |
| दि. ४ ऑक्टोबर ०९ | जाहिरात | विवेक प्रभुकेळुस्कर |
| दि. १ नोव्हेंबर ०९ | ॲनिमेशन | श्री. समीर कुळावर |
| दि. ६ डिसेंबर ०९ | सन २००९ कार्यक्रमाची सांगता पार्टी | |
| दि. १ जानेवारी २०१० | मुलांचे समुपदेशन<br>अभ्यास कसा करावा ताणतणाव दूर कसा कराल. | श्री. अरूण नाईक |
| दि. ४ फ्रेबुवारी २०१० | टाकाऊ वस्तूपासून वस्तू बनविणे | विवेक टेटविलकर |

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण साहेब हे ग्रंथ प्रेमी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या विचारांना अनुसरून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे एक सुसज्ञ ग्रंथालय सुरू करण्यात आले आहे. या ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इ. विषयांवरील पुस्तके, चरीत्रे व आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, विश्वचरीत्रकोश, गॅझेटियर, अॅटलास, इअरबुक, डिक्शनरी इ. संदर्भग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधीत विषयाला अनुसरून नविन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये विकत घेतलेली १९,८३५ व देणगी दिलेली १,७९५ एवढी पुस्तकांची संख्या आहे. ग्रंथालयामध्ये एकदंरीत २१,६३० इतका ग्रंथसंग्रह उपलब्ध आहे.

सार्वजनिक दृष्ट्या महत्वाचे विषय असलेले आणि संदर्भाकरीता उपयोग व्हावा या दृष्टीने यशवंतराव चव्हाण ग्रंथालयानी काही महत्वाच्या विषयासंबंधीची वृत्तपत्रीय कात्रणे काढून वाचकांना हाताळता यावी याकरीता व्यवस्थीत बांधणी करून ग्रंथालयामध्ये संदर्भाकरीता ठेवली आहेत.

विदयार्थी, संशोधक यांच्याकरीता अदययावत माहिती करीता नियतकालिकांची बांधणी करून, त्यांची संगणकावर नोंद ठेवली आहेत.

ग्रंथालयाचा वापर वाचकांना सहज व सुलभतेने व्हावा यादृष्टीने तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. याकरीता पुस्तकाची यादी अध्ययावत ठेवण्याकरीता संगणकीकरण करण्यात आले आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रंथालय व्यवस्थापनात आधुनिकीकरण होत चालले आहे. ग्रंथालय सॉफ्टवेअरच्या मदतीने ग्रंथालयाचे संगणकीकरण पुर्ण झाले आहे. यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचकांना सहज उपलब्ध व्हावीत याकरीता OPAC (Online Public Access Catalalogue) ग्रंथालयानी वाचकाच्या माहिती सेवेसाठी सुरू केले आहे. यामध्ये लेखक, सहलेखक, ग्रंथनाम, विषय, वर्ष, प्रकाशक, वर्गाक यांचा वापर करून OPACच्या मदतीने वाचकांना माहिती व ग्रंथाची सुची मिळविता येते.

ग्रंथालयामध्ये AACR-II अॅग्लो अमेरीकन कॅटलॉग रूल्स-२ प्रमाणे संगणकीय तालीकीकरण करण्यात आले आहे. तसेच DDC-21 (डेव्ही डेसिमल वर्गीकरण) नुसार ग्रंथाचे वर्गीकरण केले असून DDC प्रमाणे (000-CCC) मुख्य वर्गाक आणि त्यांचे उपवर्ग यानुसार ग्रंथाची मांडणी केलेली आहे. तसेच आधुनिक प्रणालीचा वापर करून ग्रंथालयातील पुस्तकांना BARCODE करून तालिकीकरणासारख्या क्षेत्रात देवघेव करता येणे शक्य झाले आहे. सर्व ग्रंथ याच पद्धतीप्रमाणे कपाटामध्ये ठेवण्यात आले असून OPAC च्या मदतीने माहीती मिळवून पाहिजे असलेल्या ग्रंथाचा शोध अचुकपणे घेता येतो.

**सभासदत्व :-**

अ) सर्वसाधारण सभासद करीता रू. २५०/- वार्षिक वर्गणी तसेच रू. २५०/- अनामत रक्कम भरून सभासदांना एकावेळी एक ग्रंथ देण्याची व्यवस्था केली आहे.

ब) महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांच्याकरीता त्यांना सवलत म्हणून वर्गणी रू. ५०/- व अनामत रक्कम १००/- रू. घेण्यात येत असून अशा विद्यार्थी, संशोधक यांना, ग्रंथ, संदर्भग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयामध्ये बसून वाचण्यासाठी, संदर्भासाठी देण्यात येतात.

ग्रंथालयाचे आयोजन व व्यवस्थापन यांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले आहे. ग्रंथालय व्यवस्थापनाचे काम श्री. अनिल पाझारे करतात. सौ. प्रियंका देसाई आणि श्री. अनिल चिंदरकर हे सहकार्य करतात.

१ सप्टेंबर २००९ ते १० फ्रेबु. २०१० या कालखंडामध्ये ग्रंथालयांनी काही महत्वाच्या पुस्तकांची खरेदी केली आहे. खालीलप्रमाणे.

१) एका तेलियाने- कुबेर, गि.
२) ग्लोबल वॉर्मिंग - घोरपडे, अ.
३) मी नाही कुणाची - पगारिया, सू.
४) भुमिपुत्र - कोंडविलकर, मा.
५) मास्तरांची सावली - सुर्वे, कृ.ना.
६) The creation - Wilson, E.O.
७) My nine lives - Jhabvala, R.P.
८) The unknowable Gurdjieff - Anderson, M.
९) Why choose this book ? - Montague, R.
१०) Essay on India - Desai, A.

# विभागीय केंद्र, रत्नागिरी
## कार्यवृत्त

**१) १, ऑक्टोबर, २००९ - ज्येष्ठ नागरिक दिन :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई कोकण विभागीय समितीच्यावतीने ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त दि. १, ऑक्टोबर, २००९ रोजी रत्नागिरी येथे कोकणातील चारही जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरीकांचा आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रात योगदान दिलेल्या सात ज्येष्ठ नागरिकांची सत्कारासाठी निवड करण्यात आली होती. सन्माननीय ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ व यशवंतराव चव्हाण यांचे 'सह्याद्रीचे वारे' हे पुस्तक भेट म्हणून देवून विभागीय अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये व उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी वयोवृध्द माजी आमदार श्री. शशिशेखर आठल्ये गुरूजी (वय वर्षे ९८) व प्रतिथयश वयोवृद्ध डॉ. वि. म शिंदे यांचे प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ नागरीकांचा सन्मान कार्यक्रम संपन्न झाला.

**२) ५ ऑक्टोबर २००९ - कै. भाऊसाहेब नेवाळकर स्मृतिदिनानिमित्त औद्योगिक चर्चासत्र :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय केंद्र, रत्नागिरी व सहजीवन कॉलेज, खेड यांचे संयुक्त विद्यमाने 'असा घडतो उद्योजक' या विषयावर औद्योगिक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सुप्रसिद्ध उद्योजक श्री. हिराभाई बुटाला, श्री. सुनिल शिर्के, श्री. मिलींद बारटक्के, श्री. प्रशांत पटवर्धन यांनी चर्चेद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**३) ६, नोव्हेंबर ०९ - महिलांसाठी निसर्गोपचार शिबीर (भोम) :** महिलांना औषधी वनस्पतींची ओळख व उपयोग यासाठी भोम, ता. चिपळूण येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व यशवंत शिक्षण संस्था, भोम तसेच रत्नागिरी जिल्हा महिला पतसंस्था यांचे संयुक्त विद्यमाने महिलांसाठी 'वनऔषधी ओळख' शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये वनौषधीचे महत्व देवून त्यांचे संवर्धन होणे का गरजेचे आहे हे सांगण्यात आले. वनौषधी संबंधी माहिती देण्यासाठी डॉ. जाधव, शेतीमळा सावर्डे यांना बोलविण्यात आले होते.

**४) १४, नोव्हेंबर ०९ - शिक्षक दिन :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती रत्नागिरी व न्यू एज्युकेशन सोसायटी लांजा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५, सप्टेंबर शिक्षक दिन, प्रतिष्ठानच्या वतीने संपन्न होणारा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम दि. १४, नोव्हेबर ०९ रोजी कला वाणिज्य महाविद्यालय, लांजा येथे संपन्न झाला. यावेळी राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते श्री. शांताराम सुर्वे तसेच आदर्श शिक्षक सौ. साधना बावधनकर, सौ. पुष्पलता जगताप, श्री. महादेव पन्हळेकर यांचे शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व यशवंतराव चव्हाण यांचे पुस्तक देऊन श्री. राजाभाऊ लिमये, जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, संस्थेचे विश्वस्त श्री. भाऊ वंजारे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

**५) २५, नोव्हेंबर ०९ - यशवंतराव चव्हाण स्मृतीदिन :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती, रत्नागिरी व सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डे यांचे संयुक्त विद्यमाने आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या स्मृतीदिना निमित्त दि. २५ नोव्हेंबर ०९ रोजी सह्याद्री शिक्षण संस्ता, सावर्डा येथे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व बक्षिस समारंभाचा भव्य कार्यक्रम ज्येष्ठ पत्रकार, चरित्रकार व यशवंतराव चव्हाण यांचे स्नेही मा.श्री. रामभाऊ जोशी यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. यशवंतराव चव्हाण यांच्या २५व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून प्रथम तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक तालुक्यातील प्रथम क्रमांकाची निवड जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी करण्यात आली. यावेळी ८ स्पर्धक सहभागी झाले होते. त्यामधुन ३ विजयी क्रमांकाची निवड करण्यात आली. विजेत्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, रोख रक्कम, गुलाबपुष्प व 'यशवंत स्मृती सुगंध' हे पुस्तक देवुन मा.श्री. रामभाऊ जोशी यांचे हस्ते गौरविण्यात आले.

**६) १८, डिसेंबर ०९ - सोयाबीन प्रशिक्षण :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र कोकण जिल्हा समिती, रत्नागिरी व कृषी विज्ञान केंद्र, देवधे, लांजा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८, डिसेंबर ०९ रोजी प्रतिष्ठानच्या मारूती मंदिर येथील कार्यालयात महिलांना सोयाबीन पासून विविध पदार्थ बनविण्याचे एकदिवसीय प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी भोपाळ येथील सोयाबीन उपयोगिता केंद्राचे तांत्रिक प्रशिक्षक श्री. बी. मेस्त्री व प्रा. सौ. सुमेधा देशपांडे यांनी सोयाबीन पासून विविध पदार्थ प्रात्यक्षिकासह करून दाखविले. यामध्ये सोयाबीन पासून दूध,

पनीर, दही, शिरा, भजी, भाकरी, सोया नमकीन असे विविध पदार्थ कसे करायचे त्याचे प्रशिक्षणार्थी महिलांच्या सहकार्याने करून दाखविले.

**७) २५, डिसेंबर ०९ - शरीर सौष्ठव स्पर्धा :-** चिपळूण येथील प्रेरणा प्रतिष्ठान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांचे संयुक्त विद्यमाने चिपळूण शहरातील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रा समोरील पटांगणातील यशवंतराव चव्हाण क्रिडा नगरीत आयोजित राज्यस्तरीय शरीर सौष्ठव निवड स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत चिपळूणच्या राजेंद्र मोडक यांनी रत्नागिरी प्रेरणा उदय, रत्नागिरीच्या वैभव कांबळे यांनी रत्नागिरी प्रेरणा श्री, तर चिपळूणच्या अशोक चव्हाण यांनी रत्नागिरी प्रेरणा श्रीमानचा बहुमान पटकवला. या स्पर्धेत राज्यातील १०५ स्पर्धक सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कोकण विभागीय अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक श्री. राजू देवळेकर, नगरसेविका हर्षदा भोसले, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के, सदस्य श्री. बापू काणे, सचिव प्राची शिंदे, नगरसेवक श्री. शशिकांत मोदी आदि उपस्थित होते.

**८) २, जानेवारी २०१० - वनौषधी शिबीर :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती रत्नागिरी जिल्हा महिला पतसंस्था मर्या. रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने तालुका लांजा येथील रासाई मंडळ, मावळतवाडी, कुवे येथे दि. २, जानेवारी २०१० रोजी ग्रामीण भागातील महिलांसाठी वनौषधी शिबीर आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये १०० ते १५० वनस्पतींची ओळख करून देण्यात आली. वनस्पतींचे उपयोग व त्यापासून स्वयंरोजगार कसा निर्माण करता येईल याचीही माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणाला वनौषधी तज्ञ श्री. विनायक बापट यांनी मार्गदर्शन केले. औषधी वनस्पती कोणत्या व त्याचे महत्त्व याची माहिती जिल्हाध्यक्षा सौ. राजेशिर्के यांनी महिलांना दिली. प्रतिष्ठान तर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती सचिव प्राची शिंदे यांनी दिली.

**९) ३१, जानेवारी २०१०- 'कसे असावे वक्तृत्व' या विषयावर कार्यशाळा शिबीर :-** कनिष्ठ महाविद्यालयीन मुलांच्या 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाल्या. या वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसाची 'कसे असावे वक्तृत्व' या विषयी कार्यशाळा डी.बी.जे. कॉलेज चिपळूण येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, व डी.बी.जे. कॉलेज चिपळूण यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा ११ ते २ व ३ ते ५ या दोन सत्रांत घेण्यात आली. या कार्यशाळेला प्रवचनकार श्री. धनंजय चितळे, कथाकथनासाठी श्री. प्रशांत पटवर्धन, वक्तृत्व मध्ये साहित्याचा वापर यावर प्रा.सौ. मिनल ओक, प्रा.सौ. कुलकर्णी, उत्तम सुत्रसंचालन कसे असावे यासाठी सौ. अपर्णा कदम तसेच श्री. मंदार ओक, श्री. शिरीश काटकर या तज्ञांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी फोल्डर व पेनचे प्रायोजकत्व श्रीमती अनुराधा निकम यांनी दिल्याबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने आभार मानण्यात आले. तसेच श्री. बापू काणे यांनी मुलांची नाश्ता व जेवणाची सोय केली. चिपळूण व्यतिरिक्त इतर तालुक्यातुन आलेल्या मुलांना जाण्या-येण्याचे एस.टी. तिकीटाचे पैसे प्रतिष्ठान तर्फे देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चिपळूणचे सदस्य श्री. बापू काणे व जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

**१०) ७ फेब्रुवारी २०१० - मत्स्य प्रक्रिया प्रशिक्षण :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्र, जिल्हा समिती रत्नागिरी व कोकण कृषी विद्यापीठ दापोली, मत्स्य महाविद्यालय शिरगांव रत्नागिरी यांचे विद्यमाने मत्स्य प्रक्रिया प्रशिक्षण शिबीर दि. ७ फेब्रुवारी २०१० रोजी वेळणेश्वर, ता. गुहागर येथे आयोजित करण्यात आले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली विस्तार शिक्षण विभागांचे संचालक मा. डॉ. अशोक पोवार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष मा.श्री. राजाभाऊ लिमये, सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री. शेखर निकम, जिल्हाध्यक्षा मा. युगंधरा राजेशिर्के, मत्स्य महाविद्यालय शिरगांव रत्नागिरीचे सहयोगी अधिष्ठाता मा.डॉ. शेखर कोवळे यांनी मार्गदर्शन केले.

११) कै. यशवंतराव चव्हाण यांच्या २५व्या स्मृतिदिनानिमित्त 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण' या विषयावर सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ले येथे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. यशवंतराव चव्हाण प्रतिषठान व एम.के. गावडे प्रबोधिनी यांचे संयुक्त विद्यमाने या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये शिवराज मराठा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, साळगावची कु. रोशनी पालकर प्रथम, बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालयाची कु. माधवी गोवेकर द्वितीय व प्रमोद रविंद्र धुरी अध्यापक विद्यालय साळगावची कु. प्रगती भोसले हीने तृतीय क्रमांक मिळवीला. स्पर्धेतील विजेत्यांना मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कमेची बक्षीसे देण्यात आली. या स्पर्धेतील स्पर्धकांनी कै. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाचे धडे उघड केले.

# विभागीय केंद्र, नागपूर
## कार्यवृत्त

**स्वाईन फ्लू वर-पथनाटय दि. २, सप्टेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व दक्ष नागरिक फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वाईन फ्लू जनजागृती पथनाटयाचे, दि. २, सप्टेंबर, २००९ रोजी आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठानच्या कार्यालयापासून या उपक्रमाचा प्रारंभ करुन मूकबधिर महाविद्यालय, शंकरनगर चौक, दै. सकाळ, दै. पुण्यनगरी, लोकमत चौक, बर्डी, बसस्थानक, फुटाळा तलाव अशा विविध गर्दीच्या ठिकाणी या पथनाटयाचे सादरीकरण करुन जनजागृती करण्यात आली.

**नव्या जाणिवांचे कवी – उपक्रम – दि. १२ सप्टेंबर, २००९**

विदर्भातील नवनवीन कवींना ऐकण्याची संधी रसिक श्रोत्यांना-कवींना मिळावी यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने 'नव्या जाणिवांचे कवी' या उपक्रमाची सुरवात करण्यात आली. या उपक्रमाच्या सुरवातीला सावनेर येथील कवी गणेश भाकरे, रामटेकचे प्रा. गिरीश सपाटे, नागपूरच्या मेघा देशपांडे, दीपा काकडे, उपस्थित होते. प्रत्येक कवींनी १० ते १५ कविता या उपक्रमास सादर केल्या यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माग्रसचे सुधीर देव उपस्थित होते. डॉ. कोमल ठाकरे, डॉ. चंद्रभान भोयर, उल्हास मनोहर, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक-त्यामागची भूमिका प्रतिष्ठानच्या सदस्या मनीषा साधू यांनी स्पष्ट केली.

**'हास्यपूर्णा' प्रकाशन समारंभ – दि. २३, सप्टेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व ऋचा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने उदयन ब्रम्ह लिखित 'हास्यपूर्णा' या विनोदी कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ दि. २३ सप्टेंबर, ०९ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. मनोहर म्हैसाळकर तसेच श्री. गिरीश गांधी, आशा बगे व निवृत्त विंग कमांडर अशोक मोटे अतिथी म्हणून उपस्थित होते. विनोदात जीवन जगण्याचे विलक्षण सामर्थ्य असल्याचा विश्वास आशा बगे यांनी व्यक्त केला. निवृत्त विंग कमांडर अशोक मोटे यांनी हसण्यासाठी लाफ्टर क्लब काढावे लागतात ही शोकांतिका असून कृत्रिम हसण्यापेक्षा मनापासून हसण्याचा त्यांनी सल्ला दिला. जीवनातून विनोद आणि हास्य कमी होत असल्याकडे गिरीश गांधी यांनी लक्ष वेधले. निकोप विनोदाच्या दृष्टीने हे पुस्तक महत्वाचे असल्याचे गिरीश गांधी म्हणाले. अध्यक्षस्थानावरुन बोलताना श्री. मनोहर म्हैसाळकर म्हणाले की, विनोदावर बोलणे कठीण असून अचानक झालेला विनोद हा ठरवून केलेल्या विनोदापेक्षा परिणामकारक असतो. व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांनी 'हास्यपूर्णा' कथासंग्रहाचे प्रकाशन केले. संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. कार्यक्रमात साहित्य क्षेत्रातील मान्यवरांसह रसिक मोठयासंख्येने उपस्थित होते.

**डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या चर्चेचे आयोजन – दि. २४ सप्टेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. २४ सप्टेंबर, ०९ रोजी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण समितीचे अध्यक्ष डॉ.आ.ह. साळुंखे यांचेशी चर्चेचे आयोजन करण्यात आले. नागपूर शहरातील साहित्य-कला-सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसोबत ही चर्चा झाली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष व समितीचे सदस्य मा.श्री.गिरीश गांधी प्रामुख्याने उपस्थित होते. शाल, श्रीफळ देऊन डॉ.भा.ल. भोळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण आखतांना सर्व मान्यवरांनी केलेल्या सूचना विचारात घेतल्या जाईल. असे ते याप्रसंगी म्हणाले. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ.भा.ल. भोळे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सीमाताई साखरे, लोकसत्ताचे संपादक प्रवीण बर्दापूरकर, डॉ. हरिश्चंद्र बोरकर, चंद्रकांत वानखेडे, माया वानखेडे, हरिश अड्याळकर, डॉ. रविन्द्र शोभणे, डॉ. अविनाश रोडे, अरुणा देशमुख, डॉ. प्रमोद मुनघाटे, हिरामण लांजे, डॉ. चंद्रभान भोयर, गणेश नायडू आदी मान्यवरांनी चर्चेत सहभाग घेतला.

**राज्यस्तरीय मराठी वाचन स्पर्धा - दि. २ आक्टोबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व अभिनव कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भाईंदर (ठाणे) यांच्या संयुक्त वतीने कै. विवेक रामचंद्र जोग राज्यस्तरीय मराठी वाचक लेखी स्पर्धा परिक्षेचे आयोजन शुक्रवार दि. २ आक्टोबर, ०९ रोजी सकाळी १०.०० वाजता स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

नागपूर शहरातील महाविद्यालयीन गट व खुल्या गटात ही परीक्षा घेण्यात आली.

**ज्येष्ठ नागरिक सत्कार सोहळा - दि. २ आक्टोबर, २००९**

दि. २ आक्टोबर, २००९ ला सायंकाळी ५.०० वाजता मा.श्री. गिरीश गांधी अध्यक्ष यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक तथा परिसर नागरिक मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांच्या सत्काराचे आयोजन फेस्कॉम व ज्येष्ठ नागरिक तथा परिसर नागरिक मंडळ, धरमपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

डॉ. सुनंदा चावजी यांनी 'ज्येष्ठांचे आरोग्य' डॉ. सोनाली बिरेवार यांनी ज्येष्ठांनी घ्यावयाची 'दातांची काळजी' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. कुमार शास्त्री यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री या विषयावर आपले विचार मांडले.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या २६ सदस्यांचा विचारपुष्प प्रदान करुन सत्कार करण्यात आला. सोबतच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहयोग देणाऱ्या कार्यकर्त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन भाऊराव बिरेवार व सुप्रिया बगाडे यांनी केले.

**धुक्यात विरलेले आर्त-पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. ३ आक्टोबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने अमरातवीच्या डॉ. शोभा रोकडे यांच्या 'धुक्यात विरलेले आर्त' या कविता संग्रहाचा प्रकाशन समारंभ दि. ३ आक्टोबर, ०९ रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. गिरीश गांधी, प्रमुख अतिथी म्हणून मुंबईच्या कवयित्रि नीरजा, गोदा प्रकाशनचे दादासाहेब गोरे, डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित होते. याप्रसंगी वक्ता म्हणून बोलताना प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी डॉ. शोभा रोकडे यांच्या कविता राधाभाव जपणाऱ्या असून या काव्यसंग्रहाच्या निमित्ताने कवयित्रीने तरल भावनांना हात घातला हे महत्वाचे आहे असे मत व्यक्त केले. कवयित्री नीरजा, डॉ. प्रमोद मुनघाटे, दादासाहेब गोरे यांनी आपले विचार प्रकट केले.

**नव्या जाणिवांचे कवी - ११ आक्टोबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दि. ११ आक्टोबर, २००९ रोजी काव्य-उपक्रमांतर्गत 'नव्या जाणिवांचे कवी' हा चर्चात्मिक काव्य उपक्रम घेण्यात आला. विदर्भातील सर्व कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्दशाने घेण्यात येत असलेल्या या उपक्रमात यवतमाळ येथील सलील कांबळे, प्रभाकर कुबडे, (गडचिरोली), स्मिता राऊत, (रामटेक), रोहिणी हटकर (नागपूर), अनुपमा मुंजे, (नागपूर) इत्यादी कवींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानच्या सदस्या सौ. मनीषा साधू यांनी केले तर चर्चेची सूत्रे सांभाळण्यासाठी मुख्य अतिथी अध्यक्ष म्हणून कवी ज्ञानेश वाकुडकर उपस्थित होते.

**''यमू'' व ''श्रावणी'' कादंबरी प्रकाशन समारंभ - दि. २५ आक्टोबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दि. २५ आक्टोबर, २००९ रोजी सौ. विजया ब्राह्मणकर यांच्या 'यमू' व 'श्रावणी' या दोन कादंबऱ्यांचा प्रकाशन सोहळा श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री. गिरीश गांधी उपस्थित होते. प्रमुख अतिथी सौ. शुभांगीताई भडभडे यांच्या उपस्थितीत 'यमू' व 'श्रावणी' या दोन कादंबऱ्यांचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. मा. स्मृती देशपांडे व डॉ. कुमार शास्त्री यांनी या कादंबऱ्यांवर भाष्य केले. प्रा. विजया मारोतकर यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

**''मेरी मराठी कविता'' प्रकाशन समारंभ - दि. ८ नाव्हेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व विवेक प्रकाशन नागपूरच्या संयुक्त वतीने रविवार दि. ८ नोव्हेंबर, ०९ रोजी दुपारी १.०० वाजता कवी हिरामन लांजे 'रमानंद' यांच्या अनुवादीत कविता संग्रह 'मेरी मराठी कविता' या पुस्तक प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथी डॉ. हरिश्चंद्र बोरकर, मा.श्री. प्रवीण् बर्दापूरकर, मा. उमेशजी चौबे कवयित्री सौ. आशाताई पांडे उपस्थित होत्या.

**'नव्या जाणिवांचे कवी'' - ८ नाव्हेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविवार दि. ८ नोव्हेंबर, ०९ रोजी सांयकाळी, ५.३० वाजता काव्य-उपक्रमांतर्गत ''नव्या जाणिवांचे कवी'' हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.डॉ. अरुणा देशमुख उपस्थित होत्या. नवे जग, नव्या जगाचे स्वरुप सांगणाऱ्या प्रतिमासंपन्न अशा कविता, पुढच्या पिढीला मागच्या पिढीने काय दिले याचा विचार करायला भाग पाडणाऱ्या कविता, समाजातील विषमतेतून विषम स्वरुपाने व्यथित होऊन प्रखर सामाजिक जाणिवांच्या कविता. मृत्युंशी नातं सांगणाऱ्या कविता, या उपक्रमातून रसिकांपर्यंत पोहोचल्या. हे या उपक्रमाचे यश आहे असे त्या याप्रसंगी म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानच्या सदस्या सौ. मनीषा साधू यांनी केले. कवी किशोर कवठे, मु.पो. विरुर, जि. चंद्रपूर, कवी जगदीश गुजरकर, रामटेक, प्रा. मेघा नागोशे, नागपूर, शिवानी दाणी, नागपूर इ. कवी सहभागी झालेत. रसिक प्रेक्षकांनी या काव्यचर्चेत उस्फुर्तपणे भाग घेऊन कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय मांडवकर यांनी केले तर प्रभाकर कुबडे यांनी आभार मानले. कवी ज्ञानेश वाकुडकर, कवी कृष्णा चौधरी, मधूकर कडू, शुभांगी रथकंठीवार, इत्यादी उपस्थित कवींनी चर्चेत सहभाग घेतला.

**स्व. यशवंतराव चव्हाण यांची २५ वी पुण्यतिथी - दि. २५ नाव्हेंबर, २००९**

महाराष्ट्राचे शिल्पकार व देशाचे माजी उपपंतप्रधान स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने बुधवार दि. २५ नोव्हेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे आय.बी.एन. लोकमत वाहिनीचे संपादक श्री. निखील वागळे यांचे 'महाराष्ट्राची पन्नास वर्षाची वाटचाल' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व तरुण भारतचे माजी मुख्य संपादक मामासाहेब घुमरे व ज्येष्ठ पत्रकार (दैनिक रामप्रहर, मुंबई) मधुकर भावे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला. गेल्या ५० वर्षात पत्रकारितेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलल्याची खंत व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. गिरीश गांधी यांनी केले. सूत्रसंचालन मनीषा साधू यांनी केले तर डॉ. कोमल ठाकरे यांनी आभार मानले.

महाराष्ट्राच्या बांधणीकरीता यशवंतराव चव्हाणांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असणाऱ्यांना सोबत घेतले. महाराष्ट्रातील प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण कसे होईल असे चित्र त्यांनी मांडले पण यशवंतरावांनंतर मोजके एकदोन नेते सोडले तर कुणीही दूरदृष्टी टेवून विकासाकरीता प्रयत्न केले नाही अशी खंत कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व दै. तरुण भारतचे माजी मुख्य संपादक मामसाहेब घुमरे यांनी व्यक्त केली.

**पुस्तक प्रकाशन सोहळा - दि. २६ नाव्हेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने गुरुवार दि. २६ नोव्हेंबर, ०९ रोजी सांयकाळी, ५.३० वाजता वा.रा. गाणार यांच्या 'बुद्ध बनाम गांधी', 'बहिष्कृत समाजोद्धारकः नानासाहेब गवई', 'विविध शब्द लघुकोश' या तीन पुस्तकांच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

याप्रसंगी 'विविध शब्द लघुकोश' या पुस्तकावर दै. तरुण भारतचे संपादक सुधिर पाठक व 'बुद्ध बनाम गांधी' या पुस्तकावर दैनिक भास्करचे संपादक प्रकाश दुबे यांनी तर ज्येष्ठ पत्रकार

उमेश चौबे यांनी 'बहिष्कृत समाजोद्धारक : नानासाहेब गवई' या पुस्तकावर अभ्यासात्मक विवेचन केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. शशिकांत शर्मा यांनी केले तर आभारप्रदर्शन श्री. विजय जिचकार यांनी मानले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

**२६/११ च्या निमित्ताने - दि. २६ नाव्हेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने गुरुवार दि. २६ नोव्हेंबर, ०९ रोजी सांयकाळी, ७.३० वाजता स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे २६ नोव्हेंबरला मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. गिरीश गांधी उपस्थित होते.

दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक सुधीर पाठक, सेवानिवृत्त मेजर हेमंत जकाते, नागपूर ग्रामीण पोलिस अधिक्षक सी.एच. वाकडे या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या घटनेप्रति व सद्याच्या परिस्थिती बद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. लढाई लढणे, देशाचे आणि जनतेचे संरक्षण करणे ही केवळ सैनिकांचीच जबाबदारी आहे असे आज २६/११ च्या घटनेला एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरही पोलिसांना आणि जनतेला वाटते ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. स्वतःचे आणि जनतेचे संरक्षण करायचे असेल तर प्रत्येक पोलिसाने जवान होण्याची गरज आहे असे प्रतिपादन गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादाचा सामना केलेले नागपूर ग्रामीण पोलिस अधिक्षक सी.एच. वाकडे यांनी केले.

याप्रसंगी दोन मिनीटांचे मौन पाळून शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. सौ. विजया मारोतकर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. सौ. शुभांगी रथकंठीवार यांनी हल्ल्याच्या प्रासंगिकतेवर ऱ्हासपर्व या लघूकथेचे कथन केले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजय जिचकार, कोषाध्यक्ष संजय कोंडावार, व्यासपीठावर होते.

**सकाळ करंडक नाट्य प्रशिक्षण शिबीराचे आयोजन - दि. ३ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व दैनिक सकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. ३ डिसेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे सकाळी ११ वाजता सकाळ करंडक नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

रंगमंचावर वावरताना काय खबरदारी घ्यावी, रंगमंचावर किती स्पॉट असू शकतात, डिमर म्हणजे नेमके काय, अभिनय, दिग्दर्शन करताना कुठली पथ्ये पाळावित अशा एक ना अनेक बाबी रंगमंचावर जाण्याची तयारी करणाऱ्या विद्यार्थी स्पर्धकांसाठी सुप्रसिद्ध नाट्यलेखक आणि रंगकर्मी योगेश सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा राबविण्यात आली.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या शुभहस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. कलेत सातत्य असावे, रंगकर्मींनी सतत 'पॉलीश' व्हायला हवे त्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यशाळेची आवश्यकता असते. एवढेच नव्हे तर कुठल्याही उपक्रमात प्रत्येकाचा सहभाग अत्यावश्यक आहे असे विचार याप्रसंगी गिरीश गांधी यांनी प्रकट केले.

श्री. कोटेकर यांनी 'सकाळ' ची भूमिका विशद केली. स्पर्धेचे विदर्भ समन्वयक महेंद्र सुके यांनी संचालन केले नवोदित रंगकर्मींच्या उपस्थितीने सभागृहात चैतन्य निर्माण झाले होते.

**नागपूर हिवाळी अधिवेशनाकडून अपेक्षा - परिसंवाद - दि. ७ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सोमवार दि. ७ डिसेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे 'नागपूर हिवाळी अधिवेशनाकडून अपेक्षा' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत महेश जोशी, आमदार मा. श्री. देवेंद्र फडणवीस, माजी खासदार गेव्ह आवारी, चळवळीतील पत्रकार श्री. रणजित मेश्राम या वक्त्यांनी परिसंवादात सहभाग घेतला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांनी परिसंवाद आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

जनतेचे प्रश्न वाढत आहेत. सरकारच्या कामाची व्याप्ती देखील वाढत आहे. परंतु विधीमंडळाच्या कामाकाजाचे दिवस कमी होत आहेत ही संसदीय लोकशाही संपण्याची नांदी होय

असा गंभीर इशारा महेश जोशी यांनी दिला. संसदीय लोकशाही आणि वेगवान आर्थिक विकास साधायचा असेल तर घटनादुरुस्त करुन अधिवेशनाचे दिवस निश्चित केले पाहिजे अशी मागणी माजी खासदार गेव्ह आवारी यांनी याप्रसंगी केली. वैदर्भीय प्रश्नाकडे राज्यीय दृष्टीने बघण्यात येत नाही अशी खंत व्यक्त करुन सामाजिक कार्यकर्ते रणजित मेश्राम यांनी वैदर्भीयांनी याचक भाव संपविला पाहिजे असे मत व्यक्त केले.

विदर्भातील मंत्री नाही दिलेत तरी चालेल, परंतु विदर्भाबाहेरील मंत्र्यांनी विदर्भ महाराष्ट्र राज्यात आहे याचे भान ठेवले तरी पुरेसे आहे. असे प्रतिपादन आमदार देवेंद्र फडणवीस यांनी केले.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्रा. सुरेश द्वादशीवार म्हणाले की, नागपुरातील हिवाळी अधिवेशनात विदर्भाला काही मिळाले नाही तरी चालेल परंतु मुंबईत केल्या तशा मारामाऱ्या तरी करु नका, एवढीच अपेक्षा आहे. अशी तीव्र शब्दात सुरेश द्वादशीवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. संसदीय चर्चेमुळे प्रगती मंदावत नाही असे नमुद करुन ते म्हणाले की, सभागृहात जनतेच्या मानसिकतेवर प्रहार अस्मितेच्या होतात हे चूक आहे. जनतेच्या प्रश्नावर चर्चा करताना ते म्हणाले की, सभागृहात जनतेच्या प्रश्नावर चर्चा होत नाहीत, अस्मितेच्या होतात हे चूक आहे. जनतेच्या मानसिकतेवर प्रहार करताना ते म्हणाले की, आमच्यावर अन्याय करणारे आपल्या जातीचे चालतात, दुसऱ्या जातीचे नाही चालत अशी जर मानसिकता असेल तर अधिवेशनाकडून काय अपेक्षा करणार असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**सिंधूताई सपकाळ यांचे व्याख्यान - दि. ११ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने शुक्रवार दि. ११ डिसेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे सामाजिक कार्यकर्त्या मा. सिंधूताई सपकाळ यांच्या ''संघर्षातून शिखराकडे'' या ''व्याख्यानाचे'' आयोजन करण्यात आले.

आयुष्यात कितीतरी संकटे आलीत तरी हिम्मत सोडू नका. संकटावर मात करुन जिद्दीने पुढे जा. आयुष्य जगा आणि संघर्षातून शिखराकडे वाटचाल करा असा मोलाचा सल्ला सामाजिक कार्यकर्त्या सपकाळ उपाख्य 'माई' यांनी याप्रसंगी महिलांना दिला.

संसार ही सायकल असून पती-पत्नी चाके आहेत. त्यामुळे दोघांनाही एकमेकांच्या भावना जपायला हव्यात. आई घराचे मांगल्य तर वडील घराचं अस्तित्व दोघे सोबत असतील तरच आनंदाने संसार करता येतो. वेळप्रसंगी हट्ट बाजूला करुन स्त्रियांनी सोशिक बनले पाहिजे.

कार्यक्रमाला माजी आमदार विनायकराव मेटे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी, आकांक्षा मासिकाच्या संपादिका अरुणा सबाने उपस्थित होत्या. अध्यक्षीय भाषणात श्री. मेटे यांनी महिलांना गरुड झेप घेण्याचे आवाहन केले. अरुणा सबाने यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात गिरीश गांधी यांनी सिंधुताईंच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले तर. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजय जिचकर यांनी आभार मानले.

**नव्या जाणिवांचे कवी-काव्य उपक्रम - दि. १३ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने सोमवार दि. १३ डिसेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे 'नव्या जाणिवांचे कवी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात विदर्भातील नवोदित कवींनी शब्दरुपात आपल्या भावना मांडल्या. नवोदित व युवा कवींना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने आयोजित उपक्रमात प्रमोद लेंडे (खैरगावकर), नेहा भांडारकर, ममता धनकर, या कवींनी भाग घेतला.

**'बिल्वदल'-अमृत महोत्सवी वर्ष - दि. १५ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व सप्तरंग, नागपूरच्या वतीने मंगळवार दि. १५ डिसेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे अमृत महोत्सवी सोहळ्याअंतर्गत जुन्या नव्या मराठी कवितेच्या मैफीलीचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री. गिरीश गांधी उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री. प्रकाश एदलाबादकर उपस्थित होते. कार्यक्रमाची संकल्पना मिलींद देशपांडे यांनी आपल्या प्रास्ताविकातून मांडली.

**गौरव ग्रंथ प्रकाशन समारंभ - दि. १९ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व युगसाक्षी प्रकाशनच्या वतीने डॉ. यशवंत मनोहर यांच्या साहित्यावर ''वेधःएका युगसाक्षी प्रतिभेचा'' या गौरव ग्रंथाच्या प्रकाशन समारंभाचे शनिवार दि. १९ डिसेंबर, ०९ रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजन करण्यात आले.

डॉ. यशवंत मनोहर यांच्या चिंतनातून आलेल्या लेखनाचा विषय ''सर्वांगीण शोषणमुक्त माणूस'' आहे हेच सौंदर्यमूल्य साहित्यातून मांडताना चार्वाक, बुद्ध, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या दृष्टीतील सामाजिक पुनर्रचनेच्या स्वप्नाला डॉ. मनोहरांनी वास्तवात आणले असे गौरवोद्‌गार मान्यवरांनी याप्रसंगी काढले.

**श्रद्धांजली कार्यक्रम - मंगळवार दि. २२ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर विदर्भ साहित्य संघ व अ.भा.नाट्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने डॉ. दिलीप चित्रे, डॉ. अरुण कांबळे, वसंत नानल ज्येष्ठ पत्रकार सत्यनारायण दुबे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

डॉ. चित्रे, डॉ. कांबळे, नानल, दुबे ही सर्व महाराष्ट्रातील गुणी माणसे होती या शब्दात गिरीश गांधी यांनी या मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण केली.

अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर होते. गिरीश गांधी, मनोहर म्हैसाळकर, मदन गडकरी, ज्येष्ठ पत्रकार, डॉ. रविंद्र शोभणे, प्रभा देऊस्कर, श्रद्धा तेलंग, भाई पंचभाई, रत्नाकर मेश्राम, वा.रा. गाणार, डॉ. सुनील रामटेके प्रामुख्याने उपस्थित होते.

**सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ - दि. २५ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व अक्षरभूषण भाकरे प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या सुंदर हस्ताक्षर स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन शिक्षक सहकारी बँकेच्या सभागृहात करण्यात आले. इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी या तीन गटात ही स्पर्धा घेण्यात आली होती. त्यात एकशे सत्तावीश शाळेतील सव्वालाख विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. कार्यक्रमाला बसोलीचे प्रमुख व चित्रकार चंद्रकांत चन्ने, श्री. गिरीश गांधी, शिक्षणाधिकारी महेश करजगावकर, बाबासाहेब पाटील, राजाभाऊ चिटणीस, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक वि.भ.करगुटकर, संजय भाकरे, ज्येष्ठ पत्रकार राम भाकरे यावेळी उपस्थित होते. यावेळी 'अक्षरघन' या मासिकाचे प्रकाशन पोलिस आयुक्त प्रवीण दीक्षित यांच्या हस्ते करण्यात आले.

पुरस्कार विजेते विद्यार्थी :- इयत्ता १ ली ते ४ थी प्रथम पुरस्कार - यश भागडकर (संजुबा प्राथमिक शाळा) द्वितीय पुरस्कार - यस्मिन कुरेशी (टिळक विद्यालय) तृतीय-अलश्री इनकाने (इंदिरा प्राथ. शाळा) उत्तेजनार्थ : अभिलाषा ढोणे, सुमंत वाहोकर, ५वी ते ७वी प्रथम प्राची पराते (न्यु इंग्लिश हायस्कूल) द्वितीय सुभाष उके (शिवाजी हायस्कूल) तृतीय पुरस्कार गणेश सपकाळ (केशवनगर माध्य. विद्यालय) उत्तेनार्थ तन्मय खोकले, स्वीटी तलमले पाटील (सी.पी. अॅन्ड बेरार) तृतीय खुशबू सव्वाशेरे (विश्वास माध्य. विद्यालय) कार्यक्रमाचे संचालन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. पारितोषिकांचे वाचन अजय भाकरे यांनी केले. आभार प्रदर्शन अभय भाकरे यांनी मानले.

**डॉ. भा.ल. भोळे यांना श्रद्धांजली - दि. २९ डिसेंबर, २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर विदर्भ साहित्य संघ, नागपूर, सर्वोदय आश्रम, नागपूर व आधार संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा.ल. भोळे यांची शोकसभा आयोजित करणयात आली.

शोकसभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नाटककार प्रा. महेश एलकुंचवार होते. भोळे हयात नाहीत हे सत्य सभागृहातील उपस्थितांना आणि वक्त्यांना पचवता येत नव्हते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे अध्यक्ष गिरीश गांधी, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मनोहर म्हैसाळकर, ज्येष्ठ संपादक मा.गो. वैद्य, आधार संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश रोडे, डॉ. ताराचंद खांडेकर, गांधीवादी विचारवंत सुरेश पांढरीपांडे, बाळू भोळे, हिरण्यमय भोळे, गौरी भोळे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

व्यासपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या लीलाताई चितळे, डॉ. रुपाताई कुळकर्णी, विचारवंत यशवंत मनोहर आणि कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष कृष्णा इंगळे उपस्थित होते.

**नव्या जाणिवांचे कवी-कव्या उपक्रम - दि. १० जानेवारी, २०१०**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने रविार दि. १० जानेवारी, १० रोजी स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह शंकरनगर चौक, नागपूर येथे 'नव्या जाणिवांचे कवी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी डॉ. शैलेंद्र लेंडे होते. या उपक्रमात पांढरकवडा येथील प्रा. उर्मिला निनावे, जयश्री पांगारकर, चंद्रपूरचे प्रा विजय सोरते, काटोलचे देवेंद्र तातोडे, नागपूरचे निरंजन अंधारे या कवींनी आपल्या कविता सादर केल्या.

काव्यचर्चेत नेहा भांडारकर, श्री. उत्तम यांनी सहभाग घेतला. प्रास्ताविक मनीषा साधू यांनी केले तर धनंजय मांडवकर यांनी सूत्रसंचालन केले.

**डॉ. अरुण साधू यांचे व्याख्यान - दि. १९ व २० जानेवारी, २०१०**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व दत्ताजी जोशी स्मृती व्याख्यानमाला समितीच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ व २० जानेवारी, २०१० रोजी मा. डॉ. अरुण साधू यांचे ''गटेन बर्ग ते आयपॉड'' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

''माध्यमक्रांती : ललित साहित्याचा अंत ? गटेन बर्ग ते आयपॉड'' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. आज माध्यमांचा प्रचंड विस्फोट झाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे माध्यमांमध्ये झालेल्या क्रांतीने साहित्यातही प्रचंड बदल केले आहेत. साधू यांनी यावेळी औद्योगिक क्रातीनंतर माध्यमांमध्ये कशी क्रांती होत गेली याचे विविध उदाहरणे देऊन विवेचन केले.

माध्यमक्रांतीचा परिणाम ललित साहित्यावरही झाला आहे. जीवनातील सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञानातील क्रांतीचा प्रचंड मारा होत असला तरी पुस्तक आणि वर्तमानपत्र वाचण्याचा आनंद ई-बुक आणि ई-मेलवरुन घेता येणार नाही. असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

टेलिफोनच्या आगमनापासून ते मोबाईल क्रांतीच्या युगाचे डॉ. अरुण साधू साक्षीदार आहेत. तंत्रज्ञान प्राथमिक अवस्थेत असतानाच्या अनेक गंमतीशीर आठवणी सांगतानाच, मुद्रीत साधनांचा विकास होण्यापूर्वी युरोपातील गटेनबर्गचे छपाईयंत्र ते ई-बुक आणि ई-मेलपर्यंतचा प्रवास डॉ. अरुण साधू यांनी सलग कथन केला.

कार्यक्रमाचे **प्रास्ताविक-संचालन अरुणा देशमुख** यांनी केले.

**गिरीजा कीर यांच्या ''सर्वोत्कृष्ट गिरिजा कीर'' - पुस्तकाचे प्रकाशन - दि. २३ जानेवारी, २०१०**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. २३ जानेवारी, २०१० रोजी गिरिजा कीर यांच्या ''सर्वोत्कृष्ट गिरिजा कीर'' या १०० व्या पुस्तकाचे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन शंकरनगर चौक, येथील स्व. श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृहात करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत प्रा. सुरेश द्वादशीवार होते. गिरीजाताईंनी प्रभावी कथन शैलीतून साध्यागोष्टी, साधी माणसे त्यांनी कादंबरीतून मांडली. पुरस्कारांनी लेखक मोठा होत नसून, वाचकांच्या चेहऱ्यावरील आनंदच लेखकांसाठी मोठा असतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

राज्ये जी चालतात ती, राज्ये चालविणाऱ्या माणसांपेक्षा राज्यशक्तीच्या बाहेर जी माणसे असतात त्यांच्या पुण्याईने चालतात. ती माणसे ज्या परंपरा आणि ज्या शक्ति निर्माण करतात त्याच्या साहाय्याने ती चालतात.

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
# कार्यवृत्त

**उत्तररात्र (दि. १ नोव्हेंबर, ०९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद यांच्या वतीने दि. १ नोव्हेंबर ०९ रोजी सृजन निर्मित कवी रॉय कीणीकर यांच्या कवितांवर आधारित उत्तररात्र सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी, सरस्वती भुवन महाविद्यालय येथे पार पडलेल्या या प्रसंगी मंचावर ज्येष्ठ साहित्यिक रा रं. बोराडे, स. भु. शिक्षणसंस्थेचे डॉ. अशोक भालेराव, नीलेश राऊत, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव यांची उपस्थिती होती.

सृजन ग्रुप, नागपूरच्या वैशाली उपाध्ये, श्याम धोंड या कलाकारांनी कवी रॉय किणीकरांच्या उत्तररात्र या दीर्घकाव्याचे सांगीतिक अभिवाचन सादर केले. एक कलंदर वृत्तीचे कवी म्हणून प्रसिद्ध असलेल्या रॉय किणीकर यांच्या काव्याला अभिवाचन तसेच संगीताच्या माध्यमातून रसिकांपर्यंत संक्रमित करण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात आला.

आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या या मैफिलीत श्याम धोंड यांचे अभिवाचन आणि वैशाली उपाध्ये यांचा सुरेल आवाज रसिकांवर प्रभाव पाडून गेला. अरविंद उपाध्ये यांनी बासरीवर आणि शैलेश दाणी यांनी सिंथेसायझरवर साथसंगत केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित विटोरे यांनी केले. आभार गणेश घुले यांनी मानले. कार्यक्रमास शहरातील साहित्यिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त मा. सुरेश खोपडे यांचे विशेष व्याख्यान (दि. २४ नोव्हेंबर, ०९)**

आदरणीय चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष पोलीस महानिरीक्षक मा. सुरेश खोपडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागात आयोजित या कार्यक्रमासाठी प्रा. जयदेव डोळे, नीलेश राऊत, सुधीर सेवेकर, बालाजी सूर्यवंशी, माधव सावरगावे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते आ. यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन करण्यात आले. मा. सुरेश खोपडे यांनी त्यांच्या मोहल्ला कमिटी प्रयोगासंदर्भात अनुभव कथन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस नीलेश राऊत यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गणेश घुले यांनी केले.

**देवगिरी कला महाविद्यालयात खगोलयात्रा कार्यक्रम (दि. २६ डिसेंबर ०९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद व अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे देवगिरी कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. २६ डिसेंबर ०९ रोजी खगोलयात्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संयोजक प्रा. संजय बनसोड, प्रा. डॉ. नितीन शिंदे, शंकर शेलार, प्रा. बी. के. भिल्लारे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटन नीलेश राऊत, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप जबदे यांची विचारमंचावर उपस्थिती होती. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य जबदे यांनी केले. यानंतर खगोलयात्रेचे संयोजक प्रा. संजय बनसोडे यांनी खगोलयात्रेपाठीमागची भूमिका उपस्थित मुलींसमोर मांडली. तसेच जागतिक खगोलशास्त्राचा इतिहास व त्याच्याशी जोडले गेलेल्या श्रध्दा, अंधश्रध्दा या संदर्भात प्रा. डॉ. नितीन शिंदे, शंकर शेलार, प्रा. बी. के. भिल्लारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**सरस्वती भुवन कला महाविद्यालयात खगोलयात्रा कार्यक्रम (दि. २६ डिसेंबर ०९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद व अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे सरस्वती भुवन कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. २६ डिसेंबर ०९ रोजी हा वैज्ञानिक कार्यक्रम संपन्न झाला. प्रसिद्ध शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या प्रेरणेने या खगोलयात्रेचे महिनाभरापासून महाराष्ट्रात भ्रमण सुरू आहे. युवांना अवकाशातील विविध ग्रह, ताऱ्यांच्या बाबतीत वैज्ञानिक माहिती व्हावी, या उद्देशाने खगोलयात्रा आयोजित केली जात आहे.

कार्यक्रमासाठी स. भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. अशोक भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी उपस्थित मुलामुलींना त्यांनी खगोलयात्रेसारख्या कार्यक्रमाचे आजच्या युगात किती महत्त्व आहे, हे सांगितले. यामुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना होण्यास निश्चितच मदत झाली.

**सरस्वती भुवन वाणिज्य महाविद्यालयात खगोलयात्रा कार्यक्रम (दि. २६ डिसेंबर ०९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद व अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे सरस्वती भुवन वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. २६ डिसेंबर ०९ रोजी हा वैज्ञानिक कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी स. भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. अशोक भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या तिन्ही कार्यक्रमांच्या ठिकाणी उपस्थित मुलामुलींना आयोजकांनी भारतीय संस्कृतीचे खगोलशास्त्राविषयी असणारे पूर्वग्रह दूर करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमासाठी विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष सचिन मुळे, देवगिरी महाविद्यालयाचे प्रा. काशिद सर, स. भु. संस्थेचे गाजरे, सुरडकर आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विभागीय केंद्राचे संघटक सुबोध जाधव, सहसंघटक अभिजित विटोरे, दीपक जाधव, उमेश राऊत यांनी प्रयत्न केले.

**आ. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावर आधारित वक्तृत्व स्पर्धा (दि. ५ फेब्रुवारी २०१०)**

शुक्रवार दि. ५ फेब्रुवारी २०१० रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र, औरंगाबाद व नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्यावर आधारित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. यशवंतराव चव्हाण यांच्या स्वप्नातला पुरोगामी महाराष्ट्र, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये आदरणीय यशवंतराव चव्हाण यांचे योगदान आणि यशवंतराव चव्हाण : एक साहित्यिक असे वक्तृत्व स्पर्धेचे तीन विषय होते. प्रथम पारितोषिक ३०००, द्वितीय पारितोषिक २०००, तृतीय पारितोषिक १००० व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५०० रु. असे पारितोषिकांचे स्वरूप होते. या वक्तृत्व स्पर्धेसाठी मराठवाड्यातून विविध महाविद्यालयांतील ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेमध्ये प्रथम व द्वितीय पारितोषिक विभागून देण्यात आले. सचिन जगताप (महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर) व प्रज्ञा मोरे (शिक्षणशास्त्र महाविद्यालय) यांनी प्रथम, कविता हिवराळे (शिवछत्रपती महाविद्यालय, औरंगाबाद) व मनीष बनकर (विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी द्वितीय व निकेश मधारे (देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. देवकुमार अहिरे व माधव सोमवंशी यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले.

पारितोषिक वितरण समारंभाला शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बलभीम गोरे, उपप्राचार्य अनिल आर्दड, पूर्णवादी बँकेचे संचालक सुहास तेंडुलकर, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक निलेश राऊत, स्पर्धेचे समन्वयक प्रा. महेश अचिंतलवार उपस्थित होते.

प्रा. बालाजी फड, श्रीकांत देशपांडे, सचिन तायडे यांनी परीक्षक म्हणून कार्य पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुबोध जाधव, अभिजित विटोरे, गणेश घुले, मंगेश निरंतर, डॉ. विशाल घोरपडे, दिपक जाधव, उमेश राऊत, जयंत लचुरे, मंगेश महामुने यांनी परीश्रम घेतले.

# विभागीय केंद्र, पुणे आणि कृषी व सहकार व्यासपीठ कार्यवृत्त

**कृषी व सहकार व्यासपीठ :**

कृषी व सहकार व्यासपीठाचे कार्यक्रम प्रतिष्ठानचे विश्वस्त मा.श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे आणि मा.श्री. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे यांच्या मार्गदशनाखाली चालतात. प्रतिष्ठानच्या सर्व कार्यक्रमांना पद्मविभूषण मा.मोहन धारियासाहेब यांचे प्रमुख मार्गदर्शन मिळते. दैनंदिन कामकाजात श्री. शं. त्रिं. भिडे व प्रा.प्र. त्र्यं. पंडित यांचा सहभाग असतो. निमंत्रक डॉ. भागवतराव पवार त्यांचे मार्गदर्शनाचा लाभ व्यासपीठाच्या कामकाजास उपलब्ध झाला आहे.

**क) कृषी विभाग :**

१) दिल्ली येथील सिटा (Centre for International Trade in Agriculture & Agro based Industries) या संस्थेच्यावतीने डॉ. भागवतराव पवार हे मराठी ''शरद कृषि'' या मासिकाचे संपादक म्हणून कामकाज पाहतात. व्यासपीठाचे निमंत्रक म्हणून त्यांनी वेळोवेळी प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयास भेट देऊन कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत चर्चा व मार्गदर्शन केले व कार्यक्रमात सहभाग घेतला.

२) ग्रामीण पतसंस्थांनी मिनी किसान बँकांप्रमाणे काम करावे असा प्रयोग कोल्हापूर जिल्हा म.स. बँकेने केला आहे. त्याबाबत कोल्हापूर विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. जुगळे तसेच सहकार विभागाशी मा. बापूसाहेब खैरे यांनी मागील पत्रव्यवहार पुढे चालू ठेवला आहे. महाराष्ट्राचे सहकारी कृषिपत संस्थांचे पुनरूज्जीवन कार्यक्रमामध्ये को. ऑपरेटिव्ह व्हिलेज बँक/मिनी किसान बँक योजनेवर भर देण्यात यावा यासाठी पाठपुरावा या कालावधीत चालू आहे.

३) जनरल मॅनेजर, ॲग्रिकल्चरल कं. ऑप इंडिया, नवी दिल्ली यांचेशी त्यांनी घेतलेल्या कल्पक उपक्रमांविषयी परिसंवाद घेणेविषयी पत्रव्यवहार सुरू केला आहे. (१७-११-०९) त्यांचेकडील उत्तर अपेक्षित आहे.

मा. बापू सा. खैरे यांनी त्यासंबंधी नाबार्ड अध्यक्षांनाही लिहिले आहे. (४-९-०९) याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

**ख) सहकार :**

१) व्यासपीठातर्फे तज्ज्ञांचे अभ्यासमंडळ सर्वसाधारणपणे दरमहा भरविण्यात येते. यांचे काम श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे यांच्या अध्यक्षतेखाली चालू आहे. त्यात आता मा. बी.डी. पवार यांचेही मार्गदर्शन मिळते. कार्यक्रमाचे आयोजन श्री. भिडे आणि प्रा. पंडित करतात. चर्चेत प्रा. रथसाहेब, श्री. कोरान्नेसाहेब, डॉ. कामत, प्रा. नाडकर्णी, डॉ. शाळीग्राम व इतर तज्ज्ञमंडळी सहभाग घेतात. काही निवडक चर्चासत्रात भारत सरकारचे निवृत्त सचिव डॉ. पद्माकर दुभाषीसाहेब सहभागी होऊन मार्गदर्शन करतात. त्यांना नुकतीच केंद्रशासनाचे वतीने पद्मभूषण उपाधी प्राप्त झाली आहे. त्या प्रित्यर्थ कृषि व्यासपीठातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यामध्ये केंद्रशासनाचे बहुराज्य सरकारी संस्था कायद्याप्रमाणे सहकाराची मूलतत्त्वे यांचा अंतर्भाव करण्याच्या प्रस्तावाबाबत वेगवेगळ्या स्तरावर व्यासपीठातर्फे पाठपुरावा चालू ठेवला आहे.

३) वैद्यनाथन समिती शिफारशीवर महाराष्ट्र शासनाने सहकारी संस्था अधिनियमातील केलेल्या सुधारणातील उणीवाबाबत श्री. भिडे यांनी तयार केलेल्या टिपणीवर मा. धारिया व श्री. खैरे यांच्या स्वाक्षरीने प्रस्ताव अनुक्रमे केंद्र व राज्य शासनास पाठविण्यास आले. त्याचा पाठपुरावा चालू ठेवला आहे. या संबंधाने मा. प्रधान सचिव, सहकार यांचेशीही पत्रव्यवहार चालू आहे.

४) मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने हाऊसिंग सोसायट्यासंबंधात क्रांतिकारक निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे समाजात दुफळी माजेल. हा निर्णय राज्याच्या निर्देशित धोरणाचे विरूद्ध आहे. या ज्वलंत विषयावर अभ्यास मंडळात सविस्तर चर्चा झाली आणि त्याप्रमाणे व्यासपीठामार्फत नाम.सहकारमंत्री,

मा. सहकार आयुक्त यांच्याशी जो पत्रव्यवहार केला आहे. याचा पाठपुरावा मा. सहकार आयुक्त व शासन अशा वेगवेगळ्या स्तरांवर करण्याचे या कालावधीत चालू ठेवले. आता आत्मनिर्भर सह. संस्था कायदा गृहनिर्माण संस्थांना लागू करणेबाबतचा प्रस्ताव मा. हर्षवर्धन पाटील मंत्री महोदय (सहकार) यांना सादर केला आहे. मा. बापूसाहेब खैरे विश्वस्त प्रतिष्ठान यांचे सहीने त्याचा पाठपुरावा चालू आहे. घरबांधणी संस्थांच्या उपविधींसंबंधी जे काम व्यासपीठाने केले आहे त्याची दखल शैक्षणिक क्षेत्रात घेतली असून पुणे येथील सहकारी प्रशिक्षण केंद्राने सदर उपविधीची प्रत हैद्राबाद येथील संस्थेस पाठविण्यासाठी मागणी केली. त्याची पूर्तता करणेत आली. (२२-९-०९)

५) श्री. भिडे आणि प्रा. पंडित सहकार विषयावर लेखनही करतात. या कालावधीत विदर्भ सहकारी मंडळाचे 'सहकारी विदर्भ' 'बळीराजा', 'सहकारी महाराष्ट्र' ही मासिके आदिमध्ये काही लेख प्रसिद्ध झाले आहेत.

६) 'सहकार भारती'च्या वतीने पतसंस्थांसाठी या कालावधीत जे अभ्यासवर्ग घेण्यात आले त्यात प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला.

७) सहकारी अधिनियमांविषयी शासनास जे विनंतीपत्र सादर करण्यात आले होते त्यासंबंधी त्यांचे कार्यालयातील अधिकाऱ्यांनी या कालावधीत व्यासपीठाशी संपर्क साधला आहे. त्यांनी सदर पत्र, प्रत पाठवली आहे. त्यावर प्रतिसाद अपेक्षित आहे.

८) सहकार अधिनियमात काही सुधारणा करण्याचे विधेयक लोकसभेत मांडण्यात येत असल्याचे वृत्तपत्रातून कळल्यामुळे त्यासंबंधी मा. मोहन धारिया यांच्या स्वाक्षरीने मा.ना. शरद पवार यांना तसेच मा. बापूसाहेब खैरे यांचे सहीने अन्य संबंधितांना लिहिण्यात आले असून सदर सुधारणांची प्रत मा. शिवाजीराव पाटील यांचेकडून प्राप्त झाली. त्यावर कार्यवाही सुरू आहे.

९) सदर कालावधीत मा. सहकार आयुक्त यांचे कार्यालयातील अतिरिक्त निबंधक यांनी श्री. भिडे व प्रा. पंडित यांचेशी वेळोवेळी सहकारी संस्थांसंबंधी व महत्त्वाच्या पत्रांतील सूचनांवर चर्चा केली.

१०) शेतकरी आत्महत्यासंबंधी श्रीमती इंगोले यांच्या पुस्तकासंबंधी एक साहित्यिक चर्चा घेण्याचे मा.श्री. बापूसाहेब खैरे यांनी सुचविल्यानुसार लेखिकेशी श्री. भिडे यांनी संपर्क साधला. तसेच श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष श्री. वि. भा. देशपांडे यांचेशी चर्चा केली व त्यांनी सुचविल्यानुसार साहित्य परिषदेला मा. बापूसाहेब खैरे यांचे सहीने प्रस्ताव पाठवला. त्यानुसार सहकारी तज्ज्ञ आणि साहित्यिक अशी एकत्रित चर्चासत्राची रचना झाली. पद्मविभूषण धारियाजी उपस्थित होते. तसेच प्रमुखपदी पद्मभूषण डॉ. दुभाषी होते. त्या कार्यक्रमास वृत्तपत्रांनी विशेष प्रसिद्धी दिली. प्रास्ताविक डॉ. भागवत पवार यांनी केले. प्रा. पंडित यांनी आभार प्रदर्शन केले.

११) सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी, महाराष्ट्र आत्मनिर्भर सहकारी संस्था अधिनियम तयार करण्यासाठी मा. सहकार आयुक्त यांनी एक समिती गठित केली असून त्यावर मा. बापूसाहेब खैरे यांची नियुक्ती केली आहे. सदर समितीचे कार्य यापुढे होईल असे वाटते.

१२) नागरी व ग्रामीण पतसंस्थांचे नियमनासाठी महाराष्ट्र सहकारी अधिनियमातील प्रकरण X-B व कलम ११० ब अन्वये सुधारणा प्रस्तावित आहेत. त्या प्रारूप विधेयकावर एक महत्त्वाचे चर्चासत्र व्यासपीठात आयोजित करणेत आले. (दि. २५ सप्टेंबर ०९) त्यात २० सहकारतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. प्रत्यक्ष १९ व्यक्ती सहभागी झाल्या. मा. बापूसाहेब खैरे अध्यक्षस्थानी होते. तसेच राज्य पतसंस्था फेडरेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते. याबाबत प्रबोधन होणेचे दृष्टीने भारतीय कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीळकंठ रथ यांचे 'पार्श्वभूमीः शासनप्रणीत सहकाराची' या विषयावरील साधना साप्ताहिकांतील तीन लेखांचा संदर्भ लक्षात घेण्यात आला. तसेच उच्चाधिकार समितीचे प्रमुख मा. शिवाजीराव पाटील यांचेशीही संपर्क साधण्यात आला. याबाबत मा. सहकार आयुक्त यांनाही मा. बापूसाहेब खैरे यांचे स्वाक्षरीने लिहिण्यात आले. (दि. ३०-९-०९) त्यात मा. भागवत पवार यांच्या व इतरांच्या लेखी निवेदनांचाही विचार करण्यात आला.

१३) सहकारविषयक भारतीय राज्यघटनेत काही नवीन तरतूद करणेबाबत केंद्राकडून विधेयक आणले जात असल्याबद्दल समजल्यावरून मा. पद्मविभूषण धारियांच्या स्वाक्षरीने मा.ना. कृषि सहकार मंत्री शरदराव पवार यांना त्याची प्रत पाठविणेस विनंती करणेत आली. तसेच मा. उच्चाधिकार समिती प्रमुख श्री. शिवाजीराव पाटील यांचेशीही संपर्क साधला. तसेच मा. भागवत पवार यांनी सदर प्रत मिळवली. त्यावर दि. १९-१२-२००९ रोजी चर्चासत्र आयोजित केले. त्याचे अध्यक्षस्थान मा. मोहन धारिया यांनी स्वीकारले.

१४) भारतीय सहकारिता अध्ययन संस्था (Indian Socy. for Studies in Co-op. I.S.S.C.) चे २६ वे अधिवेशन पुणे येथे दि. २८ व २९ जाने. २०१० रोजी भरविण्यात आले. त्यात प्रतिष्ठानच्या कृषी सहकार व्यासपीठाच्या वतीने श्री. शं. त्रि. भिडे व प्रा. प्र. त्र्यं. पंडित यांनी प्रतिनिधीत्व केले व सर्वकष मते मांडली. प्रा. पंडित यांनी दोन्ही विषयांवर शोधनिबंध वाचले. त्यांचे स्वागत झाले. त्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतही सर्वश्री भिडे व प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला. (२८-१-१०) तसेच श्री. भिडे यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये सहकाराचे पुनरूज्जीवन या विषयावर युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशनचे साहाय्याने अर्थशास्त्र विभागातर्फे जो परिसंवाद आयोजित केला त्यामध्ये आमंत्रणानुसार भाग घेऊन आपला प्रबंध सादर केला.

१५) व्यासपीठाने सहकारी लेखा परीक्षणातील भ्रष्टाचारास आळा घालणेच्या हेतूने ज्या सूचनांचा उल्लेख करून रिझर्व्ह बँकेच्या उपराज्यपाल (Dy. Governer) यांनी पूर्वी लिहिले होते, त्याची दखल घेऊन त्याबाबत रिझर्व्ह बँकेने नाबार्डला लिहिल्याचे दि. १५ डिसें. २००९ रोजी कळवले आहे. सदर बाबतीत पुढील पाठपुरावा नाबार्डकडे करणेत येईल.

**व्यासपीठाच्या वतीने अन्य विषयांसंबंधी उपक्रम व कार्यक्रम**

१) निवडणूक सुधारणा - या व्यापक महत्त्वाच्या विषयावर व्यासपीठाच्या वतीने एक परिसंवाद दि. १० नोव्हेंबर २००९ रोजी आयोजित करण्यात आला. त्यात व्यक्त झालेल्या विचारांच्या अनुरोधाने १८ वेगवेगळ्या उपयुक्त सूचना संकलित करून भारताच्या महामहिम राष्ट्रपतींकडे सादर करण्यात आल्या.

२) 'राजकारणात नैतिक मूल्यांची पुन प्रतिष्ठापना' या महत्त्वाच्या विषयावर सहकारतज्ज्ञ प्रा. नाडकर्णी यांच्या लेखावर एक परिसंवाद दि. १०-११-०९ रोजी योजण्यात आला. त्यास उपस्थितांनी पाठिंबादर्शक मतप्रदर्शक केले. मा. आप्पासाहेब भुजबळ अध्यक्षस्थानी होते. मा. पद्मविभूषण मोहन धारियांनी मार्गदर्शन केले.

**ग) माहितीचा अधिकार :**

१) 'माहितीचा अधिकार' कायदा मंजूर झाल्यानंतर त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने डॉ. जोशी, मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र शासन यांचेशी झालेल्या चर्चेचे अनुषंगाने प्रतिष्ठानचे वतीने श्री. भिडे यांनी 'माहितीचा अधिकार कायदा' यावर एक पुस्तिका मा. बापूसाहेब खैरे यांनी 'विशाल सह्याद्री' ट्रस्टचे वतीने प्रसिद्ध केली असून वेळोवेळी या विषयावर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये त्याचे वितरण केले जाते.

२) यशवंतराव चव्हाण ॲकेडमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशनचे (यशदाचे) माहितीविषयक सल्लागार श्री. प्रमोद माने, माजी आयुक्त अमरावती विभाग यांचे सुचनेवरून श्री. शं. त्रि. भिडे संयोजक कृषि सहकार व्यासपीठ यांनी एक ९० पानी पुस्तक 'माहितीचा अधिकार व सहकारी संस्था'' या विषयावर तयार करून शासनाच्या 'यशदा' या संस्थेस सादर केले आहे. त्या पुस्तकाचे छापील प्रारूप प्रा. मानेसाहेब यांनी सहकार खात्याचे प्रधान सचिव डॉ. सुधीरकुमार गोयल यांचेकडे मान्यतेसाठी सादर केले. त्यावर शासनाचा अनुकूल प्रतिसाद आला आहे. आता या विषयावर एका अपिलांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल आला असून त्यानुसार पुस्तकामध्ये दुरूस्ती करून यशदाचे मा.माने यांचे सूचनेनुसार दुरूस्त प्रत यशदाचे श्री. सुनिल पाटील यांना देण्यात आली आहे. त्याशिवाय नंतर आलेल्या सहकारी साखर कारखाना, अपिलांतील उच्च न्यायालयाचे निकालानुरूप सदर पुस्तकात दुरूस्तीचे काम चालू आहे.

३) प्रतिष्ठानच्या माहिती कक्षामध्ये वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शनासाठी आलेल्या व्यक्तींना प्रा. पंडित व श्री. भिडे यांचेकडून माहिती अधिकार कायद्याबाबत मार्गदर्शन केले जाते व पुस्तिकांचे वितरण केले जाते. तसे विशेष मार्गदर्शन या कालावधीत करणेत आले व पुस्तिका वितरित करण्यात आल्या.

४) सजग नागरिक मंच या माहिती अधिकारावर काम करणाऱ्या संस्थेच्या मासिक सभात प्रा. पंडित यांनी या कालावधीत सहभाग घेतला व प्रतिष्ठानच्या माहिती अधिकार कक्षाच्या कामकाजाची माहिती दिली. (दि. १-९-०९ इ.) या संस्थेच्या वतीने याविषयी कार्य करणाऱ्या कार्यकर्ता व संस्थेचा गौरव करण्यात येतो. त्या कार्यक्रमात यासंबंधी विशेष कार्य करणाऱ्या ११ कार्यकर्त्यांचा नामोल्लेख करणेत आला. त्यात प्रा. प्रभाकर पंडित यांचे नाव ५ व्या क्रमांकावर घोषित झाले. राष्ट्रीय (माहिती) सूचना अधिकार अधिनियम पुरस्कार यासंबंधी एका विशेष चर्चासत्राचे आयोजन दि. ९ ऑक्टोबर ०९ रोजी करण्यात आले. त्यात महत्त्वाच्या मुद्यांवर उहापोह करणेत आला.

**घ) महिला व्यासपीठ :**

१) काळाच्या गतिमान ओघामध्ये बदलणाऱ्या समाजव्यवस्थेमुळे स्त्रियांवरचा मानसिक, शारीरिक ताण वाढत चालला आहे. यासाठी अनेक महिला व महिला संस्था यांच्या सहकार्याने कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून हा ताण कमी करण्यासाठी, स्वबळावर स्त्रियांनी समर्थ होण्यासाठी पुणे केंद्राच्या महिला व्यासपीठाच्या प्रमुख मा. शैला लिमये अध्यक्ष म्हणून प्रयत्न करीत असतात. त्यात डॉ. शेवाळे यांची त्यांना मदत होत असते. तसेच मा. बापूसाहेब खैरे यांचे मार्गदर्शनाचा लाभ होतो आणि प्रा. पंडित यांचा सहभाग असतो.

२) विभागीय केंद्र, पुणे महिला व्यासपीठ व 'माझी मैत्रीण चॅरिटेबल ट्रस्ट' च्या वतीने पोळ्या, पुरणपोळ्या, ठेपले यांचे प्रशिक्षण तसेच मार्केटिंग, ब्रँडींग यावर श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी जे मार्गदर्शन केले याचा तसेच नवीन गट विकसित करण्यास व त्यांना 'स्पेन्सर' या मॉलमध्ये तयार माल विक्रीची संधी देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले. त्याचा उपयोग झाला आहे.

३) एक कवीसंमेलन आयोजित करण्यात आले. त्याचे डॉ. अस्मिता शेवाळे यांनी संयोजन केले. तसेच डॉ. शेवाळे यांनी पुणे अंधशाळेमध्ये, प्रतिष्ठानतर्फे एक वैद्यकीय शिबीर आयोजित केले. त्यासाठी रंगूनवाला वैद्यकीय महाविद्यालय याचा सहभाग होता.

४) ॲग्रिकल्चर कॉलेजमधील M.B.A.च्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून महिला उद्योजकांची बचत गटाच्या माध्यमातून विकास या विषयावर चर्चासत्रात श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित सहभागी झाले.

५) अहवाल कालावधीत श्रीमती लिमये यांनी हुतात्मा राजगुरू शाळेत ९ वी, १० वी साठी इंग्रजी बोलण्यासंबंधी (Spoken English) शिबीर २ महिने आयोजित केले. तसेच कौशल्यासाठी प्रागतिक (Advanced) शिबीर याच हुतात्मा राजगुरू शाळेत संचलित करण्याचे योजले आहे. उपक्रमास विद्यार्थी वर्ग, शिक्षक वृंद व मुख्याध्यापिका यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. याबाबत पुढील पाठपुरावा करणेसाठी श्रीमती शैला लिमये व प्रा. पंडित यांनी शाळेस भेट देऊन चर्चा केली.

**ङ) नवमहाराष्ट्र युवा अभियान :**

१) मा. खा. सुप्रिया सुळे यांचे हस्ते 'कै. यशवंतराव चव्हाण यांचा वारसा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यास उपस्थितांचा विशेषतः युवक विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद होता. त्यात डॉ. अस्मिता शेवाळे व श्री. पंडित उपस्थित होते.

२) श्री. दत्ता बाळ सराफ यांच्या सूचनेनुसार युवा अभियान कार्यकर्ते कार्यालयात येऊन प्रा. पंडित यांचे मार्गदर्शन घेतात.

**च) प्रतिष्ठानचे विभागीय केंद्र, पुणे :-**

१) या केंद्राचे काम विश्वस्त श्री. ज्ञानेश्वर बापू खैरे आणि मा. अंकुश काकडे, माजी महापौर, पुणे आणि माजी महापौर मा. शांतिलाल सुरतवाला हे पाहतात. सर्वश्री भिडे व प्रा. पंडित हे सहभाग घेतात. डॉ. राम ताकवले केंद्राचे अध्यक्ष रूजू झाल्यापासून त्यांचे मार्गदर्शन घेतले जाते.

२) प्रतिष्ठानच्या पुणे केंद्राच्या बैठकीत मा. बापूसाहेब खैरे यांचे सूचनांनुसार आपण 'सकाळ बालमित्र प्रबोधिनी' यांचे प्रति सहकार्य चालू ठेवले आहे.

३) श्री. भिडे यांनी विद्यार्थ्यांसाठी सरस्वती मंदिर शाळा व गायधनी कॉलेज यामध्ये भिडे प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने अक्षर सुधारणा योजना चालू केली आहे. त्यात प्रतिष्ठानकडे भारती

विद्यापीठाचे समाजविकास केंद्राचे जे विद्यार्थी मार्गदर्शनार्थ येतात त्यांचा या योजनेच्या मुल्यांकनासाठी सहभाग घेतला आहे.

४) भारती विद्यापीठाचे सोशल सायन्स सेंटरचे दोन विद्यार्थी, पुणे विभागीय कार्यालयास, संलग्न करणेत आले आहेत. श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणेचे काम याकाळात चालू ठेवले आहे. या विद्यार्थ्यांच्या शिबिरात श्री. पंडित यांचे व्याख्यान झाले.

५) मुख्यालयाकडून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेसंबंधी लिहून आले आहे. त्यानुसार भारती विद्यापीठास लिहिले आहे. (३-२-१०)

६) पं. नेहरू जयंती (बालदिन) दि. १२ नोव्हें. ०९ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे पर्वती चढणे, उतरणे स्पर्धा ५० चे वरील वयाच्या वृद्धयुवांसाठी ५० ते ६०, ६१ ते ७० व ७० चे वर अशा तीन गटात घेण्यात आली. त्यात श्री. पुरूषोत्तम दगडू वाणी हे सर्वप्रथम आले. त्यांनी नियोजित वेळेत १८ फेऱ्या केल्या. या स्पर्धेचे आयोजन केंद्राचे कोषाध्यक्ष मा.श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी व सचिव मा. श्री. अंकुश काकडे यांनी केले. त्याचा बक्षीस समारंभ दि. २२ डिसेंबर रोजी करण्यात आला. स्पर्धेचे उद्घाटन मा.खा. गोविंदराव आदिक यांचे शुभहस्ते झाले. पुरुष व महिला बहुसंख्येने स्पर्धेत सामील झाल्या. पारितोषिक वितरण मा.श्री. भाई वैद्य यांचे हस्ते झाले. मा.श्री. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे अध्यक्षस्थानी होते. मा.श्री. बापूसाहेब खैरे मंचावर उपस्थित होते. तसेच सर्वश्री भिडे व प्रा. पंडित आणि डॉ. अस्मिता शेवाळे कार्यक्रमास उपस्थित होते.

७) प्रतिवर्षाप्रमाणे नाट्य, सुरांच्या गंधाने दिवाळी पहाट साजरी करण्यात आली. पुणे केंद्राच्या वतीने देण्यात येणारा दिवाळी पहाट पुरस्कार ज्येष्ठ व्यंगचित्रकार मा. मंगेश तेंडूलकर यांना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत प्रदान करणेत आला. सारी सारसबाग कार्यक्रमास गोळा झाली होती. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्तम संयोजन मा. शांतीलाल सुरतवाला व मा. अंकुश काकडे यांच्या नेतृत्वाखाली करणेत आले होते. मा.शं. त्रि. भिडे व प्रा. प्रभाकर पंडित आणि डॉ. अस्मिता शेवाळे कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमात आचार्य आनंदऋषीजी रक्तपेढीच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करणेत आले होते. ही. विशेष बाब आहे. यात ५६ जणांनी रक्तदान केले.

**अन्य संस्थांशी सहकार्य व संयुक्त कार्यक्रम**

१) प्रसार माध्यमविषयक परिषद

पुणे येथील प्रबोधन मंच या संस्थेने वरील परिषदेस प्रतिष्ठानचे व्यासपीठास निमंत्रित केले होते. त्यांना निवडणूक सुधारणांबाबतच्या व्यासपीठाच्या मा. निवडणूक आयुक्तांना लिहिलेल्या पत्राची प्रत पाठवली व प्रसार माध्यमांनी या विषयात लक्ष घालावे अशी सूचना केली. सर्वश्री भिडे व प्रा. पंडित परिषदेस उपस्थित राहिले. (२८ व २९-११-०९)

२) मा.मोहन धारिया यांच्या मार्गदर्शनाने 'वनराई' बरोबर व्यासपीठाचे सहकार्य याही कालावधीत चालू राहिले. दि. १६ जाने. १० रोजी वनराई पर्यावरण मंडळाचे वतीने पर्यावरण जागृती मेळावा घेण्यात आला. त्यास श्री. भिडे व प्रा. पंडित उपस्थित राहिले.

जनतेला सांगितले पाहिजे की,तू राजा आहेस. अविकसित, दुष्काळी अशा कडेकपारीच्या बनलेल्या सह्याद्रीचा तू राजा आहेस. दुःखात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे हे राजाचे कार्य प्रत्येक मराठी माणसाने केले पाहिजे. एकेक माणूस, एकेक लहान मूल हे सावली देणारे झाड आहे असे मानून खतपाणी घातले पाहिजे.

# *विभागीय केंद्र, कराड*
# *कार्यवृत्त*

**१) ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाचा १००% निकाल :**

शिवाजी विद्यापीठ प्रौढ निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या **ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रमात** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र-कराडचा निकाल १००% लागला असून या केंद्रात...

१) सौ. सुषमा कोळेकर
प्रथम क्रमांक ७५.७१%

२) कु. तृप्ती बाळकृष्ण पालेकर
द्वितीय क्रमाक ७३.७१%

३) कु. मेघना अशोक फाटक
तृतीय क्रमांक ७२.२८%

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे **मा. आ. श्री. बाळासाहेब पाटील, मा. श्री. विलासराव पाटील बापू (वाठारकर), मा. श्री. प्रकाशबाबू पाटील, सचिव श्री. मोहनराव डकरे** यांनी आभार मानले.

**२) स्व. पी. डी. पाटील साहेब स्मृति दिन दि. १७/९/२००९:**

**कराड** - आधुनिक कराडचे शिल्पकार आणि कराड उत्तर विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते **कै. पी.डी.पाटील** साहेब यांच्या प्रथम स्मृतिदिनी स्थानिक कलावंताचां **''अवघा रंग एक झाला''**या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. **सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र-कराड आणि ललित कला भारती** यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमात शंभर गायक वादक कलावंताचा सहभाग होता.

कार्यक्रमाचा प्रारंभ ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त **आ. बाळासाहेब** पाटील यांनी केलेल्या दिपप्रज्वलनाने झाला. त्यानंतर गणेश वंदना आणि कोळीनृत्य तसेच वासुदेवाच्या वेश्यात **वासुदेव** सादर करण्यात आला.

**स्व. पी. डी. पाटील साहेब** यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना कार्यक्रमाचे संयोजक **मोहन कुलकर्णी** म्हणाले पी. डी. पाटील यांचे अवघे जीवन ही एक असामान्य जिद्द आमि डोळस परिश्रम यांची गाथा आहे. अभ्यास, चिकित्सा, गुणग्राहकता आणि स्वयंसिध्द निर्णय अशा गुणांनी सत्तेवरील मांड पक्की करताना सभ्यता आणि सुजनता त्यांनी कधी सोडली नाही. आजच्या कराडला जे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व मिळाले आहे.त्याचे शिल्पकार पी.डी. पाटील हेच आहेत. कराड एवढे क्षेत्रफळ, महसूल आणि लोकसंख्या यांचा विचार करुन देशभरातील कराड सारखी गावे निवडली. तर नागरी विकासाच्या बाबतीत कराड देशात एक नंबर वर कायम राहिल असा सर्वांगीण नागरी विकास त्यांनी केला आहे.

यानंतर झालेल्या कार्यक्रमातताललक्षण गीत, चतरंग, त्रिवट, यमन रागातील गत, उपशास्त्रीय संगीतातील गझल, नाट्यगीत, सुगम संगीतातील भावगीत, बालगीत, द्वंदगीत, प्रार्थना, कव्वाली आणि लावणी, लोकसंगीतातील गवळण, अभंग, भारुड आणि जोगवा असे विविध गायन प्रकार स्थानिक कलावंतांनी मोठ्या नजाकतीने सादर केला. **''अवघा रंग एक झाला''** या लोकप्रिय भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

**३) पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन - स्मृतिदिन २७ सप्टेंबर २००९ :**

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा ३७वा स्मृति दिन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र कराड व सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयात संपन्न झाला. जेष्ठ ग्रंथपाल **मा. बाळकृष्ण पालेकर** यांनी रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच या प्रसंगी सौ. वेणुताई चव्हाण व स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करुन एस. आर. रंगनाथन यांना आदरांजली अर्पण केली. याप्रसंगी ट्रस्ट व प्रतिष्ठानचे सर्व सेवक व सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील वाचक उपस्थित होते.

**४) महात्मा गांधी जयंती - २ ऑक्टोबर २००९ :**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या १४०व्या जयंतीचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र-कराड व सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या वतीने त्यांच्या संदेशाचे प्रदर्शन सौ. वेणुताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले.

यावेळी जेष्ठ ग्रंथपाल मा. बाळकृष्ण पालेकर यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केले व राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्व. यशवंतरावजी चव्हाण, स्व. सौ. वेणुताई चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. या प्रसंगी उपसचिव **श्री. अनिल पाटील, श्री. योगेश मुळे** तसेच ट्रस्ट व प्रतिष्ठानचे सर्व सेवक उपस्थि होते. तसेच दिनांक २४ ऑगस्ट २००९ रोजी. स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या संग्रहातील महात्मा गांधीजींच्या विषयी सर्व पुस्तकांचे, छायाचित्रांचे व गांधीजींच्या संदेश वचनाचे प्रदर्शन सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयात संपन्न झाले.

**५) देशनेते स्व. यशवंतरावजी चव्हाण २५वे पुण्यस्मरण दि. २५ नोव्हेंबर २००९**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री **स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबाच्या** २५व्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील विविध मान्यवरांनी स्व. चव्हाण साहेबांना कृष्णा कोयनेच्या पवित्र संगमावर व सौ. वेणुताई चव्हाण स्मृती मंदिरात उपस्थित राहून आदरांजली समर्पीत केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण, मा. ना. हर्षवर्धन पाटील, मा. आ. बाळासाहेब पाटील, माय कल्लाप्पाण्णा आवाडे, मा. प्रकाश आवाडे, मा. श्रीनिवास पाटील, मा. विलासराव पाटील वाठारकर, मा. आ. विलासराव पाटील उंडाळकर, मा. आ. विक्रमसिंह पाटणकर, मा. जयकुमार गोरे, मा. सुनिल पवार, मा. अशोकराव चव्हाण, मा. खा. उदयनराजे भोसले इत्यादी विविध मान्यवरांनी स्व. चव्हाण साहेबांच्या समाधीस व सौ. वेणुताई चव्हाण स्मृती मंदीरात स्व. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून आदरांजली अर्पण केली.

**६) स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या प्रतिमेची मिरवणूक पदयात्रा :**

भारताचे थोर सुपूत्र **स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब** यांच्या २५व्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने बुधवार दि. २५ नोव्हेंबर २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्व. चव्हाण साहेबांच्या भव्य प्रतिमेची मिरवणूक कराड शहरातून काढण्यात आली. पदयात्रा सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट - विरंगुळा बंगला मार्गे - स्मृतिसदन - टिळक हायस्कूल - चावडी चौक - समाधी स्थळ. समाधी स्थळी प्रत्येकाने समाधीचे दर्शन घेऊन त्याच आवारात आदरांजली सभा आयोजीत केली.

प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष **मा. आ. बाळासाहेब पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, मा. विलास पाटील वाठारकर, मा. अशोकराव गणपतराव चव्हाण, मा. सुनिल पवार, मा. प्रकाश बापू पाटील** तसेच स्व. चव्हाण साहेबांच्यावर प्रेम करणारे कराड मधील विविध मान्यवर, कराड मधील अनेक प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक महाविद्यालयां मधील शिक्षक, प्राद्यापक, शासकीय सेवक, डॉक्टर्स, वकील, व्यापारी, सहकारी संस्थाचे प्रतिनिधी, शेतकरी, सामाजिक क्षेत्रातील विविध कार्यकर्ते मोठ्या उत्स्फुर्त भावनेने पदयात्रा व आदरांजली कार्यक्रमात सहभागी झाले होते. पदयात्रेमध्ये स्व. चव्हाण साहेबांच्या विचारांचे वाचन होत होते.

समाधी स्थळी समाधीचे दर्शन घेतल्यानंतर आदरांजलीचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपस्थित असलेल्या मान्यवरांनी त्यांना साहेबांचे आलेले अनुभव, आठवणी, साहेबांचे विचार श्रोत्यांना सांगितले.

**७) २६/११ चा पहिला स्मृतिदिन व मानवी साखळी कार्यक्रमाचे आयोजन**

**विशाल मानवी साखळीचे आयोजन - दि. २६ नोव्हेंबर २००९**

दिनांक २६ नोव्हेंबर २००८ रोजी पाकिस्तानातून १० दहशतवाद्यांनी मुंबईवर हल्ला केला आणि सर्व मुंबई हादरून गेली. या दहशतवादी घटनेला १ वर्ष पूर्ण झाले. या हल्यात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ **जो शहीद हुवे है उनकी जरा याद करो**

**कुर्बानी** या गीताच्या ओळीप्रमाणे सारा देश २६/११ ला वर्ष होताना पुन्हा एकत्र येत आहे आणि दहशतवाद्यांच्या विरोधातील लढ्यात आपली वज्रमूठ अभेद्य असल्याचे दाखवून देणेकरीता, देशातील सर्व धर्मिय, सर्व प्रांतीय, सर्व भाषीय भारतीय अखेर एक आहोत हा शांतीचा व अहिंसेचा संदेश अखिल मानवजातीला मिळावा. या उद्देशाने मानवी साखळीचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, केंद्र - कराडच्या वतीने करण्यात आले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी - शांततेचा संदेश व छत्रपती शिवाजी महाराज शौर्याचे प्रतीक या निमित्ताने **कराड - गांधी पुतळा** ते **कोल्हापुर - विद्यापीठ परिसर शिवाजी महाराजांचा पुतळा या ७५ कि.मी.** अंतरावर मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले.

दहशतवाद विरोधातील तीव्र भावना, राष्ट्रीय ऐक्य, शांततेचा व शौर्याचा संदेश देणाऱ्या मानवी साखळी कार्यक्रमाचे उद्‌घाटन सौ. वेणुताई चव्हाण ट्रस्टचे विश्वस्त मा. अशोकरावजी चव्हाण, मा. वैभव विलासराव शिंदे, उपसभापती इस्लामपूर, पंचायत समिति मा. अनिल पाटील सचिव कर्मवीर शिक्षण संस्था कामेरी श्री. मोहनराव डकरे सचिव यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, केंद्र-कराड, विविध संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन शहीद हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली.

कराड ते कोल्हापूर या ७५ कि.मी. अंतराच्या प्रवासात मानवी साखळी संदेश यात्रेस कामेरी या ठिकाणी **मा. ना. जयंत पाटील** ग्रामविकास मंत्री व **मा. आ. मानसिंगराव नाईक** यांनी अभिवादन केले व कोल्हापूर या ठिकाणी शांती ऐक्याच्या यात्रेचा समारोप झाला.

राष्ट्रीय महामार्गालगतच्या विविध शाळाचे विद्यार्थी, शिक्षक तसेच सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर, महिला, पुरूष, तरूण वर्ग विशाल मानवी साखळी संदेश यात्रेस सहभागी होऊन २६ नोव्हेंबरच्या हुतात्म्यास आदरांजली वाहिली व पहिला स्मृति दिन साजरा केला.

### ८) २६ जानेवारी २०१० प्रजासत्ताक दिन :

२६ जानेवारी २०१० राष्ट्राचा ६१ वा प्रजासत्ताक दिन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र-कराड आणि सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या कार्यालयात संपन्न झाला. शिवाजी हायस्कूलच्या बॅंड पथकाने मानवंदना दिली. श्री. मोहनराव कृष्णाजी डकरे यांनी दोन्ही ठिकाणी ध्वजारोहण केले. यावेळी शिवाजी हायस्कूल मधील शिक्षक, विद्यार्थी, कराड शहरातील प्रतिष्ठीत नागरीक प्रतिष्ठान व ट्रस्टचे सर्व सेवक यावेळी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शालेय विद्यार्थ्यांना खावू वाटप करण्यात आले.

### ९) राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी - ३० जानेवारी २०१०

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची ६२ वी पुण्यतिथी यशवंत विचारांनी पुनित झालेल्या व सौ वेणुताईच्या स्मृतीनी सुंगधित झालेल्या सौ वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या कार्यालयात संपन्न झाली जगाला अहिंसेचा संदेश देणारे भारतीय स्वतंत्र्य चळवळीचे प्रणेते महामानव राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र - कराड आणि सौ वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या वतीने भावपूर्ण आदरांजली वाहिली. राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पांजली अर्पण केली. यावेळी ग्रंथालयातील वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी ११ वाजता एक मिनिट स्तब्ध उभे राहून सर्वांनी श्रध्दांजली अर्पण केली.

### १०) स्व. सौ. वेणुताई चव्हाण जयंती - २ फेब्रुवारी २०१० :

स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब यांची पत्नी सौ. वेणुताई यशवंतराव चव्हाण यांची ९०वी जयंती सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या कार्यालयात संपन्न झाली याप्रसंगी सौ. वेणुताईच्या प्रतिमेचे पुजन **श्री. मोहनराव कृ. डकरे** यांनी केले. स्व. चव्हाण व सौ. वेणुताईच्या प्रतिमेस **श्री. योगेश मुळे** यांनी पुष्पहार अर्पण केले या प्रसंगी सौ. वेणुताई चव्हाण संशोधन ग्रंथालयातील वाचक, जेष्ठ ग्रंथपाल पालेकर बी. आर., श्री. अमित गीरी, प्रा. हणमंत कराळे, श्री. मोहनराव मुळे इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. सौ. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र - कराडचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# विभागीय केंद्र नाशिक
# कार्यवृत्त

**लेखिका मोनिका गजेंद्र गडकर यांची मुलाखत**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र, नाशिकतर्फे दि. २६ सप्टेंबर २००९ रोजी सायंकाळी ६ वाजता सुप्रसिध्द लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांची प्रकट मुलाखत कार्यक्रम संपन्न झाला.

वडील विद्याधर पुंडलिक यांनी दिलेला लेखन वाचनाचा संपन्न वारसा आणि भवतालच्या पर्यावरणात घडणाऱ्या घटनांनी सांगड घालून स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न आपण लेखनातून करीत आलो आहोत, असे प्रतिपादन लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांनी केले. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर मत व्यक्त केले. डॉ. वृंदा भार्गवे यांनी मुलाखत घेतली.

**ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा**

**गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २००९**

कुटुंब व्यवस्था धोक्यात येण्याचे प्रमुख कारण म्हणजे ज्येष्ठांची होणारी उपेक्षा हे आहे. आजच्या युवकांनी ज्येष्ठांकडून कामाची निष्ठा, 'उर्जा' व विचारांचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, नाशिक आणि लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांच्या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. गव्हाणे बोलत होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक करतांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विश्वस्त अश्विनी बोरस्ते म्हणाल्या की, प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. ह्या उपक्रमांना गती येण्यासाठी विभागवार मेळाव्याची सुरुवात केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनविषयक विचारांचा परामर्ष घेतला व त्यांचे काही विचार उद्धृत केले.

लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचचे अध्यक्ष रमेश देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिक मेळावा आयोजनमागची भूमिका सांगितली व विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांमधील ज्येष्ठ नागरिकांचे योगदान किती मोलाचे आहे हे विषद केले. त्याचबरोबर ज्येष्ठांसाठी काम करीत असलेल्या विविध संस्था, त्यांचे कामाचे स्वरूप, विभागावर संस्था याविषयीची माहिती दिली. आजच्या बदलत्या गतीमान जीवनशैलीत ज्येष्ठांच्या विचारांची जपवणूक करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला. त्यात सौ. इंदिराबाई दगाजीराव पाटील, श्रीमती संध्या माधव वैद्य, सौ. वसुधा विद्याधर पाध्ये, श्रीमती सुनिता मोरेश्वर गायधनी, श्री. बापूराव धर्मा भामरे, प्राचार्य चंद्रकांत विनायक तळवेलकर, श्री. पुंडलिक लक्ष्मण घरटे, श्री. अनंत सिताराम साळी, श्री. रमेश बाळाजी जाधव, प्राचार्य राम क्षीरसागर, श्री. शरद पुरूषोत्तम बुरकुले यांचा समावेश होता. या सन्मान सोहळ्याचे सन्मार्थींच्या परिचयाचे वाचन ओघवत्या शैलीत कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

सत्कारार्थींच्या वतीने सुनिता गायधनी व प्राचार्य राम क्षीरसागर यांनी मनोगत व्यक्त केले.

सुनिता गायधनी म्हणाल्या की, माझ्या सामाजिक कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठानने माझा सत्कार केला हे माझ्या पुढील वाटचालीसाठी बळ व प्रेरणा देणारे आहे.

प्राचार्य राम क्षीरसागर म्हणाले की, शिक्षण क्षेत्रातील नवी पिढी घडविण्यासाठी केलेल्या मेहनतीचे फळ म्हणजे हा सत्कार

असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळेस त्यांनी शिक्षण क्षेत्रातल्या बाजारीकरणावरही आपले विचार व्यक्त केले.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा आयोजनामागची भूमिका विषद केली. समाज व्यवस्थेत मूल्यांची होत असलेली हानी, माणसा-माणसात पडत चाललेले अंतर आणि या काळात समाजसेवी संस्थांची जबाबदारी यावर त्यांनी भाष्य केले.

या कार्यक्रमास सुमारे ५०० पेक्षा अधिक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन य. दा. जोशी यांनी केले व आभार दिपाली मानकर यांनी मानले.

**हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. नॉर्मन बोरलॉग या विषयावर प्राचार्य डॉ. जयराम पूरकर यांचे व्याख्यान**

सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर २००९

हरितक्रांतीचे प्रणेते व नोबेल पुरस्कार विजेते डॉ. नॉमर्न बोरलॉग यांनी केलेल्या संशोधनाचा फायदा अनेक विकसनशील आणि प्रगत राष्ट्रांनी घेऊन अन्नधान्यात स्वयंपूर्णता मिळवली, असे प्रतिपादन के. के. वाघ कृषी महाविद्यालयाचे कृषी शास्त्रज्ञ प्राचार्य डॉ. जयराम पूरकर यांनी केले आहे.

डॉ. पूरकर म्हणाले की, अन्न सुरक्षिततेचे मुख्य सूत्र सांगणाऱ्या आणि शेतात रमणाऱ्या डॉ. बोरलॉग यांनी जागतिक लोकसंख्या आणि गव्हाचे उत्पादन या गोष्टींचाही विचार केला. शेतीमुळे स्वयंरोजगार, दारिद्र्य निर्मूलन, सुसंस्कृत जीवनशैली, सुखाची क्रांती होऊ शकते, असे विचार मांडणाऱ्या डॉ. बोरलॉग यांनी मेक्सिको सारख्या गव्हाचे उत्पादन कमी असणाऱ्या देशात आपल्या संशोधनाद्वारे अधिक उत्पादन देणाऱ्या गव्हाच्या जाती निर्माण करून, मेक्सिकोला गहू निर्यातक्षम अग्रेसर देश बनविला. गव्हाबरोबरच मका, ज्वारी या पिकांवरही त्यांनी केलेले संशोधन भारतासारख्या विकसनशील देशालाही पूरक असल्याचे डॉ. पूरकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक विश्वास ठाकूर यांनी केले. या कार्यक्रमास अध्यक्ष विनायक पाटील, प्रा. अशोक सोनवणे, नाशिक आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी संतोष जाधव, रमाकांत देशपांडे आदि मान्यवर उपस्थित होते.

**यशवंतराव चव्हाण फिल्म उत्सव**

**बुधवार, दिनांक १४ व गुरूवार, दिनांक १५ ऑक्टोबर २००९**

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील लघुपट विभागात सन्मानित करण्यात आलेले चित्रपट पाहण्याची संधी 'यशवंतराव चव्हाण फिल्म उत्सव' मुळे नाशिककरांना मिळाली. दिनांक १४ व दिनांक १५ ऑक्टोबर २००९ रोजी या महोत्सवाचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभाग केंद्र, दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी आणि फिल्म डिव्हिजनतर्फे करण्यात आले होते.

समाजातील बदलत्या वास्तवाचा, विषयांचा वेध घेणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटांची रसिकांना ओळख व्हावी, हा फिल्म उत्सव आयोजनामागील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा उद्देश आहे. या निमित्ताने लघुपटांवरील मुक्त चर्चेचेही आयोजन करण्यात आले होते. दोन्ही दिवस सायंकाळी सहा ते नऊ वाजे दरम्यान हा उत्सव प्रतिष्ठानच्या सावकरनगर येथील केंद्रात संपन्न झाला.

**बुधवार, दिनांक १४ ऑक्टोबर २००९**

अजय रैना दिग्दर्शित 'टेल देम, टू ट्री हॅंड प्लान्टेड, हॅंड नाऊ ग्रोन' या लघुपटात १२ वर्षांच्या विजनवासानंतर काश्मिरमध्ये परतलेल्या व्यक्तीचे आत्मकथन आहे. या त्यांच्या वैयक्तिक प्रवासात अनेक व्यक्ती व स्थळांना परत भेट देतांना पूर्व आयुष्यातील अनेक आठवणींना उजाळा मिळतो. काश्मिरमधील दहशतवादामुळे त्या नंदनवनातील अनेक जखमा, दुःखद घटना पुन्हा उघड्या होतात. या लघुपटाला २००२ वर्षासाठी 'सुवर्ण शंख' पारितोषिकाने सन्मानित करण्यात आलेले आहे.

'दि लिजंड ऑफ फॅट मामा' या लघुपटाचा विषयही आगळावेगळा आहे. कोलकात्यातील काही चायनीज लोकांचे १९६२ च्या भारत - चीन युद्धानंतर टोरांटोमध्ये स्थलांतर होते.

टोरांटोहून कोलकात्यात येऊन आपे हुरहुर लावणारे पूर्वजीवन शोधणाऱ्या एका स्त्रीची ही कहाणी आहे. कोलकात्याच्या प्रसिध्द चायना टाऊनमधील पारंपारिक चिनी लोकसमूहाचा हा अनोखा शोध आपल्याला भावूक करणारा आहे. २००४ चे सर्वोत्कृष्ट लघुपटाचे पारितोषिक या लघुपटाला मिळाले आहे.

'भिवंडी ट्रॅजेडी' मध्ये भिवंडीतील अन्न विषबाधेमुळे आजारी झालेल्या १२० कामगारांची शोकांतिका दाखविण्यात आली आहे. भिवंडीसारख्या औद्योगिक शहरातील ही घटना. त्यातून घडलेले मृत्यू, अन्न आणि आरोग्यविषयक समस्या, कामानिमित्त स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांच्या समस्या, अशा सर्व प्रकारचा मागोवा या लघुपटात घेण्यात आला आहे. मुंबई लघुपट महोत्सवात १९९८ मध्ये 'सुवर्ण शंख' पुरस्काराने या लघुपटाला सन्मानित करण्यात आलेले आहे.

**गुरूवार, दिनांक १५ ऑक्टोबर २००९**

विजॉय त्रिपाठी दिग्दर्शित 'लडाख-लँड ऑफ मिस्टरी' या लडाखवरील लघुपटात एका आगळ्या वेगळ्या विश्वाचा प्रवास आहे. हा लघुपट लडाखचे निसर्ग सौंदर्य, सिंधू नदी, पर्वतरांगा, वन्यजीवन यांचे दर्शन घडवितो. नितांत सुंदर नुब्रा व्हली, पेगाँग लेक आणि निर्वासीत तिबेटी लोकांचे दुःख, बुध्द धर्माचा साधेपणा अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण पैलूंना युक्त असा हा लघुपट आहे. या लघुपटाला २००४ मध्ये 'रजत शंख' या पारितोषिकाने गौरविण्यात आले आहे.

'राजू ॲण्ड आय' या लघुपटात १० ते १२ वर्षे वयोगटातील निम्नस्तरातील जीवन जगणाऱ्या मुलांचे भावविश्व रंगविले आहे. अतुल हा उच्च मध्यम वर्गातील मुलगा आपल्या घराजवळच्या झोपडपट्टीजवळून नेहमीच जा-ये करत असतो. एकदा त्याचे लक्ष कचरा डब्यात काहीतरी शोधणाऱ्या मुलाकडे जाते. तेव्हा त्याला त्याचा मित्र राजूच आहे असे वाटते. शहरातील या दोन मुलांच्या परस्परसंबंधाचा शोध घेणारा हा 'ॲनिमेशन लघुपट' आहे. २००४ मध्ये या लघुपटाला 'सुवर्ण शंख' या पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे.

दोन्ही दिवसांच्या फिल्म उत्सवाचे स्वागत व प्रास्ताविक विश्वास ठाकूर यांनी केले. सदर फिल्म उत्सवासाठी कलाक्षेत्रातील मान्यवर रसिक उपस्थित होते.

सुप्रसिद्ध कवी व नाटककार रॉय किणीकर यांच्या 'उत्तररात्र' या दीर्घ कवितेचे सांगितिक अभिवाचन सोमवार , दिनांक ०२ नोव्हेंबर २००९

जीवनातील विविध प्रसंगांवरील चिंतनशील तत्त्वज्ञान मांडणाऱ्या 'एक उत्तररात्र' या दीर्घ कवितेच्या सांगितिक अभिवाचनाचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नाशिकतर्फे आयोजित करण्यात आला होता.

जीवनाच्या आशयगर्भ तत्त्वज्ञानाचे सार ..... माणसाच्या अगम्य जीवनाविष्काराचे अर्थ शोधण्याचा प्रयत्न. त्याच्या मनात उमटणारे तरंग आणि या साऱ्याचा तरल शब्दवेध घेणारे कलंदर कवी रॉय किणीकर यांच्या 'उत्तररात्र' या दीर्घ काव्यावर आधारित कार्यक्रमाने रसिकांना आनंद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनायक रानडे यांनी तर स्वागत दीपाली मानकर यांनी केले. या कार्यक्रमास कवी किशोर पाठक, ज्येष्ठ पत्रकार दत्ता सराफ, चंद्रकांत महामिने, नरेश महाजन, शरद पुराणिक आदि साहित्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**यशवंत रंगोत्सव (शुक्रवार, दिनांक १३ ते बुधवार, २५ नोव्हेंबर २००९)**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे यशवंतराव चव्हाण यांच्या २५ व्या पुण्यतिथी निमित्ताने दिनांक १३ ते २५ नोव्हेंबर २००९ या कालावधीत यशवंत रंगोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने कलारसिकांना दर्जेदार कार्यक्रमांची अपूर्व मेजवानी मिळाली.

चित्रकलेतील सर्व कलाप्रवाह व सर्व माध्यमे यात नाशिककर कलावंतांचे योगदान मोठे आहे. याचा प्रातिनिधिक परिचय रसिकांना व्हावा, या उद्देशाने नाशिकमधील पन्नासहून अधिक नव्या-जुन्या चित्रकारांच्या कलाकृतींचा आस्वाद घेण्याची दुर्मिळ संधी यशवंतराव

चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकने उपलब्ध करून दिली होती. त्याचबरोबर चित्रकारांना हक्काचे व्यासपीठ म्हणून प्रतिष्ठानच्या नूतन 'आर्ट गॅलरी' चा शुभारंभही या रंगोत्सवाच्या निमित्ताने झाले.

शुक्रवार, दिनांक १३ नोव्हेंबर २००९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता ख्यातनाम चित्रकार रवी परांजपे यांच्या शुभहस्ते रंगोत्सवाचे उद्घाटन संपन्न झाले. याचवेळी चित्रकार शिवाजी तुपे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांना नाशिककरांच्यावतीने मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला.

प्रदर्शनाच्या निमित्ताने चित्रकलेविषयक व्याख्याने, स्लाईड-शो, चर्चा, प्रात्यक्षिके, चित्रपट यांचेही आयोजन करण्यात आले होते. या चित्रकलाक्षेत्रातील नामवंत व्यक्ती सहभागी झाले होते.

**शुक्रवार, दिनांक १३ नोव्हेंबर २००९–यशवंत रंगोत्सव उद्घाटन समारंभ :**

चित्रकला आणि उद्यमशीलता, राष्ट्राची प्रगती यांच्यात गहिरे नाते आहे, मात्र मागील अनेक वर्षापासून सर्वांनाच या नात्याचा विसर पडला आहे, अशी खंत ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांनी व्यक्त केली. युवकांनी चित्रकलेचे राष्ट्राच्या प्रगतीतील प्रयोजन लक्षात घ्यावे व सौंदर्यदृष्टीने कलाकृतींची निर्मिती करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे आयोजित यशवंत रंगोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी परांजपे बोलत होते. कार्यक्रमात परांजपे यांच्या हस्ते शिवाजी तुपे यांचा अमृतमहोत्सवी वर्षाबद्दल हृद्य सत्कार करण्यात आला. तसेच प्रतिष्ठानच्या आर्ट गॅलरीचे उद्घाटन करण्यात आले.

**शनिवार, दिनांक १४ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार सुहास बहुलकर (मुंबई), विषय : कला – कलेसाठी समाजासाठी स्लाईड शो व व्याख्यान**

आज संगीत, नाटक आदी सादरीकरणाच्या कलांना मोठ्या प्रमाणात महत्त्व दिले जाते. त्या तुलनेत चित्रकला, शिल्पकला दुर्लक्षित राहिल्या आहेत. कलावंताने स्वतःचा विकास करतानाच समाजाच्या वैचारिक व अभिरूचीचा स्तर उंचावण्यासाठी झटले पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिध्द चित्रकार सुहास बहुलकर यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नाशिक विभागीय केंद्रातर्फे यशवंत रंगोत्सवात 'कला-कलेसाठी, समाजासाठी' या विषयावर ते बोलत होते. यावेळी त्यांनी स्लाईड शोच्या माध्यमातून उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले की, दृश्य कलेच्या बाबतीत आज गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. समाजासाठी कला व जीवनासाठी कला याचा नेमका समतोल कलाकाराने साधला पाहिजे.

कलेचा राजसत्ता, धर्मसत्ता यासाठी होणाऱ्या वापराबाबत नेमकी माहिती देतानाच, ग्रीक चित्रकला, पाश्चात्य देशातील चित्रशैलीची धावती ओळखही त्यांनी करून दिली. स्वतःच्या कलामय जीवनात आलेले प्रसंग त्यांनी सांगितले. प्रा. अनिल अभंगे यांनी प्रास्ताविक, परिचय सूत्रसंचालन केले. सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार संजय शेलार (कोल्हापूर), विषय : व्यक्तिचित्र प्रात्यक्षिक**

व्यक्तिचित्राची नेमकी गरज आणि त्या अनुषंगाने त्यासाठी लागणारा नैसर्गिक प्रकाश, व्यक्तीक्षेत्र रेखाटनातील महत्त्वाच्या बाबी यांचे दर्शन चित्रकार संजय शेलार यांनी प्रात्यक्षिकातून दिले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विनायक रानडे यांनी केले तर चित्रकार संजय शेलार यांचा सत्कार नंदू गवांदे यांनी केला, तर परिचय प्रा. अनिल अभंगे यांनी करून दिला.

**रविवार, दिनांक १६ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार संजय शेलार (कोल्हापूर), विषय : मी व समकालिन कला – स्लाईड शो व व्याख्यान**

चित्रकला ही स्वानंदाचे सामाजिक आनंदात रूपांतर करण्याची किमया आहे. प्रत्येक कला विद्यार्थ्याने, चित्रकाराने,

कलावंताने आपला पिंड, प्रकृती ओळखून चित्रण करावे, असे प्रतिपादन कोल्हापूरचे चित्रकार संजय शेलार यांनी केले.

**रविवार, दिनांक १७ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**आर्किटेक्ट संजय पाटील (नाशिक), विषय : वास्तुकला व चित्रकला – स्लाईड शो व व्याख्यान**

वास्तुकला व चित्रकला या दोन्ही कलांनी सामाजिक व्यवस्था आणि परंपरेवर प्रभाव निर्माण केला आहे. यामुळे या दोन्हीत एक समान धागा असल्याचे प्रतिपादन वास्तुरचनाकार संजय पाटील यांनी केले.

**बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**लघुपट – स्पॅनिश चित्रकार गोया यांचा जीवनपट**

सुप्रसिध्द स्पॅनिश चित्रकार गोया यांच्या जीवनावर आधारित दीड तासांची चित्रफीत दाखविण्यात आली. गोया यांच्या मनावर आध्यात्मिक विचारांचा प्रभाव होता. माणसा-माणसातील शोध तो चित्ररूपाने मांडायचा, समाजातील वास्तववादी अनुभव हे त्याच्या चित्रांचे विषय असायचे. रोममधील कलाविषयक विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी गोया यांच्यासारख्या चित्रकारांचा मोठा वाटा आहे. गोया यांच्या जीवनावरील या चित्रपटाचे दिग्दर्शन स्पॅनिशचे जगप्रसिद्ध दिग्दर्शक कार्लो सवरा यांनी केले असून गोया हा त्याच्या मुलीला स्वतःचे आयुष्य उलगडून सांगतो, असे सर्वसाधारण या चित्रपटाचे कथानक आहे. चित्रपटात थ्री डायमेन्शनल या तंत्राचा वापर करण्यात आला आहे. चित्रकाराच्या जीवनात येणारे चढ-उतार कसे असतात, हे मांडण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आलेला आहे.

**गुरूवार, दिनांक १९ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**ज्येष्ठ चित्रकार शिवाजी तुपे यांची प्रकट मुलाखत (मुलाखतकार – कलासमिक्षक श्रीराम खाडिलकर)**

संपूर्ण जग सुंदर असले तरी माझे गावही सुंदर आहे. या गावाचे सौंदर्य चित्रबध्द करण्यात मला सर्वाधिक आनंद मिळतो. विशेषतः जुन्या नाशकातील वाडे आता नष्ट होत असल्याने त्यांचे जास्तीत जास्त लॅण्डस्केप करून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. नव्या पिढीला आपले शहर कसे होते  हे समजावे यासाठी हा खटाटोप आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रकार शिवाजी तुपे यांनी केले. यशवंत रंगोत्सवातील प्रकट मुलाखतीत शिवाजी तुपे बोलत होते. कलासमिक्षक श्रीराम खाडिलकर यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना दिलखुलास उत्तरे देत शिवाजी तुपे यांनी रसिकांसमोर आपल्या कलाजीवनाचा पट मांडला.

**शुक्रवार, दिनांक २० नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**लघुपट – फ्रेंच चित्रकार सेझान यांचा जीवनपट दाखविणारा थ्री कलर्स**

पाश्चिमात्य चित्रकलेचा इतिहास समोर आणणाऱ्या चित्रकलेतील बदलत्या प्रवाहांचा खरा साक्षीदार सेझान होता. इम्प्रेशन जर्नालिझम, मॉडर्न आर्ट, माणसांच्या प्रतिकृती, रंगसंगती यांचा कलात्मक वेध या लघुपटातून घेण्यात आलेला आहे. चित्रातून आशयाचा वेध घेणारी, चित्रशैली व रंगांचे प्रवाहीपण हे त्याच्या कामाचे वेगळेपण होते. त्यानंतर जागतिक कीर्तीचा चित्रकार व्हॅन गॉग यांची जीवनशैली दर्शविणारा चित्रपट दाखविण्यात आला.

**शनिवार, दिनांक २१ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**कलासमिक्षक विनायक परब, विषयः अमेरिकन दृक दृश्य कला–स्लाईड शो व व्याख्यान**

अमेरिकेतील दृश्य कलांच्या विकासासाठी तेथील विविध संस्थांनी व चित्ररसिकांनी कलाकृतींची जपवणूक अत्यंत जबाबदारीने केल्यामुळे तेथील कला जोपासण्यास महत्त्वाचा भाग ठरला आहे, असे प्रतिपादन कलासमिक्षक विनायक परब यांनी केले.

यशवंत रंगोत्सवात 'अमेरिकन दृक दृश्य - कला' या विषयावरील स्लाईड शो व व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी विनायक परब पुढे म्हणाले की, आधुनिक चित्रकलेतील महत्त्वाच्या प्रवाहांची नोंद अमेरिकन कलाक्षेत्रात आढळते. दृश्य अनुभव व

त्यांच्या अनुषंगाने येणारा विचार याची अत्यंत गंभीरपणे चर्चा अमेरिकन कलाक्षेत्रात आढळते. प्रोग्रसिव्ह चळवळीची सुरूवात अमेरिकेतही वेगाने झाली होती. नंतर ती चळवळ भारतात आली असेही परब म्हणाले.

साल्वोदोर दाली, रोदें मातिझसारख्या अनेक कलावंताची कामाची पद्धत आणि त्यांचा विचारही जगाने स्वीकारला. अभिरुचीविषयक चळवळीचा तोही एक महत्त्वाचा टप्पा आहे, असेही ते म्हणाले. प्रास्ताविक विनायक रानडे यांनी केले. परब यांचा सत्कार शिवाजी तुपे यांनी केला. परिचय अनिल अभंगे यांनी करून दिला.

**रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार संजय साबळे, विषय : कंपोझिशन – प्रात्यक्षिक व व्याख्यान**

रचना तंत्रातील रंगसंगती आणि त्या अनुषंगाने येणारे रंगभान यांचा सुंदर अविष्कार चित्रकार संजय साबळे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे कंपोझिशनच्या सहाय्याने रसिकांना करून दिला. बदलते कलाप्रवाह, चित्रकलेतील नवनवीन प्रवाह तसेच नवीन नवीन अविष्कारांची माहिती त्यानी आपल्या व्याख्यानातून दिली.

रेखाटन ते अमूर्त शैलीतील आपली चित्रे, कलाविषयक अभिरूची आणि जनमानसात असलेला कलाविषयक दृष्टिकोन यावर त्यांनी विचार व्यक्त केले. चित्रकाराला जे भावते ते मांडण्याची पद्धत आणि फॉर्मचे नाते याचा परस्परसंबंधही त्यानी उलगडून दाखविला. कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी साबळे यांचा सत्कार केला.

**सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार शिवाजी तुपे, विषय : स्लाईड शो व व्याख्यान**

जेष्ठ चित्रकार शिवाजी तुपे यांनी स्लाईड शो व व्याख्यानातून आपल्या सुवर्णमहोत्सवी कला कारकिर्दीचा आढावा रसिकांसमोर मांडला. नाशिकसह भारतभर चित्रे आणि त्यातील आठवणीही त्यांनी जागवल्या. चित्रकलेची उपजत असलेली उर्मी आणि त्यातून निर्माण झालेला कलाविष्कार यांचेही त्यांनी दर्शन घडविले. प्रत्येक चित्राला असलेला संदर्भ, इतिहास याचीही माहिती त्यांनी दिली.

नाशिक शहराची आध्यात्मिक ओळख आणि महानगरानंतर त्यात झालेला बदल याचाही वेध त्यांनी घेतला. त्र्यंबकेश्वर, निवृत्तीनाथ यात्रेला जाणारे वारकरी, रामकुंड, मुखपृष्ठ यांच्याही त्यांनी आठवणी सांगितल्या. नाशिकची चित्रमय ओळख सर्वांना व्हावी, यासाठी चित्रमय पुस्तक लवकरच प्रकाशित करत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्तविक विनायक रानडे यांनी केले. शिवाजी तुपे यांचा सत्कार मुक्ता बालिगा यांनी केला.

**मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार प्रफुल्ल सावंत व राजेश सावंत, विषय : स्लाईड शो व व्याख्यान**

निसर्गचित्र, कम्पोझिशन, व्यक्तिचित्र, स्टील लाईफ अशा विविध चित्रप्रकारातून चित्रांचा अवकाश, प्रकाश विषय, रंगभान व चित्रशैली यंची माहितीपूर्ण ओळखही चित्रकार प्रफुल्ल सावंत व राजेश सावंत यांनी आपल्या स्लाईड शोद्वारे दिली अनेक माध्यमात काम करीत असताना चित्रात आधुनिकता कशी आणता येईल, सर्व चित्रप्रकार एकमेकांना कसे पुरक आहेत, तसेच भारतातील विविध ठिकाणी प्रात्यक्षिकांचे अनुभव, नैसर्गिक प्रकाशाचा वापर आणि चित्रविषय यांची सांगड त्यांनी विविध चित्रांतून करून दिली. व्यक्तिचित्र करीत असतांना व्यक्तीचा स्वभाव, त्याची चेहऱ्याची ठेवण यांची शास्त्रशुद्ध माहितीही त्यांनी कथन केली. आधुनिक चित्रकलेतील होणारे बदल आणि भारतीय चित्रशैली याविषयीही त्यांनी विचार व्यक्त केले.

सुषमा दाते व रामदास महाले यांच्या हस्ते सावंत बंधूंचा सत्कार करण्यात आला.

**बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर २००९ – यशवंत रंगोत्सवः**

**चित्रकार विजयराज बोधनकर (ठाणे), विषय : कॅरिकेचर प्रात्यक्षिक व व्याख्यान**

समाजरूपी सागरात घडणाऱ्या अनेकविध घटनांकडे तटस्थपणे व डोळसपणे पाहिल्यास चित्रांसाठी स्वतंत्र भाषा मिळते. चित्रकार रंग रेषेद्वारे विसंगती आणि वेगळ्या विनोदांवर भाष्य करतो. त्यातून विचार मांडतो, असे प्रतिपादन व्यंगचित्रकार विजयराज बोधनकर यांनी केले.

बोधनकर यांनी कॅरिकेचर विषयावर स्लाईडसच्या माध्यमातून व्याख्यान दिले. ते म्हणाले जनमानसात चित्रकलेविषयी समाजात

असलेली अनास्था दूर करण्याचे काम चांगली व्यंगचित्रे प्रभावीपणे करतात. अर्कचित्रे म्हणजे काय? अभिरूची कशी वाढवावी? कलावंतांनी आत्मकेंद्रीपणा सोडून देण्यासाठी काय करावे? याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

**'स्टोरी ऑफ द स्टफ' माहितीपट**

**मंगळवार, दिनांक २९ डिसेंबर २००९**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक व अभिव्यक्ति मिडिया फॉर डेव्हलपमेंटतर्फे 'स्टोरी ऑफ द स्टफ' हा माहितीपट दाखविण्यात आला.

सध्या ग्लोबल वार्मिंग हे खूप मोठे आव्हान आपल्यासमोर उभे आहे. नुकतीच अमेरिकेतील कोपनहेगन येथे तापमानवाढीसंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर परिषद झाली. यात जगातील अनेक देशांशी सहभाग घेऊन वाढते तापमान मानवाला जगण्यास खूप त्रासदायक ठरते आहे, भविष्यात यावर काहीतरी ठोस पावले उचलली जावी या संदर्भात चर्चा करण्यात आली तशीच चर्चा आपल्या येथेही व्हावी हा माहितीपट दाखविण्यामागे उद्देश होता.

सदर माहितीपट पर्यावरणीय चक्रात मानवाने केलेल्या उलथापलथीवर आधारीत आहे. तापमान वाढीला सर्वस्वी आपणच स्वतः कुठे ना कुठे जबाबदार आहोत. वस्तुची गरज नसतांना खरेदी करणे व ती वापरानंतर अयोग्य रितीने फेकून देणे यामुळे अजैविक कचऱ्याची मोठी समस्या तयार होत आहे. भौतिक सुखाच्या आहारी जाऊन हा उपभोगवादी दृष्टिकोन वाढीस लागत आहे. आपल्याला परदेशाकडून मिळालेल्या या संस्काराचे लोण वाढत असल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय समस्या वाढत आहे. हे चक्र कसे तयार होते? यात रायकीय अर्थव्यवस्था कशाप्रकारे आपल्या कामातील गैरपद्धतीमुळे सामान्य माणसाला आर्थिक कोंडीत अडकवीत आहे या संदर्भात देखील विचार या माहितीपटात नमूद केला आहे.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विनायक रानडे यांनी केले व सूत्रसंचालन अभिव्यक्तिच्या संगीता जाधव यांनी केले.

**'कवडसे' कविता चित्र - प्रदर्शन**

**दिनांक १ ते ५ जानेवारी २०१०**

घर हरवलेल्या मुलांचे जीवनानुभव, त्यांच्यातील मूलभूत कला जाणिवा यांचा शोध घेण्याच्या प्रयत्नातून आकाराला आलेले कविता आणि चित्रांचे 'कवडसे' नावाच्या आगळ्या वेगळ्या प्रदर्शनाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नाशिकच्या सावरकर नगर येथील आर्ट गॅलरीत ओवी दीक्षित, गौरी दसककर, ईश्वरी दसककर, वैष्णवी भडकमकर, सुरश्री दसककर, प्रतिक पंडित, ऐश्वर्या पवार, श्रेया सावळे, प्रसाद खैरनार व रागेश्री वैरागकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संपन्न झाले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्तविक करतांना कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे अपंग हक्क विकास मंचच्या माध्यमातून अपंग व अनाथांच्या विकासासाठी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले जातात, त्याच माध्यमातून 'कवडसे' प्रदर्शनाचे आयोजन करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यावेळेस त्यांनी प्रतिष्ठानने वर्षभरात राबविलेल्या विविध कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा घेतला.

प्रदर्शनाचे संकल्पक ज्येष्ठ रंगकर्मी संजय हळदीकर यांनी प्रदर्शनामागची भूमिका मांडली. ते म्हणाले की, विविध नाट्य प्रशिक्षण शिबिरांच्या निमित्ताने लहान मुलांच्या भावविश्वाने विशेषतः सर्वसामान्य घरापासूनही वंचित मुलांच्या भावविश्वाने मला खुणवायला सुरूवात केली. लहानपणात येणारे अनुभव अशा मुलांच्या संस्कारित नसलेल्या कला जाणीवांमधून कशा प्रकारे अभिव्यक्त होतात याचा शोध घेण्याच्या निमित्ताने हे प्रदर्शन करावे असे मला वाटते.

याप्रसंगी प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. वसंत पवार, डॉ. शोभा बाच्छाव, गुरूमित बग्गा तसेच नगरसेवक शिवाजी गांगुर्डे, बाबा दातार, प्रमोद भडकमकर, सुभाष दसककर, निलेश चव्हाण, प्रसाद पाटील, सुधा मेहता, रघुनाथ फडणीस व विनायक रानडे आदि मान्यवर उपस्थित होते.

**'खेळ मांडियेला' संतरचनांवर आधारीत मैफलीचे आयोजन**

**दिनांक ८ जानेवारी २०१०**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिकतर्फे 'खेळ मांडियेला' या संतरचनांवर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बेल्जियम येथील गायिका ज्युडी रस्ट व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पखावज वादक पं. उध्दव शिंदे आपेगांवकर हे या मैफलीचे कलाकार होते.

**योगाभ्यास शिबीर**

**दिनांक १७ जानेवारी २०१० पासून**

सत्यानंद योगाच्या अनुभवी व तज्ज्ञ प्रशिक्षक जानकी राजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वास्थ्य योग शिकण्याची सुवर्णसंधी नाशिककरांना प्रतिष्ठानने उपलब्ध करून दिली आहे. या योगविषयक शिबीरास नाशिक शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेला आहे.

**कागदी होड्या बनविण्याची कार्यशाळा**

मार्गदर्शक : मधुकर आठल्ये

**दिनांक ६ फेब्रुवारी २०१०**

बालवयापासून विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ असलेल्या उपजत कलेची जपणूक करावी व अभ्यासाबरोबरच कलागुणांचा विकास होण्यासाठी प्रयत्न करावे. त्यासाठी विविध स्पर्धा, शिबिरे यात सहभागी होऊन स्वतःचा अष्टपैलू विकास साधावा तोच खरा आनंदी जगण्याचा मार्ग आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक सुनिल कोतवाल यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, नाशिकतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी सुप्रसिद्ध ओरिगामी कलाकार मधुकर आठल्ये यांच्या 'कागदी होड्या' बनविण्याच्या प्रात्यक्षिक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

ते म्हणाले की, जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघण्यासाठी कलेचा निश्चितच उपयोग होतो व जीवनात उमेद निर्माण करण्यासाठी त्याचा उपयोग करावा व आपल्यातील क्षमतेचा विकास साधावा.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करतांना कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र, नाशिकतर्फे शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. त्या निमित्ताने त्यांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रतिष्ठानचा प्रयत्न आहे.

यावेळी मधुकर आठल्ये यांनी होड्यांच्या गमतीदार जन्मकथा व होड्या बनविण्याच्या साध्या, सोप्या पद्धती सांगत उपस्थित विद्यार्थ्यांकडून होड्या बनवून घेतल्या. त्यात होडकं, शिकारा होडी, काळू - बाळू होडी, रॉकेट होडी, भरारी होडी, मयूरपंखी होडी, नाग होडी, म्हातारीचा बुट होडी, तरते रंगमंच होडी, फुलपाखरू होडी, राजा-राणी होडी, सुळकाशीड होडी अशा विविध प्रकारच्या होड्यांचा समावेश होता.

श्री. आठल्ये म्हणाले की, तुमच्यातील असलेल्या कुतुहलाला अभ्यासाची जोड दिल्यास त्यातून नवनिर्मिती होते. तोच विचार प्रात्यक्षिक कार्यशाळेमागे आहे. टी. व्ही., इंटरनेटच्या युगात मुलांचे भावविश्व हरवून चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेसाठी नाशिक मधील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. विनायक रानडे यांनी आठल्ये यांचा परिचय करून दिला.

पक्ष चालतात ते निष्ठेने चालतात हे जरी खरे असले, तरी लोकशाही पक्ष हे विचारांच्या निष्ठेने चालले पाहिजेत असा तुमचा-आमचा आग्रह असला पाहिजे. व्यक्तीवरच्या निष्ठा चुकीच्या आहेत. त्या निष्ठा काम देत नाहीत. कारण व्यक्ती शेवटी चूक करू शकते. मनुष्य कितीही मोटा असला तरी त्याच्या हातून चूक होणार नाही असे विधान कोणीही करू शकणार नाही.

# विभागीय केंद्र लातूर
# कार्यवृत्त

### १) दि. ०५/०९/२००९ मांडवा ता. माहूर जि. नांदेड

मांडवा आदिवासी गाव आहे. या छोट्या गावात बचतगटाचे काम समाधानकारक चालते. प्राचार्य बी. के. जावळे यांनी ग्रामस्थांपुढे बचत गटाचे महत्व सांगताना बांगालादेशातील बचतगटाच्या चळवळीची सविस्तर माहिती दिली. गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपसरंपचाने कार्यक्रमाबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आभार मानले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व सदस्य प्रा. उत्तमराव सुर्यवंशी यांचेही मार्गदर्शन झाले.

### २) उस्मानाबाद दि. ०८/०९/२००९

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त प्राचार्य डॉ. एस.जे. देशमुख यांचे साक्षरता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.ए.डी. जाधव हे होते. प्रमुख पाहुणे याप्रसंगी म्हणाले की, लोकांना केवळ लिहिता वाचता न येता त्यांच्या वतीने संगणक साक्षरता, जलसाक्षरता, आरोग्य साक्षरता, कृषि साक्षरता, बँकींग साक्षरता, शेती साक्षरता अशा सर्वच क्षेत्रातील साक्षरता येणे आज नितांत काळाची गरज आहे. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व इतर सदस्य उपस्थित होते.

### ३) लातूर - दि. १७/०९/२००९

लातूर येथील अंधजन विकास मंडळाच्या सभागृहात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विभागीय केंद्राच्या वतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी थोर स्वातंत्र्यसेनानी गोविंदराव लांडगे, प्रभाकर कुलकर्णी इत्यादींचा सत्कार अंध अपंग मंडळाचे अध्यक्ष तथा विभागीय केंद्राचे सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रंसगी प्रमुख पाहूणे म्हणून ॲड. मनोहरराव पाटील, सामाजिक कार्यकर्ते शिवदासराव लखादिवे इ. चे मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. आभार श्री. गोरे यांनी मानले. वसंतराव मिरकरे, श्रीमती अर्चना साखरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### ४) गोडसा ता. माहूर, जि. नांदेड दि. १८/०९/२००९

गोडसा हे माहूर तालूक्यातील छोटे गाव. या गावात १९४८ साली रझाकारांनी धुमाकूळ घातला होता. हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे अभ्यासक प्रा. उत्तमराव सुर्यवंशी यांचे हैद्राबाद मुक्तीसंग्राम व आदिवासी या विषयावर सविस्तर व्याख्यान झाले. हरिभाऊ जवळगे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. शाळेतील विद्यार्थ्यांना निझामांनी क्रुर राजवटीने सामान्य माणसाची कशी परवड केली या विषयावर प्रा. एस.डी. पठाण यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. या गावाचे सरपंच श्री. विजयजी यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या या कार्यक्रमाबद्दल प्रतिष्ठानचे आभार मानले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या विविध उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली.

### ५) लातूर दि. २८/०९/२००९

दसरा महोत्सवानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने जनता जनार्दनाला हार्दिक शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम विभागीय केंद्राच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता.

### ६) लातूर ज्येष्ठ नागरिक दिन दि. ०१/१०/२००९

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हरिप्रसाद सोमाणी हे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा., लातूरचे शिक्षणमहर्षि डॉ. गोपाळरावजी पाटील हे होते. आपले घर एक मंदीर या मंदीरात आनंद निर्माण करण्याचे कार्य जेष्ठांनी करणे अगत्यचे असल्याचे याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणाले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना जेष्ठाने हास्यात, समाधानात व आनंदात आपले जीवन व्यतित करणे किती गरजेचे आहे याबद्दल माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांच्या हस्ते व्यंकटरावजी कुलकर्णी, हबीब महमदअली, यु. के. कांबळे, सौ. सुजाताताई बिरादार यांचा सत्कार करण्यात आला.

### ७) उस्मानाबाद दि. ०८/१०/२००९

लोकशाही सबलीकरणासाठी मतदार जागृती या विषयावर

प्रा. ए. डी. जाधव यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रा. ए. बी. टोंबरे हे होते. याप्रसंगी प्रा. ए. डी. जाधव म्हणाले की, लोकशाही सबलीकरणासाठी मतदाराचे जागृत असणे आवश्यक असून योग्य उमेदवारास निवडून द्यावे. ज्यांना सामाजिक प्रश्नांची जाण आहे त्याचे चारित्र्य व जगण्याची पारदर्शकता, मतदाराबद्दल जिव्हाळा असणे आवश्यक आहे.

### ८) नांदेड दि. १५/१०/२००९

मालागुडा ता. माहूर जि. नांदेड येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने दि. १५/१०/२००९ रोजी स्थानिक जनतेसाठी कार्यक्रम घेण्यात आला. या गावांहून माहूरला जाण्यासाठी बसेस नाहीत. तसेच शासनाने स्वच्छता अभियान या आदिवासी खेड्यात राबविले पाहिजे, बसेसची सोय करून दिली पाहिजे इ. ग्रामस्थांच्या गरजाकरिता विभागीय केंद्राच्या वतीने व येथील सरपंचाच्या सहकार्याने वरिष्ठाकडे पाठपुरावा करण्याकरिता या ग्रामस्थांचा, आदिवासींचा मेळावा घेऊन या मेळाव्यात विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे, सदस्य प्रा. व्ही. एन. इंगोले यांनी येथील ग्रामस्थांच्या सर्व प्रश्नाबद्दल सविस्तर चर्चा केली.

### ९) लातूर दि. १६/१०/२००९

लातूर येथील विभागीय केंद्र व लातूर जिल्हा शाखा अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने दीपावलीनिमित्त फटाकेविरहीत दिपावली साजरी करावी यासाठी लातूर शहरातून प्रदूषणरहीत दीपावलीसाठी रॅली काढण्यात येऊन लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क (टाऊन हॉल) येथे लोकांशी सविस्तर संवाद साधण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. याप्रसंगी ते म्हणाले की, दीपोत्सव हा आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे आपला मोलाचा सण आहे. पण दिपावलीसह सर्व सणाचे सध्या कमी अधिक अवमूल्यन होत आहे याबद्दल आम्हाला दुःख वाटते.

### १०) माहूर जि. नांदेड दि. २२/१०/२००९

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने माहूर येथील आश्रमशाळेला विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व प्रा. उत्तमराव सुर्यवंशी यांनी भेटी देवून आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना चांगले जेवण मिळते का ? वाचनालय व इतर सुविधा याठिकाणी आहेत का याची बारकाईने चौकशी करून संस्थाचालकांना विभागीय केंद्राच्या वतीने सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

### ११) लातूर दि. ०२/११/२००९

गुरूनानक यांच्या जयंतीनिमित्त गुरूनानकाने एकतेचा संदेश या देशाला कसा दिला याबद्दल सविस्तर मार्गदर्शन हिंदी साहित्यिक प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार हे होते.

### १२) लातूर दि. १४/११/२००९

बालकदिन (जवाहरलाल नेहरू जयंती) विभागीय केंद्राच्या वतीने साजरा करण्यात आला. लातूरातील अंगणवाडी, बालवाडी येथील बालकांना खाऊ वाटप करण्यात आला.

### १३) उस्मानाबाद दि. १८/११/२००९

विभागीय केंद्राच्या वतीने वैज्ञानिक दृष्टीकोन निर्मितीसाठी अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या विषयावर मा. मारूतीराव बनसोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य रमेशराव दापके हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून हरिभाऊ जवळगे हे होते. याप्रसंगी समाजसेवक मारूती बनसोडे यांनी आपल्या व्याख्यानात नको त्या अनेक रूढी परंपरा, अंधश्रद्धा लोकांमध्ये कशा वसल्या आहेत त्या कमी झाल्या पाहिजेत त्याशिवाय त्याच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होणार नाही याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

### १४) लातूर दि. २५/११/२००९ यशवंतराव चव्हाण यांचा २५ वा स्मृतिदिन

यशवंतरावांनी तळागाळातील जनतेच्या सुखाचा सदैव विचार केला त्यामुळे त्यांना महाराष्ट्रीयन जनतेच्या हृदयसिंहासनावर स्थान मिळाले शिवाय दिल्ली दरबारी महाराष्ट्राचं खरंखुरं भूषण ठरलेले ते एकमेव लोकनेते होते, असे मत महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, प्रखर विचारवंत प्रा. बा. ह. कल्याणकर यांनी व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने यशवंतराव चव्हाण यांच्या २५व्या स्मृतिदिनानिमित्त नगर परिषदेच्या शिवछत्रपती सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब गोरे होते. विशेष अतिथी

म्हणून माजी खा. डॉ. गोपाळरावजी पाटील, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची उपस्थिती होती. सद्यस्थितीत पैशाला १५ नेते पहायला मिळतात. त्यापैकी काही अपवाद म्हणून जुन्या नेत्याच्या चाकोरीत जीवन जगतात पण बहूतांश आजचे नेतेमंडळी पैसा खर्च करून इतरांकडून नेतेपद लावून घेतात असे सांगून प्रा. बा. ह. कल्याणकर म्हणाले की, स्वातंत्र्यापूर्वी जन्मलेले यशवंतराव लोकनेते होते. त्यांनी राज्याचे पहिले मुख्यमंत्रीपद स्वीकारल्याबरोबर शिक्षणाला अग्रक्रम दिला. शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सामान्याच्या हिताच्या अनेक घोषणा त्यांनी केल्या. त्यामुळे वाडीवस्तीवरील गरीब माणसाला शिक्षणाचे सर्वोच्च शिखर गाठता आले. शिक्षणामुळेच माणूस नवीन बनतो. त्याला अनेक भाषा शिकता येतात. माणसाला एकापेक्षा जास्त भाषा येणे कधीही चांगले आहे कारण, जगातील लोकशाही ही भाषासंवादावर चालते. जातीयता, अंधश्रध्दा, उच्चनिचता, भ्रष्टाचार आदि बाबी माणुसकीला काळीमा फासणाऱ्या आहेत त्या शिक्षणातूनच दूर करता येतात असे यशवंतरावांना वाटत होते त्यामुळेच त्यांनी ईबीसी सारख्या सवलती देऊन शिक्षणाची दारे खुले केली असेही प्रा. कल्याणकर यावेळी म्हणाले. या विभागीय केंद्राच्या कामाबद्दल बोलताना प्रा. कल्याणकर म्हणाले की, या विभागीय केंद्राचे सचिव आमचे मित्र जेष्ठ समाजसेवक, नाटककार मा. हरिभाऊ जवळगे गुरूजी या विभागीय केंद्राचं चालतंबोलतं चाक आहेत. या विभागीय केंद्राच्या कामाच्याबाबतीत आम्ही खुप समाधानी आहोत असेही ते शेवटी म्हणाले.

यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनविषयक तत्वज्ञानावर बोलताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार म्हणाले की, फुले शाहू आंबेडकरांच्या विचाराचा सार म्हणजे यशवंतराव चव्हाण आहेत. इतर प्रांतापेक्षा महाराष्ट्रात जो वेगळेपणा जाणवतो त्याचे सर्व श्रेय समतोल दृष्टी असलेल्या यशवंत नावाच्या माणसाकडे जाते असेही ते यावेळी म्हणाले. अध्यक्ष समारोप भाऊसाहेब गोरे यांनी केला. प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. सुत्रसंचालक प्रा. जोतिराम काटे यांनी तर आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

### १५) लातूर दि. २६/११/२००९

भारतीय संविधान स्वीकृती दिन व मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर व त्यांच्याबरोबर १६ पोलिस अधिकारी शहीद झाले. या सर्वांना विभागीय केंद्राच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

### १६) लातूर दि. २८/११/२००९

महात्मा फुले यांची पुण्यतिथी विभागीय केंद्राच्या वतीने साजरी करण्यात आली.

### १७) उस्मानाबाद दि. ०४/१२/२००९

माहितीचा अधिकार याबद्दल चर्चासत्र, प्रमुख उपस्थिती प्रल्हादराव दापके यांची होती. इतर मान्यवरांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.

### १८) मौजे शिवणी ता. कळमनुरी जि. हिंगोली

अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर दि. ०८/१२/२००९ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळराव कदम यांनी भानामती, नवस, तंत्रमंत्र या कशा दिशाभूल करणाऱ्या बाबी आहेत यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी प्राचार्य ए. आर. शर्मा हे अध्यक्षस्थानी होते. मौजे शिवणी येथील ग्रामस्थांचे या विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी आभार मानले.

### १९) उस्मानाबाद दि. १०/१२/२००९

हागणदारीमुक्त गाव : एक विचारमंथन स्थळ : पोहनेर ता. जि. उस्मानाबाद प्रमुख पाहूणे मा. वसंतरावजी पाटील जिल्हा हागणदारीमुक्त समिती सदस्य, अध्यक्षा मा. प्रतापराव देशमुख सरपंच पोहनेर.

### २०) उस्मानाबाद दि. १२/१२/२००९

जागतिकीकरण : भारतीय शिक्षण या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुकाराम बारबोले, प्रमुख पाहुणे प्रा. जीवन पवार, प्रमुख उपस्थिती हरिभाऊ जवळगे, प्रल्हाद दापके, नागनाथा ठोंबरे.

### २१) उस्मानाबाद दि. २१/१२/२००९

विभागीय केंद्राच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. विषय : एड्स एक महाभयंकर रोग. या स्पर्धेत १२ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विजयी स्पर्धक प्रथम क्रमांक शेळके समाधान (बी.ए.द्वितीय वर्ष), द्वितीय क्रमांक कु. जयदाळे किरणबाई (बी.ए. तृतीय वर्ष) विजयी स्पर्धकांचा प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

### २२) लातूर दि. २५/१२/२००९

नाताळ सणानिमित्त ख्रिश्चन बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### २३) लातूर दि. २७/१२/२००९

विभागीय केंद्राच्या वतीने मुस्लिम बांधवाना मोहरम सणानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

### २४) लातूर दि. ०३/०१/२०१०

महिला मुक्ती दिन सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. प्रमुख पाहूणे म्हणून ॲड. जयश्री पाटील त्याचबरोबर लातूर शहरातील सर्वच क्षेत्रातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

### २५) उस्मानाबाद ०४/०१/२०१०

विद्यार्थी समुपदेशन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर प्रा. अर्जून जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी श्री. विश्वासराव शिंदे (अध्यक्ष, उस्मानाबाद जनता सहकारी बँक) याप्रसंगी विभागीय केंद्राचे सदस्य ॲड. गोमारे, कोषाध्यक्ष गोरे व सचिव हरिभाऊ जवळगे यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थी आज सर्वगुण संपन्न असला पाहिजे. जागतिक स्पर्धेच्या युगात त्याला टिकून राहण्यासाठी त्याने सर्वज्ञ असले पाहिजे तरच त्याला विविध संधी प्राप्त होतील याप्रसंगी मान्यवरांनी आपले विचार मांडले.

### २६) लातूर दि. १२/०१/२०१०

स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त युवक मेळावा व राष्ट्रमाता जिजाऊ यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन.

### २७) उस्मानाबाद दि. १८/०१/२०१०

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने उस्मानाबाद येथील जिल्हा शासकीय रूग्णालयाच्या सहकार्याने सकाळच्या सत्रात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. दुपारच्या सत्रात सायंकाळी ५ वा. उस्मानाबाद जिल्हा कारागृहातील कैद्यांना विभागीय केंद्राच्या वतीने तीळगुळ वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. भालेराव (जिल्हा कारागृह अधीक्षक) तर प्रमुख पाहूणे म्हणून विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य रमेश दापके तर प्रमुख उपस्थिती हरिभाऊ जवळगे यांची व इतरांची लाभली.

### २८) शिवाजी महाविद्यालय, हिंगोली दि. २४/०१/२०१०

श्यामची आई या पुस्तकावर विभागीय केंद्राच्या वतीने चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सदस्य श्री. बुद्रुक पाटील हे होते. या चर्चासत्रात उत्स्फुर्तपणे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

### २९) लातूर दि. २६/०१/२०१०

भारतीय प्रजासत्ताक हा खराच यशस्वी झाला आहे का ? यावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात प्रा.डॉ. शेषेराव मोहिते, प्रा.डॉ. श्रीराम गुंदेकर, प्रा.श्री. एस. आर. कुलकर्णी इ. मान्यवरांनी सहभाग नोंदवला.

### ३०) निलंगा जि. लातूर दि. ०२/०२/२०१० ते ०९/०२/२०१०

निलंगा येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे ट्रस्टी माजी मुख्यमंत्री आ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या ७९व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या प्रबोधनपर महाराष्ट्रातील प्रसिद्ध अशा प्रवचनकार कीर्तनकार या प्रवचन कीर्तन महोत्सवात विभागीय केंद्राचा मौलिक सहभाग.

### ३१) येडशी ता.जि. उस्मानाबाद दि. १०/०२/२०१० ते ११/०२/२०१०

येडशी येथे आर्य समाजाने आयोजित केलेल्या योग शिबीरात विभागीय केंद्राचा सहभाग.

# Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology (September 09 To February 10)

**Diploma in Information Technology (DIT)**

1) Diploma in Information Technology is Three months part-time Course. This course helps candidates to get introduction to Computer as well as it helps to understand Office Automation Tools.

2) Three DIT Batches were conducted since February 2010.

3) One DIT batch started on 08th September and concluded on 11th December 2009. all students of this batch successfully completed the course.

4) DIT batch that was started on 30th November 2009 will go on till 26th February 2010.

5) Another DIT batch was started on 27th January and will go on till 27th April 2010.

6) "New Summer Vacation Batches" for DIT have been planned for the months of March and April 2010. The Summer Vacation batches were specially announced for S.S.C. and H.S.C. students.

**Diploma in Multimedia Creations (DMC)**

7) Diploma in Multimedia Creation is Four months part-time course. The course helps candidates to get the introduction to the Multimedia Software and they are able to do design their own temples and web pages.

8) Special weekend batch were introduced for DMC course and we got better response. The batch was specially started for the employees and the executives of different organizations. Some college students also enrolled for the same. The batch had started on 24th January 2010 and will be continuing till 13th June 2010. Timing for this batch is 10.00 a.m. to 6.00 p.m.

9) Another DMC batch had started on 16th February 2009 and will be continuing till 19th June 2010. Timing for this batch is 8.30 a.m. to 10.30 a.m.

10) "New Summer Vacation Batches" for DMC are to be started in the month of March and April 2010.

11) The Summer Vacation batches are specially announced for S.S.C. and H.S.C. students.

**Diploma in Advanced Computing (DAC)**

12) The DAC August 2009 batch was concluded on 11th February 2010. A farewell was organized for the students. YCP's Cash Prize was awarded to Mr. Harshad Navathe who stood first in the order of merit.

13) DAC course is a 6 months fulltime course. Students will be admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). Free Common Entrance Test (CET) Training was provided on 12th & 17th December 2009. Students attended the same training. CETs were conducted on 28th November & 19th December 2009 & 27 students had attended the CET from YCP's AIT.

14) Technical abilities and HR Interview (stage II & III) are part of their admission procedure. YCP's AIT organized Training for DAC stage II & III i.e. selection processes for February 2010 batch on 23rd January 2010. Candidates attended the same.

15) Stage II and III admission process for DAC February 2010 was conducted on 25th & 30th January 2010. 15 students are admitted for DAC February 2010 Batch. The Batch commenced on 23rd February 2010 and will be concluding on 13th August 2010.

16) Centralized Common Placement Programme for DAC August 2009 batch, started on schedule 50% of DAC against 2009 batch, started on schedule 50% of DAC August 2009 batch students have already received offer letters from different Multi National Companies.

**Diploma in Advanced Computer Arts (DACA)**

17) DACA Course is 6 months course. Students will be admitted to the course on the basis of Common Entrance Test (CET). For DACA February 2010 batch, CETs were conducted on 2nd January 2010. Selection process of the same was held on 4th January 2010.

18) DACA August 09 batch was concluded on 11th February 2010. A farewell was organized for the students. YCP's Cash prize was awarded to Ms. Ketaki Deshpande who stood first in the order of merit.

19) DACA August 09 batch students have participated in Silver Salt Animation Festival.

20) The process for placement for DACA August 2009 is still going on.

**Certificate course in programming using C (CCPC)**

21) A Special Course, "Certificate Course in Programming using 'C' (CCPC)". It was launched by YCP's AIT for students who are interested to improve their knowledge of C language.

22) Three batches of CCPC were conducted since February 2010.

23) One CCPC batch was conducted from 25th Sept to 17th December 2009.

24) Second batch for CCPC course was conducted between the period of 2nd November 9 to 16th January 2010.

25) Special Fast Track batch for the preparation of DAC February 2010 batch was conducted from 30th November 2009 to 18th December 2009.

**Certificate Course in Information Technology (CCIT)**

26) Certificate Course in Information Technology is Three months part-time course. Yashwantrao Chavan Pratishthan Academy of Information Technology conducts course. This course helps candidates to get introduction to Computer as well as it helps to understand Office Automation Tools.

27) The New Summer Vacation batches for CCIT are announced. The Summer Vacation hatches are specially announced for S.S.C. and H.S.C. students.

**Certufucate Course in Multimedia Creations (CCMC)**

28) Certificate Course in multimedia Creation is Four months part-time course. The course helps candidates to get an introduction to the Multimedia Software and they are able to design their own templates and web pages.

29) Special weekend batches were introduced for CCMC course and we got better response. The batch was specially started for the employees and the executives of different organizations. Some college students also enrolled for the same. The batch had started on 24th January

2010 and will be continuing till 13th June 2010. Timing for this batch is 10.00 a.m. to 6.00 p.m.

30) Another CCMC batch had started on 16th February 2009 and will be continuing till 19th June 2010. Timing for this batch is 8.30 a.m. to 10.30 a.m.

31) There were "New Summer Vacation Batches" for CCMC announced for the month of March and April 2010. The Summer Vacation batches are specially announced for S.S.C and H.S.C. students.

**Certificate Course in Web Designing (CCWD)**

32) Certificate Course in Web Designing is Two months part-time course. The course helps candidates to get an introduction to designing the web page.

33) Special weekend batch were introduced for CCWD course and we got better response. The batch specially started for the employee and the executive of different organization. Some college students also enrolled for the same. The batch had started on 24th January 2010 and will be continuing till 13th June 2010. Timing for this batch is 10.00 a.m. to 6.00 p.m. The new summer vacation batch for CCWD is announced for the H.S.C. and S.S.C students.

**Certificate Course in Computer Operations (CCCO)**

34) Certificate Course in Information Technology is Three months part-time Course. Yashwantrao Chavan Pratishthan Academy of Information Technology conducts course. This course helps candidates to get introduction to Computer as well as it helps to understand Office Automation Tools.

35) The New Summer Vacation batches for CCIT are specially announced for S.S.C. and H.S.C. students.

**Corporate Training**

36) Certificate Course in Computer Operations (CCCO), special batch was conducted for under privileged students. The batch was conducted with the help of Door Steps School, NGO. The course was conducted between 1st to 29th September 2009 and 29 students successfully completed the course.

37) Another batch for Certificate Course in Computer Operation (CCCO) was conducted the DCQA. Vikhroli from 18th December 2009 to 14th January 2010.

**Modular Course**

38) Special Modular Course for Database Technology was conducted from 1st to 10th October 2009.

39) Another batch for Certificate Course in Computer Operation (CCCO) was conducted for DGQA, Vikhroli from 18th December 2009 to 14th January 2010.

**Workshop**

40) Yashwantrao Chavan Prtatishthan's Academy of Information Technology organized a workshop for Multimedia Creations.

ग्रामीण विरूद्ध नागरीकरण हे प्रश्न एकमेकात इतके गुंतलेले आहेत की, एकाच्या सुखाचा, दुसऱ्याच्या दुःखाशिवाय आपणाला विचारच करता येत नाही. खेडे आणि शहर यांची सुखदुःखे ही अशी परस्परांशी भिडलेली, परस्परात मिसळलेली आहेत.

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रूपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग १<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग २<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण खंड १ ते ४<br>संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६. | म. ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | ६०.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टीकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास - संशोधक /लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलासंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन - राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना.धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य/फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन | २००.०० |

## व्हिडिओ कॅसेटस

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु.ल. वृत्तांत : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट
- वरील चारही व्हिडीओ कॅसेटस्‌ची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- येस् आय एम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शन - विनय नेवाळकर



कोकण विभागीय केंद्राच्या वतीने ज्येष्ठ नागरीक दिनाच्या सत्कार प्रसंगी अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर माजी आमदार, ज्येष्ठ समाजसेवक श्री. शशिशेखर आठल्ये श्री. डॉ. वि. म. शिंदे आप्पासाहेब गोसावी.




महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या गृहव्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी व डावीकडून उपस्थिती वीणा यार्दी, रेखा नार्वेकर, मा. शरद काळे, मा. सुनीती काळे, मा. सुधा भावे, ममता कानडे.




पुणे विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या पर्वत चढणे उतरणे स्पर्धेचे छायाचित्र



विभागीय केंद्र लातूर तर्फे १ ऑक्टोबर २००९ रोजी ज्येष्ठ नागरिक आनंद उत्सव मेळाव्यात मार्गदर्शक शिक्षण महर्षी मा. खा. डॉ. गोपळरावजी पाटील, सचिव मा. हरिभाऊ जवळगे गुरूजी, हरिप्रसाद सोमाणी व भाऊसाहेब गोरे इ.



विभागीय केंद्र लातूर तर्फे २५ नोव्हेंबर २००९ रोजी स्व. यशवंतराव चव्हाण साहेबाच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त विचार मांडताना प्रसिध्द साहित्यिक प्रा. डॉ. कल्याणकर व्यासपीठावर प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, भाऊसाहेब गोरे मा. डॉ. गोपाळराव पाटील सचिव मा. हरिभाऊ जवळगे



सृजन या उपक्रमात चित्र काढताना रंगून गेलेली शाळकरी मुले



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या मा. सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून लहान मुलांसाठी सुरू करण्यात आलेल्या सृजन या उपक्रमात मुलांना कार्टून काढायला शिकवताना प्रमुख मान्यवर



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नाशिक तर्फे सुप्रसिध्द लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांची मुलाखत घेताना डॉ. वृंदा भार्गवे.



यशस्विनी सामाजिक अभियानाच्या संयोजिका मा. सुप्रिया सुळे आणि भारतीय जीवन विमा निगम यांचे अधिकारी यांच्या बरोबरच्या बैठकीत अभियानाच्या प्रमुख समन्वयक व इतर



विभागीय केंद्र औरंगाबाद, जनसंवाद व वृत्तविद्या विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात आपले विचार मांडताना विशेष पोलिस महानिरीक्षक मा. सुरेश खोपडे व्यासपीठावर उपस्थित प्रा. जयदेव डोके, सुधीर सेवेकर, नीलेश राऊत इ.

सी डैक CDAC ॲक्ट्स acts Authorized Training Center

# YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN'S ACADEMY OF INFORMATION TECHNOLOGY

## SPECIAL COURSES FOR SUMMER VACATION

**Certificate Course in Information Technology**

**Diploma in Information Technology**

**Certificate Course in Multimedia Creations**

**Diploma in Multimedia Creations**

**Add.: Y. B. Chavan Center, Gen. J. Bhosale Marg, Opp. Mantralaya, Nariman Point, Mumbai- 400 021.**

**Mobile No.: 9769256343.**
**Telephone No.: 022 2281 7975 / 2204 3619.**

# ADMISSIONS OPEN

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
# नवमहाराष्ट्र युवा अभियान

## आगामी उपक्रम

**नवमहाराष्ट्र युवा अभिसरण मोहीम**

मे २०१० मराठवाडा-पश्चिम महाराष्ट्र

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम**

सहभागी गावे-महाराष्ट्रातील निवडक २० ग्रामपंचायती

**महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्यभरात ५० ठिकाणी युवती मेळावे**

**विद्यार्थी युवा साहित्य संमेलन**

**यशवंत युवा फेलोशिप**

